वऱ्हाड समाचाराची किंमत

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दरसाल आगाऊ | रु० ५ | डांक हाशील | | ०।३ |
| साहामाही | ॥ | ३ | ॥ | ०८ |
| सालअखेर | ॥ | ७ | ॥ | १०८ |
| किरकोळ अंकास | | | | ०४ |

नोटिशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १
पर्दे दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ......०१

SUBSCRIPTION
Rs.

Annum in advance 5 Postage 13 ass
Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 ,, 6 as
Single copy..............................4as

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOL XXVI    AKOLA MONDAY 5 SEPTEMBFR 1892    NO 35

वर्ष २६    आकोला सोमवार तारीख ५ माहे सप्टेंबर सन १८९२ इ०    अंक ३५


## नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि. कि. क्लास १५ मि. नंबर १२ / १८९२

विद्यमान स्पेशल असिस्टंट कमिशनर साहेब जि० अकोला यांचे कोर्टांत

बालया वल्लद मुतया कानस्टेबल नंबर २४८ राहणार टाउन पोलीस अकोला तालुके व जिल्हा अकोला यांस मैयत पापया बापाचेनांव मुतया राहणार अकोला तालुके व जिल्हा अकोला. याचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटी फिकीट मिळावें म्हणून सदरहू अर्जदार याणें अर्ज केला आहे त्याजकरितां सदहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भगावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यांस जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्याणीं ता. १७ माहे सप्टेंबर सन १८९२ इ. रोजीं सदहू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हकाविषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारिख २९ माहे आगष्ट सन १८९२ इ०

V. N. Dandekar-
शिक्का. सिव्हील ज्यज. अकोला.

---

डा० वामन गोपाळ यांचा

हा सार्सपरिला अनेक रोगावर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे उपदंशजन्य विकार (गरमी) व तिजपासून होणारा पक्षवातादी भयंकर रोग संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हातपायांच्या तळव्यांवर व सर्व शरीरावर काळे डाग पडणें संधी दुखणें, कळा लागणे, सूज येणें सर्व संधिगत वायूवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातपायांची आग, होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दुषित झालें असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखें दुसरें औषधच नाहीं दर बाटलीस किंमत १। रुपया. पोस्टेज ४ आणे, उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक, धातु व रक्तवर्धक मिश्र कास्फरसाच्या,

गोळ्या

या पासून अतिशय विषयोपभोग नित्य धातुश्राव यानें झालेली क्षीणता जाऊन कडकी, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुसकत्व इत्यादि विकार ताबडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जा (मेंदु) व मज्जतंतु याच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचें पुनरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुंची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे बंगी व पोष्ट मिळून एका पासून कितीं ही बाटल्या घेतल्या तरी ६ पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा कलप.

हा कलप प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें, सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळे भोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रु० पोष्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधा सोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता—नव्याठाकूर द्वारासमोर.

---

नोटीस

वेशमी तो॥. राजश्री धोंडो रामचंद्र कुळकर्णी मौजे दुधबावी परगणें फलटण जिल्हा सातारा हल्लीं वस्ती साठे परगणे जिल्हे मजकूर —यांस

खालीं सही करणार यांज कडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी आमचे साक्षात वडील बंधु असोन वडिलार्जित इस्टेट तुमचा व आमचा सारखा निम्मेनिम हिस्सा असतांना त्या पैकीं जे दुधबावी येथील जमीन सर्वे नंबर १६३ पैकीं यांत माझा हिंदुधर्मशास्त्रा प्रमाणें निम्मा हिस्सा असतां माझे हिश्शा सुद्धां सालिम शेत तुह्मी श्रीराम मोतीराम मारवाडी वस्ती फलटण यांस खरेदी दिल्याचें समजल्या वरून मुद्दाम तुह्मास नोटीस देण्यांत येतें कीं सदहु स्थावर माल वडिलार्जीत इस्टेटी पैकीं असल्या वरून मी तुमचा कनिष्टबंधु असतां तुह्मास त्रयस्थ मनुष्यास माझा हिस्सा विकून त्याची विल्हेवाट करण्यास अधिकार नसतां केली आहे यास्तव कळविण्यांत येतें कीं तुह्मी जी इस्टेट माझ्या हिश्या सुद्धां खरीद दिली आहे ती बेकायदा असल्या वरून रद्द समजावी सदर्हु विक्री रहित करण्यास व अग्रक्रियाविकाराचा हक्क स्थापन करण्यास तुमचेवर पास केला जाईल व कोर्ट खर्च नोटीशीच्या खर्चा सुद्धां तुमचे जवळून घेतला जाईल कळावे हे विज्ञापना तारीख २९ माहे आगष्ट १८९२ इसवी.

(सही)

गणेश रामचंद्र कुळकर्णी मौजे दुधे बावी हल्लीं हेडमास्तर शाळा अपोती तालुके अकोलें जिल्हे मजकूर प्रांत वऱ्हाड.

---

नोटीस

श्रीराम मोतिराम मारवाडी दुकान कसबे फलटण पेठ नवी जिल्हा सातारा....यांस.

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुह्मी आमचा वडील भाऊ नामें धोंडो रामचंद्र कुळकर्णी यांज पासून आमचे वडिलार्जित इस्टेटी पैकीं मौजे दुधेबावी येथील सर्वे नंबर १६३ पैकीं सालीम शेत खरेदी केल्याचें समजलें त्यावरून कळविण्यांत येतें कीं, सदहू वडिलार्जित इस्टेटीत मी त्यांचा साक्षात कनिष्ट बंधु असल्यावरून माझा निम्मे हिस्सा आहे हें तुह्मांस माहीत असतां खरेदी करणें रास्त नव्हतें. यास्तव ही नोटीस दिली आहे तर सदहू खरेदी बेकायदेशीर झाली असलेमुळें रद्द केली आहे. इतक्यावर तुह्मी न ऐकल्यास सदहू खरेदी रद्द करण्यास व अग्रक्रियाविकाराचा हक्क स्थापन करण्यास तुमचेवर दिवाणींत पास करून कोर्ट खर्च व नोटीशीच्या खर्चा सुद्धां रुपये वसूल केले जातील. कळावें तारीख २९ माहे आगष्ट १८९२ इ.

(सही)

गणेश रामचंद्र कुळकर्णी मौजे दुधे बावी हल्लीं हेड मास्तर शाळा आपोती ता. अकोलें जि. मजकूर प्रांत वऱ्हाड.

---

## बरार रूरल लॉ.

### नियम.

(३१ अंकावरून पुढें चालूं.)

४ चेक कसे काढण्याचे व सही करण्याचे नियमांत सांगितलेले आहेत ते खेरीज करून बाकी सर्व प्रसंगी पैसा देण्याबद्दल बोर्डाची पूर्वी मंजूरी असली पाहिजे.:—

कोणत्या ही जिल्हा किंवा तालुक बोर्डच्या वतीनें काढलेल्या प्रत्येक चेकावर त्या त्या बोर्डाच्या विशेष किंवा साधारण दिलेल्या मंजुरी अन्वयें सेक्रेटरीची सही व मेंबरा पैकीं दोघांची मखलसी असली पाहिजे असा चेक काढण्याचा तो जें बिल चेअरमन किंवा त्याच्या पश्चात व्हाईस चेअरमन यानीं तपासून पास केलें असेल त्या बिलाशिवाय किंवा आडव्हान्सांतील रकम खर्ची पडल्या शिवाय किंवा तिची भरती करण्याशिवाय देऊं नये.

सदहू चेअरमन किंवा व्हाईस चेअरमन यानीं पैसा देण्या बद्दलचे कोणतें ही बिल पुढील बाबती खेरीज करून बोर्डाच्या पूर्व मंजुरी शिवाय पास करूं नये:—

(१) ठराव एस्टाब्लिशमेंटाचा पगार.

(२) योग्य अधिकाऱ्यानें मंजूर केलेल्या कामाकरितां किंवा रिपेरी करितां पैसा देणें.

(३) जरुरियात कामाकरिता रकम. ज्या बोर्डाच्या मंजुरीच्या अगोदर चेअरमन (किंवा त्यांचे पश्चात व्हाइस चेअरमन) व दोन मेंबराच्या अखत्यारीवर मिळूं शकतात. ह्या सर्व बाबतींत बोरडाची मंजूरी पैसा दिल्याच्या तारखेनंतर बोर्डाची जी पहिली सभा भरेल त्या वेळीं घ्यावी.

चेकावर सेक्रेटरी व दोन मेंबरांची सही आल्या खेरीज खजिन्यांतून पैसा न देणें.—

५ एखाद्या जिल्हा बोर्ड किंवा तालुका बोर्डच्या नांवानें काढलेल्या चेकावर सेक्रेटरीची सही व दोन मेंबरांची मखलसी असल्या वांचून कोणत्याही सरकारी खजिन्यांतून पैसा दिला जाणार नाहीं.

२—रकम (जी) अन्वयें नियम—जीं कामें कांहीं अशीं अगर सर्वांशीं जिल्हा बोर्डाच्या खर्चानें करण्याची आहेत त्यांचे नकाशे व इस्टिमेट तयार करण्यासंबंधीं व ज्या अधिकाऱ्यानें व ज्या शर्तींवर असे नकाशे व इस्टिमेट मंजूर करण्याचे त्या संबंधीं.

६ सार्वजनिक कामाचा खर्च.

(१) बजेट एस्टिमेटांत कामाबद्दलची व रिपेरीबद्दलची योजना करणें तीं पुढील मंजुरी अन्वयें करावी.

(अ) जेव्हां अंदाजा खर्च प्रत्येकीं ५०० रुपयांपेक्षा जास्त नसेल तेव्हां जिल्हा बोर्डाची मंजुरी.

(ब) जेव्हां अंदाजा खर्च प्रत्येकीं ५०० रुपयावर व १००० पेक्षां जास्त नसेल तेव्हां डेपुटी कमिशनरची मंजुरी.

(क) जेव्हां अंदाजा खर्च प्रत्येकीं १००० रुपयावर व ५००० पेक्षां जास्त नसेल तेव्हा कमिशनरची मंजुरी.

(ड) जेव्हां अंदाजा खर्च ५००० रुपयांवर असेल तव्हां रेसिडेंट साहेबांची मंजुरी.

(२) रकम (अ) व (ब) अन्वयें प्रत्येक नवीन करण्याचें काम ज्यास २०० रुपयावर खर्च लागणार त्या कामाचा नकाशा व इस्टिमेट तयार केलें पाहिजे. व तें काम सुरू करण्यापूर्वीं जिल्ह्याचे एक्झिक्युटिव्ह इंजिनियर याणीं पसंत केलें पाहिजे; ज्या कामास ५०० रुपया पेक्षां जास्त खर्च लागण्याचा नाहीं अशा कामाच्या नकाशावर व एस्टिमेटावर जिल्हा बोर्डाच्या चेअरमनची मखलसी पाहिजे. व ज्या कामास ५०० रुपयावर खर्च लागणार त्या कामाच्या नकाशावर व एस्टिमेटावर कामाचा नमुना व एकंदर खर्च मंजूर केल्याचे दर्शविण्याकरितां चेअरमन व डेपुटी कमिशनरची मखलसी पाहिजे. रकम अ. व ब. अन्वयें कोणतेही नवीन काम त्याच्या नकाशावर व एस्टिमेटावर ह्या रकमेंत सांगितल्याप्रमाणें मखलसी होईपर्यंत

बजेट एस्टिमेंटांत दाखल करूं नये. (पु.चा.)

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध १४ शके १८१४

इंडियाच्या ' राष्ट्रीय सभे ' संबंधानें कित्येक गृहस्थ असा आक्षेप घेतात कीं राष्ट्रीय सभा ह्मणजे खरोखर सर्व लोकांची तो सभा नव्हे. ती सभा बहुतेक वकीलांची असून तिचीं सर्व कार्यसूत्रें वकीलांच्या हातांत असतात आणि राष्ट्रीय सभेची घटना अशी आहे ह्मणूनच तिच्या नांवाप्रमाणें तिला राष्ट्रीय स्वरूप येत नाहीं. या सभेचा अभिप्राय ह्मणजे साऱ्या राष्ट्राचा अभिप्राय नव्हे. चार प्रमुख वकील जें कांहीं ह्मणतात त्यालाच या सभेंतील इतर लोक अंधप्रवृत्तीनें माना डोलवितात. वरील आक्षेपांत तथ्यांश नाहीं असें आह्मी ह्मणत नाहीं आणि हा आक्षेप कांहीं अंशीं खराही आहे ह्मणून आह्मास नवल अगर खेद वाटत नाहीं. राजकीय प्रकरणांत हात घालण्या सारखे लायक लोक आमच्या देशांत फारसे नाहींत. इंग्रजी झाली तेव्हां पासून आमच्यांतील जुना मुत्सद्दीपणा लपास गेला. इंग्रजी राज्यांत राजकीय हक्क सांगण्यास पुढें येण्यास इंग्रजी पद्धती प्रमाणें शिक्षण आवश्यक आहे. सांप्रतची विद्या जो पढला असतो त्यांसच राजकर्त्यांशीं बोलण्याचालण्यास सांपडतें. इंग्रजी विद्या शिकलेल्या लोकांसच अशा प्रकारें राजकीय बाबतींत वादविवाद करितां येतो. आमच्या नेटीव समाजां तील व्यापारी, उदमी, शेतकरी वगैरे पुष्कळ लोक शिकलेले सवरलेले नसतात आणि त्या लोकांस राज्याकारभांतील कांहीं माहिती नसते. राज्यक्रांती झाली, राज्यें खालसा झालीं, कराचा बोजा वाढविला, अगर हवे ते कायदे करण्यांत आले तरी देखील त्या लोकांस त्याची नीटशी शुद्धी नसते. तेव्हां असे लोक आपल्या आपणच राजकीय प्रकरणांत पुढारीपण घेतील असें घडत नाहीं. या जनसमूहाचे प्रवर्तक लोक ह्मणजे इंग्रजी शिकलेले लोक. इंग्रजी शिक्षण असलें ह्मणजे प्रत्यक्षपणें राज्यकर्त्यांशी दळणवळण होऊं लागतें. त्यांतही आणखी इंग्रजी शिकलेले जे लोक सरकारी नोकर आहेत त्यांस राष्ट्रीय सभेंत हात घालतां येत नाहीं. तेव्हां इंग्रजी शिकलेल्या पैकीं स्वतंत्र धंद्याचे लोक राष्ट्रीय सभेचे पुरस्कर्ते होण्यासारखे असतात आणि तेच पुरस्कर्ते सांपत आहेत हें कांहीं खोटें नाहीं. अशा स्वतंत्रधंद्याच्या लोकामध्यें मुख्यत्वें करून वकील, वर्तमानपत्र वाले, व फार थोडे कारखानदार वगैरे आढळतात. वर्तमानपत्रवाले संपन्न नसतात असा प्रकार फार वेळां घडतो. वकील बहुत करून आजकाल श्रीमान सुखवस्तु असतात आणि अर्थातच वकील लोक पैशाअडक्यानें कार्यक्षम असतात. तेव्हां वकील लोक राष्ट्रीय सभेंत अग्रगण्य आहेत हें कांहीं आक्षेपाचें स्थळ नव्हे. परंतु राष्ट्रीय सभेचा अभिप्राय ह्मणजे बहुजन समूहाचा नाहीं असें ह्मणणें मात्र यथायोग्य नाहीं. व्यापारी, शेटसावकार, जमीनदार, शेतकरी वगैरे लोक पुढारी नाहींत तरी इंग्रजी शिक्षणाच्या फैलावानें त्यांस राजकीय गोष्टी कळूं लागल्या आहेत. इंग्रजी शिकलेल्या पुढारी लोकांनीं त्यांस राष्ट्रीय चळवळींत हात घालण्यास शिकविलें आहे. वर्तमानपत्रें वादविवाद, टेलेजंग सभा वगैरे नानाविध, उपायांनीं आपल्या राजकीय हक्का विषयीं त्या लोकांची योग्य प्रकारें कानउघाडी झाली आहे. राष्ट्रीय सभेचे मुख्य उद्देश पूर्णपणें कळून आल्या पासून ते लोक आपापल्या सामर्थ्या प्रमाणें राष्ट्रीय सभेच्या कामांत तत्पर असतात ही मोठी आनंदाची गोष्ट होय. राष्ट्रीय सभा सात वेळां भरली त्या योगानें राष्ट्रीय सभेला राष्ट्रीयत्व पूर्णपणें येत चाललें आहे. उत्तरोत्तर राष्ट्रीय सभेच्या ध्वजा खालीं हिंदुस्थानचे लोक अधीकाधीक गोळा होत आहेत, राज्यकर्ते तिच्या सभासदांस चांगले लेखतात, इंग्लिश लोक विलायतेंत ही राष्ट्रीय सभेच्या कामाला मदत करीत आहेत इतकेंच नाहीं तर राष्ट्रीय सभेचे मूळ अध्यक्ष व संस्थापक दादाभाई नवरोजी यांस पार्लमेंटांत सभासद ही निवडलें आहे. या पेक्षां राष्ट्रीय सभेची लोकमान्यता अधीक ती कोणती?

---

राष्ट्रीय सभेंत मुख्य मुख्य वकील लोक असतात हें यथायोग्यच आहे. त्यांची विद्वत्ता, कायदेपांडित्य व वादकौशल्य या मुळें सहजी राष्ट्रीय सभेचे अग्राधिकार त्यांच्यांकडे येतात. इंग्लंडच्या कामन्स सभेंत हीं वकील लोकांचा भरणा मोठा आहे. १६४ बारिष्टर व सालिसिटर्स, १९६ व्यापारी व सावकार १९६ कारखानवाले, १९ मजूरदार लोक, ३९ वर्तमानपत्रवाले, १६ डाक्टर व ७ युनिव्हरसिटींतले प्रोफेसर या प्रमाणें वर्गावर्गी कामन्स सभेच्या सभासदांची दिसून येते. तेव्हां वस्तुदृष्ट्या वकील लोकांचें प्राबल्य सार्वत्रिक आहे. ते श्रीमान असतात. त्यांची सरकारदरबारांतून मानमान्यता असते आणि सर्व हुजरवाल्या लोकांशीं त्यांचा सहवास घडतो तेव्हां वकील लोकांसच राष्ट्रीय सभेंत पूज्यस्थान मिळालें तर तें बरोबर आहे.

---

आफगाणिस्थानचे अमीर आपल्या राज्यांतील बंडखोर व राजद्रोही लोकांच्या धामधुमीनें व रशियन सरकारच्या आगळीकीच्या दंग्या धोप्यानें अगदीं जेरीस येऊन गेले आहेत. राज्यातला बंडावा मोडत येत आहे इतक्यांतच रशियन व आफगाण लोकांची पामीर जवळ चकमक घडली त्यांत अमीराकडील ९ इसम मेले, २ जायबंद झाले व ७ जण कैद करण्यांत आले. रशियाचा १ इसम मेला व ९ घायाळ झाले. रशियन कर्नल यानाफ हे अमीरास कळवितात कीं बदक्षान येथील आफगाणी सेनापतीनें आमच्यांशीं दुर्वर्तन केलें व गोळीबार काढण्यास आरंभ केला तेव्हां आमच्या लोकांनीं तुटून पडलेल्या आफगाणी लोकांवर बंदुका सोडून जय मिळविला.

इंडियाचे सेनानायक राबर्टस हे आपल्या लवाजम्याच्या मंडळी निशी हिंदुस्थान सरकारतर्फे अमिरांशी सल्ला मसलत करण्यास जाणार आहेत त्या मुलाखतीची तारीख लवकर नेमस्त करावी व भेटीचें स्थळ जलालाबाद ठरवावें ह्मणून अमीरास इंडिया सरकारचा खलिता लिहून गेला आहे त्याचा जबाब धाडण्या पूर्वींच अमिराकडून व्हाइसराय साहेबांस रशियन लोकांशी घडलेल्या चकमकी संबंधानें आलें लिहून आहे. त्यांत अमीरांनीं सरकार पाशीं कुमके विषयीं ही विज्ञप्ती केली आहे. अमीर पक्का, जुना, व रशियाच्या शह्यास दिलेला दोस्त आहे तेव्हां त्यांच्या सुरक्षितपणाच्या व शांततेच्या गोष्टी विषयीं हिंदुस्थान सरकार सावधपणानें योग्य खबरदारी घेईल अशी सर्वत्रास बळकट आशा आहे.

हिंदुस्थान सरकारास दोस्तीच्या नात्यानें व स्वराज्याच्या संरक्षणासाठीं अमिरांस मदत करणें आवश्यक आहे. पण या देशाच्या खजिन्याला तात्कालिक ठोंकर लागणार आहे ह्मणून आह्मास वाईट वाटतें. सध्या आफगाणिस्थानाकडे जी वावटळ सुटली आहे, जो लहानसा ढग इंग्लीश, रशियन, व आफगाण यांच्या डोक्यावर दिसत आहे व ज्या किरकोळ चकमकी डोळे दीपवितात तीं सर्व भयंकर परिणामाचीं व अरिष्ट सूचक लक्षणें आहेत आणि त्यां पासून केव्हां व केवढा प्रळय होईल यांचा नेम नाहीं. राज्यतृष्णा मोठी घातुक आहे. ब्रह्मदेश संपादून हिंदुस्थानास नागविलें तसेंच आफगाणिस्थानाकडे लढाईची वेळ बेतल्यास हिंदुस्थानचीच नागवणूक आहे. ब्रिटिश पार्लमेंटानें इंडियावर आज पर्यंत विनाकारण बसविलेल्या लढायांचा कोट्यावधि रुपयांचा खर्च लक्ष्यांत घेतला, प्रजेचें दारिद्र्य व करांचा बोजा हीं पाहिलीं आणि उत्तरोत्तर लोकांचा दुणावत चाललेला आलस्काळ व नामर्दपणा हे आठवले तर आह्मी लढायांच्या वार्तेनें देखील इतकें कां भयाभीत होतो व इंडियाच्या बिपद्ग्रस्ततेवरच इंग्लंडच्या कशा फुकटांत मोजा चालल्या आहेत हें त्या पार्लमेंटास पूर्णपणें कळून येईल. गोष्टी बेतून आल्या ह्मणजे कोणाचाच उपाय राहत नाहीं हें खरें परंतु इंडियाच्या संरक्षणाच्या मिषानें राज्यविस्ताराचा डाव कसा साधला गेला आहे हें बघितलें ह्मणजे नेटीव लोकांच्या ह्मणण्याची यथार्थता कळून येईल. ईश्वर करो व सर्व अरिष्ट टळो ह्मणजे झालें!

---

अफगाणिस्थानच्या लढाई विषयीं बातम्या ऐकूं येतात त्यांत रशिया संबंधानें निदान लढाईची खबर लागत होती तिजबद्दल रूस देशचे वकीलांनीं इंग्लंडाला खात्री पूर्वक कळविलें कीं लढाई करण्याचा रशियाचा तिळप्राय बेत नाहीं व अफगाणिस्थानांत राज्यविस्तार करण्याचा ही मानस नाहीं. कर्नल यानाफ यांच्या संबंधाच्या कंड्या उठल्या त्या खोट्या आहेत, त्यांच्या जवळ फौज फाटा अगदीं स्वल्प आहे व त्यांच्याशीं झालेली चकमक व तिचें कारण हीं लक्ष्यांत घेण्या सारखीं नाहींत. असो, या आश्वासना वरून सध्यां आनंद मानण्यास हरकत नाहीं.

---

आज पासून पुण्यास 'औद्योगिक परिषदांचे बैठकीस प्रारंभ होईल. ही संस्था अत्यंत उपयोगी असून तिच्या उत्कर्षाकडे बहुत लोकांचें लक्ष्य लागलें आहे ही आनंदाची गोष्ट होय. अध्यक्षस्थानीं मि० डेव्हिड गास्लींग या विद्वान गृहस्थांची योजना आहे. यंदाच्या बैठकीस सन्मान्य, बहुश्रुत, व विद्यासंपन्न अशा गृहस्थाकडून १४ विषयांवर निबंधद्वारां लेख वाचण्यांत येतील. ही दुसरा बैठक आहे. या संबंधीं सविस्तर हकीकत मागाहून देण्यांत येईल.

---

संमती वयाच्या बिलानें प्रसिद्धीस आलेले सर आनड्र्यू स्कोबल यांस कानसर्व्हेटीव पक्षीयां कडून पार्लमेंटांत सभासद निवडण्यांत आलें ह्मणून मुंबईहून कोणी गृहस्थानें त्यांचा धन्यवाद केला. प्रत्युत्तरांत स्कोबल साहेबांनीं मि. म्याक्लीन साहेब निवडले गेले नाहींत ह्मणून दुःख प्रदर्शित केलें आणि त्यांच्या मागे हिंदुस्थानची बाजू संभाळण्याचें अभिवचन दिलें आहे. त्यांच्या पक्षाचा पाडाव झाला तरी हुरूप बाळगून ते आहेत. परंतु साहेब मजकूर वरील बिला सारख्या अन्यथा व्यापारानें पुन्हा प्रसिद्ध न होवोत ह्मणजे झालें! म्याक्लीनचे विचारा प्रमाणें त्यांचे विचार नाहींत असें त्यांनीं लिहून कळविलें ह्मणून एक भ्रांति दूर झाली.

---

सातऱ्या कडील फेगन नांवाच्या फारेस्ट आफिसरानें एका धनगराच्या नायकीवर आखल समजून गोळी घातली. धनगराण आखला सारखी कशी भासली ईश्वर जाणे! काविळी सारखा त्यांच्या नेत्रास एखादा रोग होऊन दृष्टिभ्रंश झाला ह्मणावा तर अशा विलक्षण बाहुल्याचा मनुष्य सरकारी नोकरीवर बहालच आहे हें नवल होय. त्यांची चौकशी कलेक्टर क्याडी यांनीं केली आणि आखलीच्या नवऱ्यांस फेगन करवीं साठ रुपये नुकसान देवविलें. आखली मेली तर दुसरी आखली त्याला साठ रुपयांला मिळेल असा न्यायमूर्तींचा ग्रह झाला. येणे प्रमाणें शिकारीच्या हत्येचें निरसन झालें.

---

ठाण्याच्या ' सूर्योदय ' पत्रकर्त्यांस वरील प्रकार अद्भुत अन्यायाचा वाटला ह्मणून त्यांनीं त्याबद्दल कांहीं टीका केली. हा स्फुट लेख इसलामपूरच्या 'प्रतोद' पत्रकर्त्यांनीं आपल्या स्पष्टोक्तीच्या अभिप्रायासह जाहीर केला. फेगन साहेबांनीं प्रतोदवाल्यावर अब्रू नुकसानीची फिर्याद केली आणि लिहिण्यास दुःख वाटतें कीं त्या खटल्यांत आरोपीस पांचशे रुपये दंड झाला. न्यायाच्या कोडतांत फेगनची पूर्व चौकशी काय झाली ती दाखल करण्याची कलेक्टर कडून परवानगी नव्हती. 'प्रतोद' पत्रकर्त्यांचें फार नुकसान झालें आणि न्यायाचा फार्स होऊन झालें ह्मणून फार वाईट वाटतें. एकंदरीनें अन्याय अन्यायानेंच शमतो असा सिद्धान्त कायम ठरतो कीं काय!

---

प्रतोद पत्र कर्त्यांवर जी बेतपड आली तिच्या परिणामा वरून आम्हांस एका गोष्टीची मोठी उणीव वाटते. नेटीव पत्रकर्त्यांची एक मंडळी असावी अशा संबंधानें मागें प्रश्न निघाला होता त्याचा पुन्हा खल होऊन तशी एक मंडळी स्थापिली जावी असें आह्मी इच्छितों. ही मंडळी निघाल्या पासून पत्रकर्त्यांच्या मतास स्थीरता येईल, नेटीव पत्रांच्या भरभराटीची वेळोवेळ हकीकत कळेल, आणि प्रसंगोपात प्रतोद पत्रकर्त्या प्रमाणें कोणास वृथा दंड झाला तर त्याच्या बद्दल एकोप्यानें, स्वकार्यदृष्टीनें, व न्याय्य पक्षानें पतिताची बाजू पावन होईल. आणि

सरकारांस हा वर्तमान पत्रकर्त्यांच्या एकमताचा अवश्य विचार करावा लागून अन्यायसागराला एक निराळा तट उभारल्या सारखा होईल.

---

हल्लीं आकाशांत मंगळाचा तारा पाहिला ह्मणजे मोठा तेजस्वी व लाल दिसतो. यंदा मंगळ–पृथ्वी—सूर्य असे तीन गोल एका रेषेत आले आहेत. मागें सन १८७७ त व १८८२ त असेच एका रेषेंत आले होते. कां हीं ज्योतिषशास्त्रवेत्त्यांची कल्पना आहे कां मंगळाची रचना बहुतेक आपल्या पृथ्वी सारखी आहे. मंगळा वरील मनुष्यें—जर कोणी तेथें राहत असतील तर—आपल्याहून दीर्घायुषी असावींत, आणि किंबहुना अधीक शहाणी व ज्ञानी असावींत. पृथ्वी पासून साडे तीन कोट मैल लांबीवर मंगळ आहे. पृथ्वीवरील लोकसंख्या फार वाढली आहे तेव्हां मंगळाच्या लोकांस नेणारें विमान मिळेल तर बरें!

---

ब्रह्मदेशाच्या ग्याझेटांवरून कळतें कीं, तिकडील एका प्रकारच्या वाळवे मध्यें सोन्याचे रजःकण सांपडतात. इरावती नदीमध्यें त्या वाळू पैकीं ३ पौंड १० औंस वाळू धुवून पाहिली तेव्हां त्यांतून १०.४ ग्रेन सोनें आढळलें ह्मणजे त्यावरून प्रमाण असें निघतें कीं, एक टन वाळूंतून ११ पौंड ४ औंस सोनें काढण्यांत यावें. सुवर्णमय वाळवंटाची ही हकीकत खरी ठरली आणि वरील प्रमाणानें त्या वाळवेंत सोनें आढळेल तर स्वल्प अवकाशांत सोन्याच्या वाळवंटा निमित्त पुष्कळ भांडवलवाल्या मंडळ्या निघतील. नाहीं तर बंगाल्याकडे सोन्याच्या खाणी सांपडल्या ह्मणून कंपन्या निघून त्यांची दिवाळी निवाळी तसा प्रकार न होवो ह्मणजे झालें! पक्का शोध व तपास होऊन त्याचा निर्णय काय होतो पाहावें!

# The Berar Samachar

**MONDAY SEPTEMBER 5 1892**

The Excise report for 1891-92 is a full and clear statement of facts and figures. It does not pass in review the present system of excise administration because it in a state of transition and the Resident—Mr. Plowden is himself a specialist in that subject. Now we have got an expert officer from Bombay to improve the excise system and something on the model of the Bombay-system is proposed as an experiment for the district of Ellichpur. We are not aware of the changes that are to be effected in Berar but in order to understand the proper extent & nature of a probable reform if any proposal be placed before the public we intend to give in short the system in vogue and the improvements that are needed in it.

The Excise revenue in Berar is realized from the taxation of

1 Imported spirits
2 Country spirits
3 Sindi
4 Opium
5 Ganja.

As regards Foreign spirits & liquors a license to sell them is obtainable on a fee of Rs. 100 per year for each shop. Such shops are 18 in the province. There seem to be no severe & strict regulations about the sale of these foreign drinks as there are in relation to country spirits and Sindi. There is a system of monoply as regards the rest of the drinks and drugs. The manufacture and vend of country spirits and Tari in each district is permitted to the highest bidder at the auction of every year. It is similar to the farming of a survey field The contractor is bound to abide by the Abkari rules in force. The circles he is allowed for his district and the number of shops in each circle are fixed and liable to dimunition by the orders of the Deputy Commissioner. The price he pays at the auction, however high, he has to realize upon the sale of the spirits he manufactures. His interest is to force up the manufacture of his articles to the maximum quantity and to invite as many people as available to drink his wine at the cheapest rate he can afford to sell. The cultivation of poppy-seeds is prohibited in Berar and opium is therefore imported from the Indur side. Ganja is produced in the province. Its cultivation is licensed at 10 per acre. The sale of opium & Ganja is monopolized in each District at the highest bid. The danger in this affair is the smuggling of opium into Berar & the unlawful export of Ganja in the neighbouring provinces.

The utopia of the Excise system is the maximum of revenue with the minimum of consumption. To a certain measure both these things are possible but when prices rise inordinately high people find an opening in the illicit manufacture of liquor and this adds to the volume of crime. The minimum of consumption that is attainable at any time has reference to the habits of the people while the maximum of revenue is derivable if the people can drink to the last pice in their purse and Govenment make the drink as dear as people can afford to buy. The excise ideal, if driven to both extremes, will cease to be a desirable object. The vices of intoxication will ever exist in some form or other and one must be a simpleton who expects all men to be sober. Sobriety of this ultra type is a forbidden quality to mortals. The passion for drink or drug being thus an incurable disease of human frame a man will move heaven and earth to get it. We should attempt however to reduce the evil as far as possible and make men more & more free from any sort of intoxication. And the effect will follow some generations hence that our children will inherit our tendencies and traditions. Age gone- by have shown, as that the evil exists. In the old Vedic literature we find allusions to drinking vices. Our contact with the Englishmen has increased the drink-traffic to an enormous extent and the effects of a century or more cannot be undone in at least less time than that. The discussion of the Mhowra-bill of Bombay has clearly pointed out that high prices drive people to resulting intemperance and volume of crime, and that the measures to check drunkenness tend to become a new engine of oppression. There is a salient & valuable point worth notice in the remarks of our old Resident-Sir Dennis Fitz Patrick on the opium-question. This remark which is equally applicable to every Abkri-reform runs as below:—

"Let any one picture to himself the difficulty of decting the smuggling and surreptitious sale over an immense extent of territory and for the supply of many millions of consumers, of such a commodity, and let any one who knows this country picture to himself what the attempt to suppress it here would mean- The imagination, at least the imagination of an ordinary practical man, refuses to conceive the establishments that would be required for such a purpose, and to any one who knows the class of persons who would have to be employed for such a purpose here, the prospect of oppression, corruption, and extortion which the suggestion opens out is truly appalling. No doubt, if we covered the whole face of the country with a network of preventive establishments and resorted to an extreme of severity whenever we got a conviction we should succeed in diminishing to some matarial extent the consumation of opium, but the advantage thus gained would be as nothing compared with the evils to be set against it."

What is wanted is the gradual suppression of demand for drink or drug. There must be a reasonable supply to satisfy the demand but Government should make it difficult to obtain more quantity than a reasonable one per head. The time has come when Government should not desire to extract more revenue than what is derived at present. To try for more is to rob people of their hardly-earned penny and to thrust them further to the brinkof poverty and starvation. Sir Dennis Fitz Patrick had no doubt intended the best reform when he remarked on the Excise-report of 1889—90 to the following effect.:—

"The rules will also prescribe that registers are to be kept at all shops. In those where liquor is distilled, the registers will show the stock in hand at the beginning of each day, the quantity of each description and strength of liquor distilled, sold, and sent to other shops during the day, and the balance in hand at night. For shops where distillation is not carried on, the registers will be the same except that instead of liquor distilled, they will show the amount of liquor received, giving the name of the distilling shop which consigned it."

We think that the Resident should thus exercise his powers 'to check production & cause a record of sale or manufacture to be kept by inserting in the license clauses regulating the number of stills attached to each shop & enjoining the prepration of accounts.'

---

## वऱ्हाड

हवामान— पावसानें त्राहि त्राहि करून सोडलें आहे. अतिवृष्टीचे दुष्परिणाम आढवतील असें दिसतें. ३१ इंचावर पाऊस झाला असावा. उघाडीच झाली तर खरीपाच्या पीकाचा निभाव लागेल. अतोनात पाऊस, रस्त्यांत चिखल, बरोबर ओल हें साहित्य जमलें ह्मणजे ताप, हागवण खोकला वगैरे दुखण्यांस निराळें बोलावणें नको.

कमिशनर कर्नल मेकझी साहेब हे रेसिडेंट साहेबांची मुलाखत घेऊन हैदराबादेहून परत वऱ्हाडांत आले.

बुलढाणें जिल्ह्यातील चीफ कान० रामराव यांजवर खोटा पुरावा केल्याच्या आरोपाची शाबिती येथील सेषनांत होऊन दोन महिन्याची तुरुंगशिक्षा झाली.

आम्हास लिहिण्यास दुःख वाटतें कीं रावबहादूर रामराव गोविंद पेनशनदार-एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस उमरावती मुक्कामीं गेल्या मंगळवारीं देवाज्ञा झाली. हे गृहस्थ वऱ्हाडांतील जुन्या सरदार मंडळी पैकी एक होते. यांनीं सरकारी चाकरी मोठ्या बहादुरीनें केली ह्मणून यांस पेनशन दिल्या नंतर रावबहादूर हा किताब देण्यांत आला. स्वभावानें साधे असून त्यांच्या चांगुलपणावरून सर्वजण त्यांस चहात असत. मरणसमयीं यांचें वय ७० जवळ असावें. प्रपंचविस्तार मोठा असून यांचे चिरंजीव नारायणराव हे सेशन कोडतांत ६० रुपये पगारावर कारकून आहेत.

मलकापूरच्या शाळेंतली आठवी व नववी या दोन इयत्ता खाजगी देणगीवर चालत आल्या आहेत त्या तशाच पुढें अव्याहत चालविण्या साठीं सभा भरून सतराशें जवळ रु. वर्गणी जमविण्यांत आली व आणखी १२००।१५०० रु० मिळाल्यावर एक जमीन विकत घेऊन तिच्या उत्पन्नावर वरील दोन्ही इयत्तांचा खर्च चालवावा असा इरादा आहे. शेट रुस्तुमजी, काजी बद्रुद्दीन, रा. रा. त्रिम्बक भैराळ, वासुदेव बळवंत, संपतराव, रावजी राघव, दामोदर हरी इत्यादि गृहस्थांनीं या कामांत पुढाकार घेतला आहे.

चिखलीचे नायब तहशीलदार रा. रा. रामराव गोविंद यांजवर तेथील लायब्ररीच्या पैशांत अफरातफर केल्याच्या आरोपावरून फौजदारी चालू आहे. कलम ४०६ प्रमाणें फिर्याद असून ती वाचविण्याच्या खर्चासाठी लायब्ररी १०० रुपया पर्यंत गहाण ठेविली आहे. घरांतल्या घरांत खटला मिटविणें शहाणपणाचें नव्हतें काय?

बाळापूरच्या केशवदास गुजरावरील अपकारी प्रकरणांतला खटला अखेर मि. अजिजुद्दिन यांचेच कोडतांत चालून आरोपीस १५० रुपये दंड झाला.

रा. रा. वासुदेव सदाशीव पिसोळकर यांच्या पत्नी सौभाग्यवती सत्यभामाबाई यांस बाळंतपणांत सूतिकावायु होऊन गेल्या सोमवारीं देवाज्ञा झाली. मुलेंबाळें मातृछत्राला अंतरलीं व संसाराचा बिघाड झाला ही गोष्ट वाईट झाली!

आभारपूर्वक स्वीकार—महाराष्ट्र कोकिल (जुलई व अगष्ट); मासिकवृत्तमाला (अंक १ वर्ष १); आर्यभिषक् (सप्टेंबर); शेतकरी (जुलई); वाशीम–(क्ष); अडगांवकर–(क्ष); भिषग्विलास (सप्टेंबर); आणि चिखली—लायब्ररीचे पोसिंग (उशिरां पोंचलें).

नांदगांवकाजी–'मित्र' (खरी सही पाहिजे) येथील लोकल फंडा कडील कारकून जिल्हा बोर्डाच्या अगर डेपुटी कमिशनरच्या ताब्यांत असावे या संबंधानें उभयतां मध्यें लढा पडला होता त्यावर अलीशान रेसिडेंटांनीं निकाल केला कीं ८०,४०,व३० अशा पगाराचे तीन कारकून डेपुटी कमिशनरकडे असावेत आणि ३० रुपयांचा लोकल फंडाचा व २५चा एज्युकेशनल असे दोन कारकून जिल्हा बोर्डाकडे असावेत.

मि. नामदारखा असि० पोलीस इन० चांदूर–मूर्तिजापूर, यांची बदली बुलढाणें जिल्ह्यांत झाली.

काल सायंकाळीं येथील 'बाबुजी देशमुख ल्यायब्ररीं'त रा. रा. गंगाधर नारायण घाटे बी. ए. यांचें 'जमिनी वरील सारा ह्मणजे काय व तो वाढल्यानें उत्पन्नाची किंमत कमज्यास्त होते कीं काय?' या विषयावर व्याख्यान मालतलें आठवें व्याख्यान झालें.

---

## वर्तमानसार.

मुंबई इलाख्यांत मिठावरील कराचें उत्पन्न गतवर्षा पेक्षां चालूं सालीं पंचवीस लाख रुपये अधीक झालें असें प्रसिद्ध झालें आहे.

मि. डिग्बी हे यंदाच्या राष्ट्रीय सभेस अलाहाबादेस येणार.

महाराज गाईकवाड सरकार आणखी ३ महिने इकडे न येतां विलायतेसच रहाणार.

एका इटाली गृहस्थानें अशी एक युक्ती शोधून काढिली आहे कीं, मेणबत्ती तोफेंत घालून उडविली असतां तिचा उजेड एक लाख मेणबत्यांच्या उजेडा इतका पडावा.

एका मनुष्यानें एक उडण्याचें यंत्र शोधून काढलें आहे. त्याचा प्रयोग तो येत्या आक्टोबर महिन्यांत कलकत्ता शहरीं करून दाखविणार.

यंदाही रशियांत दुष्काळ पडेल असें अनुमान आहे.

पुण्याचे आसपास टोळांचीं धाड आल्यामुळें शेतकऱ्याचें नुकसान होत आहे.

हल्लीं सरकारी सेव्हिंग ब्यांकेंत ७५,६०,५८ ९-१४-४ रुपये आहेत असें गेले सरकारी ग्याझिटांत प्रसिद्ध झालें आहे.

महाराष्ट्र मित्र.

तयारी—गिलनिट येथें ४५,००४ मण धान्य पोहोंचवावयाचें आहे, पैकीं १५००० बनजी येथें जाऊन पोहोंचलें आहे. सपटंबर अखेर गिलनिट येथें सगळें धान्य पोहोंचविण्याची जय्यत तयारी चालूं आहे.

अर्जुन जात— नागा जातीचे लोक पाली, सर्प, आणि कुत्रीं खातात, पण गाईचें दूध पीत नाहींत असें ह्मणतात.

थोड्या दिवसांपूर्वीं डाव्हर येथें ८० टन वजनाच्या तोफेंतून गोळा सोडला, तो जवळ जवळ सात मैल लांब गेला.

शूभ सूचक.

सोलापूर येथील यूनियन क्लबमध्यें जी कान्फरेन्शिआनी [ संभाषण सभा } झाली, तींत राव ब. चिंतामण नारायण भट यांणी आपल्यांतील विवाहपद्धतींत चार प्रकारची सुधारणा झाली पाहिजे असें सांगितलें. लग्नांत फाजील खर्च करणें आणि मुलीच्या बापापासून हुंडा घेणें हे दोन प्रकार बंद होण्याला सामाजिक शिक्षण जास्त वाढलें व लोकांना पैशाचा योग्य उपयोग समजला पाहिजे. एकाच जातीच्या पोट जातींत परस्पर विवाहाची प्रवृत्ति होण्याला जातिभेदांत धर्माचा किती भाग आहे हें समजलें पाहिजे. तथापि एवढ्यानें देशहिताला मोठीशीं मदत होईल असें नाहीं. योग्य वधूवरांचा विवाह घडून येण्यास अंमळ सोईवार होईल एवढेंच काय तें. परंतु देशांमध्यें जो मत्सर भाव वाढला आहे तो किमाकमी होण्याला निरनिराळ्या जातीमध्यें सोईकर असल्यास बेटी व्यवहार आणि रोटीव्यवहार सुरू झाला पाहिजे. निदान जितक्या जाती शिक्षणानें, स्वच्छतेनें आहारविहारानें आणि व्यवसायानें सरासरी सारख्याशा वाटतात तितक्यामध्यें तरी हा प्रकार सुरू झाला पाहिजे. ज्यांच्या मध्यें सुद्धां अनेक तऱ्हेनीं पुष्कळ परस्पर भेद दृष्टीस पडतो त्यांच्यामध्यें असा प्रकार घडण्याचा प्रतिबंध मत्सरास कारण होत नाहीं. पाश्चात्य देशामध्यें सुद्धां एक प्रकारचा जातिभेद आहेच; आणि तो असून ही तेथील राष्ट्रीय हिताला व्यत्यय येत नाहीं. याचें खरें कारण हेंच होय.

क० त०

म्हैसूर संस्थानांतील उद्योगधंद्याचें प्रदर्शन शिकागोच्या जगद्यात्रेंत करण्याचा संस्थानचा विचार आहे. योग्य !

बंगलोर व म्हैसूर येथील म्युनिसिपालिट्यांना स्थानिक स्वराज्याचा अधिकार संस्थानाकडून देण्यांत आला आहे. फार चांगलें.

शिक्षक लोक फार बोलले असतां त्यांच्या घशाला एक प्रकारचा विकार होतो, असा एका डॉक्टरानें शोध लावला आहे. मोठ्यानें बोलणाऱ्या शिक्षकांनीं लक्ष्य द्यावें !

मि० अंड्रयू कार्नेजि या गृहस्थाची इस्टेट ९, ५०, ००, ००० साडेनऊ कोटि रुपयांची आहे. आणि ती सर्व आपल्या हयातींत भूतदयेच्या कार्यार्थ खर्च करून टाकण्याचा त्यांचा विचार झाला आहे. आमच्या इकडे असा कोणी महात्मा आहे काय! करम०

मुंबई मि. एच. ए. हामरजी यांनीं हायकोर्टामध्यें ३८ लक्ष रुपयांबद्दल नादारी अर्ज केला होता; परंतु तो अर्ज नामंजूर होऊन त्यांनां १५ महिन्याच्या कैदेची शिक्षा दिली.

येत्या नाताळांत अलाहाबाद येथें भरणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांचे जागीं ऑ. मि. दादाभाई नौरोजी यांची योजना व्हावी असें मद्रासच्या हिंदू पत्रानें सुचविलें आहे. ही सूचना विचार करण्यासारखी आहे खरी.

पुढील सालीं शाहाबाद जिल्ह्यांत उमराव गांवीं शेतकीचें प्रदर्शन भरणार आहे असें समजतें.

सु०

देवाच्या घरचा ग्यास— क्युबा येथें काजव्यासारखे किडे आहेत, हे दोन इंच लांब असतात. काजव्याप्रमाणें पण त्यांच्या पंखांवर कांहीं तेज आहे. तिकडचे लोक हे १० । २० किडे एका पिंजऱ्यांत ठेवुन टांगून देतात ह्मणजे रात्रीं वाचण्याला छान दिसतें.

कलकत्ता युनिव्हर्सिटींत बी. ए. ची डिग्री मिळालेल्या एका विद्वान बाबू व घरांतील मोलकरणीशीं अयोग्य वर्तन आढळून आल्यावरून त्यांची मातुश्री त्यांस नीतीपर दोन बोधाच्या गोष्टी सांगावयास गेली, तें त्यांस न रुचून त्यांणीं मातोश्रीस यथेच्छ जोड्याचा मार देऊन वरांतून हाकलून दिलें! याबद्दल हल्लीं म्याजिस्ट्रेट कोर्टांत फिर्याद चालूं आहे. मिठावांचून पक्वान्नास रुची नाहीं. तशी विद्वत्तेस नितीवांचून शोभा नाहीं.

आग्रा येथील यमुनेवरच्या पुलाचा कांहीं भाग कोसळत पडला आणि कित्येक माणसें, गाड्या, उंटे वगैरे नद्यार्तुप्यन्तु झालीं.

मद्रास व मद्रासच्या आसपास भारी पाऊस पडत असल्यामुळें तेथील नद्यांस महापूर आले आहेत.

बंगाल्यातील कापसाची लागवड चालुं वर्षांत पाऊणपटीनें कमी झाली असें सांगतात.

चीनच्या उत्तरभागांत महापुरानें फार नुकसान करून पुष्कळ माणसेंही ठार झालीं.

चीनांतला चहा युरोपांत सालोसाल जास्त जात आहे. गुदस्ता ८९ लाख पौंड गेला व यंदा ९३ लाख पौंड गेला. हिंदुस्थानचें धान्य मात्र युरोपांत जास्त जात आहे व त्यामुळें कांहीं दिवस युरोपांतल्या कित्येक देशांच्या माहीखान्यांचा अधिकार हिंदुस्थाकडे येण्याचा संभव आहे.

सागर येथें सवासात फूट लांबीचा एक सर्प नुकताच मारला गेला. सहाफुटीपेक्षां जास्त लांबीचा सर्प पूर्वीं कधीं आढळला नव्हतां, पण हा वरील सर्प माणसापेक्षांही जास्त लांब होता.

अफगाणिस्थान व चीन यांच्या सरहद्दीवर दरिद्री रशियन लोकांची वसाहत करण्याचा रशियाचा विचार असून त्या बद्दल खल चालला आहे असें सांगतात.

अफगाण व तुर्कस्थान व काबूल येथें पटकीचा वाखा जारीनें चालू आहे.

हजारा लोकांचा दंगा चालूच आहे व अरकंझ व दुराणी लोक अमिराच्या तर्फेचे होण्यास ना कबुल आहेत.

अफगाणिस्थानांतून फरारी होऊन येणाऱ्यांस तुह्मी ठेवून घ्या व त्यांची चांगली व्यवस्था ठेवा असा ट्रान्स कस्पियन येथील रशियन कामदारांस रशियाचा हुकूम झाला आहे असें सांगतात.

अफगाणिस्थानांत हीरात, काबूल, व दुसरीं कांहीं मोठालीं ठिकाणीं येथें पटकीचा वाखा जारीनें चालू झाला आहे.

मि. लेबोचर यांस प्रधान मंडळांत घेऊं नये असें राणीसाहेबांचें मत असल्याची बातमी खरी आहे असें सांगतात.

इंग्लंडच्या व्यापाऱ्यावरकांहीं नवा कर बसविण्याचा प्रसंग येणार असें त्या खात्याचे मुख्य मि मुंडले यांचें अनुमान आहे.

ठा० अ०

## जाहिरात

—— ० ——

अहो स्वदेश बांधवहो, परदेशी औषधी नुसत्या रंगबाज व कमिशन जास्त पाडून कां फसतां? इकडे थोडें लक्ष द्या.

आमचे दवाखान्यांत सर्व रोगांवर औषधी विक्रीस व दरिद्री लोकांस फुकट तयार आहेत; परंतु त्यांत ज्या हटकून गुण खात्रीनें देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जी दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्यावर पत्र पाठवावें. ह्मणजे आम्ही व्ह्याल्युपेबलनीं पोस्टमार्गें लवकर पाठवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरुस्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमिशन देऊं. व त्यांनीं विक्री करून दाम पाठवावें.

१ गजकर्णावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ८ आणे.

२ मूळव्याध कितीही दिवसांची दुर्धर असेल त्यावर मोडावर लावण्याचे व पोटांत घेण्याचें दोन औषधी मिळून किं. १॥ रु.

३ चातुर्थिक ज्वर ह्मणजे चवथारें हिंव ताप त्याच प्रमाणें तिजारे, व दररोज येणारे कितीही दिवसांचे असो, त्याजवर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. किं. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्याच्या डबीस १८५ या औषधानें कडक तापही जातो.

४ परमा तिडिक व स्वप्नावस्था, व कोठ्यांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहूणपुडा किं. १ पुड्यास ८१४ आणे.

५ बाळंत रोग बाळाचे डबे व सटवी बाधा व प्रदर सर्व तऱ्हेचा किं. १ डबीस १॥ रु.

६ वीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास किं. २॥=

७ नारुवर ९ दिवसांत गुण. लावणें व खाणे याच्या डबीस किं. ।

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट शुळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस किं. ॥।

जुलाब उत्तम राजस तकलीफ अगदीं नसून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल किं. १। रु.

१० मेदोरोग व घुरें व उन्माद यावर अगदीं जल्द गुण १ बाटलीस किं. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्राव व ऋतुस्नात होण्यास व गर्भधारणास बंदेज ह्यांवर हें एकच औषध फार चांगलें आहे. १ डबीस किं-१॥

१२ पिनस व मस्तकशूळ व अर्धशिशी याजवर दर डबीस किं. १८=

१३ हागवण व अतिसार १ डबीस किं. १।=

१४ वृषण एकारल्यास व वृद्धीस डबीस किं. १ रु.

१५ कावरले कुत्रें व कोल्हे व वेडया उंदीर डसल्यास १ डबीस किं. १। रु.

१६ मेहानें अगर उष्णतेनें पाय उलून रक्त जाणें व संधि दुखणें ह्यावर १ डबीस किं. १॥ रु.

१७ महामारीवर अगदीं जलद गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ५० गोळ्याच्या डबीस किं. १८—

१८ गर्मी उर्फ उपदंश संबंधी विकार क्षतें यांजवर १ डबीस किं. १॥ रु.

१९ फसली उर्फ मज्जागतवात व शूळ याजवर लवकर १५ मिनिटांत गुण १ डबीस किं. ·॥· हें १५ मनुष्यांस पुरेल.

२० कऊळ, नळगुद, पंडु, सूज व मुखरोग ६५ व सन्निपात १३ यांवर १ डबीस किं. १॥ रु. ही ३ मुलें व २ पुरुषांस पुरेल.

२१ सुवर्णमालिनीवसंत खात्रीचा १ तोळ्यास किं. ७ रु.

२२ योगराज गुगुळ १ तोळ्यास ४॥ रुपये.

२३ नामर्द ह्मणजे नपुंसक कितीही दिवसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त खात्रीनें होईल. १ बाटलीस किं. ३ रु. गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोळ्यांतील फूल पडस रातांधळें लाली खुपरी चुळ चीपडे गळती याजवर १ डबीस किं. १८६

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेश मागवून विक्री करील त्यांनीं विक्री करून पैसे मागाहून पाठवावे.

(पता व सही) शिवचरनगीर रामगीर
कुरणखेडकर अकोला गंगावरचे
माडीवर चौकांत दवाखाना.
वऱ्हाड.

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची आगाऊ रु० ५ डांक हाशील ०।१३
साहामाही ,, ३ ,, ०।८
सालअखेर ,, ७ ,, १।०।८
किरकोळ अंकास ........................०।४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।१।०।६
दुसरे खेपेस .........०।१

Rs.
Annum in advance 5 Postage 13 as
Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 ,, 8 as
Single copy..........................................4as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

VOL XXVI AKOLA MONDAY 12 SEPTEMBER 1892 NO 36

वर्ष २६ आकोला सोमवार तारीख १२ माहे सप्टेंबर सन १८९२ इ० अंक ३६.



डा० वामन गोपाळ यांचा
सार्सपरिला

ह्या सार्सपरिला अनेक रोगावर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे. उपदंशजन्य विकार (गरमी) व तिजपासून होणारा पक्षवातादी भयंकर रोग संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हातपायांच्या तळपांवर व सर्व शरीरावर काळे डाग पडणें संधी दुखणें, कळा लागणे, सूज येणें सर्व संधिगत वायूवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग जसे सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातपायांची आग, होणें, तसेंच रसायनें वक्च्या पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दुषित झालें असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखें दुसरें औषध नाहीं दर बाटलीस किंमत १। रुपया. पोस्टेज ४ आणे, उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक, धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या,
गोळ्या

या पासून अतिशय विषयोपभोग नित्य धातुस्राव यानें झालेली क्षीणता जाऊन कडकी, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तात्काळ नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जा (मेंदु) व मज्जतंतु याच्या मंद झालेल्या सर्व क्रियाचें पुनरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायूंची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे बंगी व पोष्ट मिळून एका पासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा
कल्प.

हा कल्प प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें, सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रु० पोष्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधा सोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता—नव्याठाकूर द्वारासमोर.


## पत्रव्यवहार

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

मुक्काम वाशीम ता० २-९-९२ इ०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

कृतानेक सा० न० वि० वि० प्रकृती नीट नव्हती यामुळें आपल्या भेटीस बऱ्याच दिवसांत येणें झालें नाहीं. पर्जन्यानें पाठ पुरविली. शेती अगदीं खराब झाली. शेती लोक मोठ्या काळजींत आहेत. उवाडी न झाल्यास खरीपाची पिकें अगदीं बिघडून दुष्काळ पडेल अशी भिती वाटूं लागली आहे. वांटावर ३३ इंच पाऊस असला कीं, सर्व गोष्टींची अबादानी होतें असें ह्या जमिनीचें मान आहे. परंतु आज पर्यंत ४२ इंचांवर पाऊस होऊन गेला. अजून पावसाळा शिल्लक आहे. तेव्हां किती इंचावर धांव जाणार कोण जाणें. अती वृष्टीमुळें बहुतेक घरें धाब्याचीं असल्यामुळें गळून बसण्यास जागा नाहीं. पडापड सुरूं झाली आहे. तात्पर्य पावसाचा अगदीं त्रास येऊन गेला आहे.

कंपनीच्या दुकानासंबंधानें मागें आपल्या पत्रांत मजकूर आला होता. त्यावर असें समजतें कीं, भागीदाराकडे जी रकम उधारी होती ती त्यांनीं भरण्याची सुरवात केली आहे. कित्येकांनीं रकमा आणून दिल्या व कित्येक देण्याच्या विचारांत आहेत. दुकान मोडत नाहीं असें ह्मणतात. व असेंच झाल्यास ह्मणजे न मोडल्यास व्यवस्थापकांची जितकी तारीफ करावी तितकी थोडीच. कित्येक जुना माल मोठ्या किमतीचा पुष्कळ दिवसात विक्री झाली नाहीं अशा दोनशे रु० मालाची सोडत काढली आहे. कित्येकांस आश्चर्य वाटत आहे कीं अशा कंपनीच्या दुकानांतील मालाची सोडत कढण्यास हरकत आहे कीं काय? मला वाटतें ज्या अर्थीं ही कंपनी रजिष्टर झालेली नाहीं त्या अर्थीं ह्या कामीं सरकारची परवानगी नको आहे. ह्या गोष्टीचा विचार करणें व्यवस्थापकाकडे आहे. त्यांना योग्य वाटल्यास करतील.

येथें संगीत नाटककार मंडळीचा चार महिने मुक्काम आहे. त्यांनीं आपल्या गरजे प्रमाणें पत्रे घालून लहानसें नाटकगृह तयार केलें आहे. नाटकांतील पात्रें बहुतेक पगारदार आहेत. मालक निराळे आहेत. त्यांनीं नाटकार मंडळीची चांगली व्यवस्था ठेविली आहे. बुधवार व शनिवार ह्या दोन दिवशीं खेळ व्हावयाचे परंतु साल मजकुरीं पावसाळा फार जोराचा असल्यामुळें नियमित खेळ चालत नाहीं. नाटकाच्या भागीदारांनीं भावी फायद्यावर नजर देऊन खर्च चालविला आहे असें समजतें. चार पांच नाटकपात्रें फार गुणी आहेत. त्यांनीं संगीत वेणीसंव्हार नाटकाचा प्रयोग करून दाखविला. हा पहिल्यांदाच असल्यामुळें चांगला वाटणार नाहीं असें वाटत होतें. परंतु पहिल्या पासून शेवट पर्यंत सर्व पात्रांचीं कामें चांगलीं झालीं. त्यात विशेषें करून भानुमती, धर्मराज, भिम व द्रौपदी यांचीं कामें तर फारच फार तारीफ करण्या जोगीं झालीं. ही मंडळी दिपवाळी पर्यंत येथें रहाणार आहे. व यांच्या योगानें संगीताचा स्वाद मार्मिक-रसिक-जनांना तल्लीन करून सोडीत आहे. विक्रमोर्वशी हा खेळ करून दाखविला, परंतु ह्यांत वेणी—संहारा प्रमाणें रसिकता नसल्यामुळें प्रेक्षकांना तितकें तल्लीन करून सोडिलें नाहीं. शांकर दिग्विजय बसविण्याचें काम चालूं आहे असें समजतें.

ईश्वरभक्तिपरायण वे० शा० सं० जैकृष्ण बावा यांचे श्री बालाजीचें मंदीरांत रोज सायंकाळीं पुराण होत असतें. हल्लीं श्री भारताचा पाठ चालूं आहे. अधींच भारत नाना प्रकारच्या रसभरीत गोष्टींनीं ओतप्रोत भरलेलें तशांत निःसीम निरपेक्ष भक्तांच्या अस्खलित वाणीनें त्यांचें पुराण. मग काय विचारतां? लोहचुंबक लोहाला जसा आकर्षितो त्याप्रमाणें श्रोत्यांना भारतांचें साधू मुखानें चाललेलें पुराण आकर्षितें. मंदिरामध्यें एक अंगुलीभर शिरकावण्यास ही जागा नसतें. तरुण व वृद्ध बायका व पुरुष शिवाय मुलांची अतोनात गर्दी. बायकांच्या समुदायाकडे अवलोकन केल्यास कानांनीं पुराण श्रवण करणें व हातानें वार्ता करण्याचा व्यवसाय चालूं असतो. कित्येक इकडे तिकडे टकमक पहात असतात. काय पहातात कोण जाणे! जे लोक बायका अगर पोक्त पुरुष पुराणा करितां मंदीरांत जातात त्यांना तें लक्ष्यपूर्वक जर ऐकता येत नाहीं तर त्यांनीं शोभेकरितां नुसतें जावें तरी कशाला? पुराणाचा मुख्य हेतु असा असावा कीं जे (लोक स्त्रिया अगर पुरुष) संसार तापानें पिडून गेले असतील त्यांनीं व ज्यांचीं मनें संसारसुखाचा अनुभव घेऊन संसारांतून विरक्त झालीं असतील त्यांनीं अखेर जिविताचा सदुपयोग करण्या करितां किर्तन पुराण श्रवण करावें. असा हेतु परंतु तो विसरून जाऊन ऐन तारूण्याच्या भरांत स्त्रिया अथवा पुरुषांनीं आपलें मन अशा परमार्थाच्या गोष्टी कडे ओढून ताणून लाविल्यानें विरक्तां प्रमाणें फलप्राप्ती होणें कठीण. पुराण श्रवणाचा योग्य-काळ ह्मटला ह्मणजे अगदीं वृद्धापकाळ होय—ज्या वेळीं अधीक सुखांतून अगर गोष्टींतून मन अगदीं उद्विग्न झालेलें असतें. माझें ह्मणणें कोणी पुराण ऐकूं नये असें नाहीं. परंतु तें ऐकण्यास आपण योग्य आहोत असें वाटल्या खेरीज त्यापासून फायदा होत नाहीं. मागें प्रल्हाद अण्णा येथें असत. पुराण सांगण्याचें कामीं त्यांची किर्ती असे. भागवत तर त्यांनींच सांगावें असें लोक ह्मणतात. परंतु आमच्या दुर्दैवानें ते हा गांव सोडून उमरी तालुके मंगरूळपीर येथें गेले. जैकृष्ण बावांनीं त्यांत कांहीं उणें पडूं दिलें नाहीं. यांचे मध्यें साधुत्व परिपूर्ण वसत आहे. पुर्वीं तुकाराम नामदेव व एकनाथ वगैरे साधु होऊन गेले तो काळ तसाच होता त्यांच्या मालिकेंत बसविण्या सारखी जैकृष्ण बावांची वृत्ती झाली आहे.

येथील नेटिव लायब्ररीची उधारगती घेण्याची वेळ येऊन ठेपली आहे. म्यानेजिंग कमेटींत जर परकी लोक आहेत तर त्यांचे म्हणण्या प्रमाणें वागणें हें रास्त आहे त्याच्या धर्मा प्रमाणें रविवार हा दिवस विश्रांतीचा आहे. त्यांच्या धर्मा प्रमाणें त्या दिवशीं ईश्वर भजना शिवाय कोणतें ही काम करीत नाहींत. ईश्वरानें आपलीं सर्व कामें सपऊन त्या दिवशीं विश्रांती घेतली आहे. असें जर आहे तर जनरल कमीटिचा दिवस रविवार नेमून एखाद्याचें मन दुःखविणें हे सुज्ञ असतील त्यांना योग्य नाहीं. आमच्यांत जसा धर्म कित्येकांस आवडत नसला म्हणजे त्यांच्या बरोबर इतरांनीं आपला सोडावा कीं काय. ह्याची हकीकत मागाहून देऊं.

आपला
"क्ष"

रा. रा. 'वऱ्हाडसमाचार' कर्ते यांस

वि० वि० माझ्या फिरण्यामध्यें मी अडगांव जवळील सिरसोळी मुक्कामीं गेलों. सन १८०३ मध्यें लढाई झाली ती आडगांव व सिरसोळी यांच्या दरम्यानच्या ठिकाणीं झाली. गांव लहानसा असून टुमदार आहे. गांवांत नवीन मारुतीचें देवालय बांधण्याचा कारखाना चालला आहे. सर्व खर्च गांवकरी व पटवारी रावसाहेब गणाजी पंत व तुकाराम नामदेव याचा आहे. कार्तिक वद्य ८ मीस गेल्या वर्षीं पहिला उत्साह झाला पांच हजार पात्राचें अन्नदान होत असतें असें म्हणतात. अन्नखर्चां प्रीत्यर्थ मशारनिल्हे गणाजी पंत यांच्याच कडून ३०० रुपये पोंचतात कळावें तारीख ६।९।९२

आपला
'फिरस्ता'

अडगांव ता. २-९-९२

येथे नेटिव जनरल लायब्ररी स्थापन झाल्या बद्दल पूर्वीं कळविलेंच आहे. सदरहु लायब्ररी संबंधी रा. रा. रामरावजी देशपांडे यांचे खटपटीस रा. रा. बळवंतराव देशपांडे यांणीं पूर्ण मदत दिली. व ह्या उभय गृहस्थांचें जर सारखें लक्ष्य लायब्ररीकडे राहील तरच ती चांगल्या प्रकारें भरभराटीस येईल.

रा. रा. रामरावजी देशपांडे व दुसरे कांहीं गृहस्थ यांचे आग्रहा वरून रा. रा. बळवंतरावजी "तात्यासाहेब" देशपांडे यांणीं आपले बगीच्यांतील देवालयांत जागा लायब्ररी करितां दिली. सदरहु देवालय नवीन बनत असल्यानें देवालयाचें काम नवीन धर्तीवर व फार मनोवेधक होत आहे. लाय-

ब्री करिता जो देवालयांतील भाग देण्यांचें ठरलें आहे त्याचें काम मोठ्या झपाट्यानें तात्यासाहेब देशपांडे यांणीं सुरू केलें आहे हें त्यांस भूषणास्पद आहे. उत्तम प्रकारें जागा तयार होऊन त्या ठिकाणीं छपत्री जाण्यास सरासरी एक महिना लागेल. सदरहु छापत्री चिरकाल चालो अशी देवा जवळ सविनय प्रार्थना आहे.

येथें गोरक्षणसभा असून तिचें काम रा. रा. अमृतराव गोपाळराव देशपांडे यांचे अध्यक्षत खालीं चालूं आहे ह्या कामीं रा. जीतमलजी मारवाडी यांची पूर्ण मनः पूर्वक खटपट आहे व सदरहु गृहस्थांचें लक्ष सत्कृत्याकडे विशेष आहे. सदरहु सभेचे फंडातून गायी टेवण्या करिता वाडा बांधला असून चाऱ्याची वगैरे सोय उत्तम प्रकारें केलेली आहे. सदरहु बद्दल तपशीलवार माहिती पुढें देईन.

वऱ्हाडांत वतनदार सभा स्थापित होऊन बरेच दिवस झाले परंतु त्या सभेची बिलकूल चळवळ दिसत नाहीं त्या अर्थी सदरहु सभासद गाढ झोंप घेत आहेत असें दिसतें. ह्या सभेची अशी स्थिति होईल असें आह्मास वाटत नव्हतें. परंतु तिची ही शोचनीय स्थिती पाहून आह्मास फार वाईट वाटतें. अशी स्थिती ह्या सभेची राहणें ह्मणजे मुत्सद्दी व वतनदार ह्मणविणाऱ्या जमिनदारांस फार काळिमा आणण्या सारखें आहे. करितां आतां आमची जमेदार मंडळी ऐष आराम व आळस सोडून महत्वाचें कामीं लक्ष पूर्वक दक्षतेनें झटोत अशी आह्मी उमेद बाळगतों.

आपला एक बातमीदार

( क्ष )

---

# वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य ६ शके १८१४

---

सन १८९१—९२ सालचा रजिस्ट्रेशन रिपोर्ट सालाबाद प्रमाणें आह्माकडे आगष्टच्या १७ वे तारखेस आला. त्याचा आभारपूर्वक स्वीकार करून त्यांतील ठोंकळ ठोंकळ माहिती मराठी वाचकां करितां रिपोर्टाच्या पद्धतवारीनें आह्मी खालीं देतों.

कर्नल लेन साहेब रजिस्ट्रेशन खात्याचे मुख्य यांनीं हा रिपोर्ट लिहिला असून तो त्यांच्या नियमा प्रमाणें सविस्तर, मुद्देसूत आणि वक्तशीर असा आहे. सन १८९१—९२ त रजिस्ट्रेशन खात्यामध्यें ६ डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार, ४२ पगारदार सब-रजिस्ट्रार, २ तहशिलदार—रजिस्ट्रार, १ आनररी माजिस्ट्रेट—सबरजिस्ट्रार आणि १२ रुरल कमिशनवाले सबरजिट्रार मिळून ६३ अधिकारी नोंदणीच्या कामावर होते. तिवसें, आमरपूर, व कळम्ब या तीन ठिकाणीं सब रजिस्ट्रारच्या नव्या कचेऱ्या स्थापल्या आणि वणी, यवतमाळ, दारव्हा, व मंगरूळपीर येथील तहशिलदारांस रजिस्ट्रारचें काम करावें लागत असे तें काम या सालीं दर महिना ११५रुपयांचा खर्च वाढवून स्वतंत्र पगारदार रजिस्ट्रारकडे सोंपविण्यांत आलें, तरी पांढरकवडा व चिखल्दा येथील तहशिलदारां कडेच रजिस्ट्रेशनचें काम आहे बाकी तेथें नोंदणीचीं कामें पुष्कळ होत नाहींत ह्मणून त्याच्या उत्पन्नावर सबरजिस्ट्रारच्या पगारांचा खर्च भागण्या सारखा नसतो. लोणार व नांदगांवकाजी येथें कमिशन देऊन रुरल सबरजिस्ट्रार कडून नोंदणी काम होत होतें तें बंद करून तेथें पगारदार अधिकारी नेमले. नोंदणी खात्याचा फैलाव सर्व प्रांतभर मोठ्या जारीनें होत चाललो आहे व उत्तरोत्तर त्या खात्याचा उपयोग पुष्कळ लोक करू लागून नोंदणीचे व्यवहार वाढत्या कलेवर आहेत आणि सरकारची थैली यथास्थित भरपूर भरली जात आहे. गुदस्त सालीं कमिशनर मि० फ्रीडन यांनीं म्हटलें होतें कीं इतर प्रांतांशीं तुलना करून पाहतां वऱ्हाड प्रांताचें नोंदणी खातें लोकसंख्या व क्षेत्रफळ या मानानें फार विस्तृत आहे असें हिंदुस्थान सरकार ही कबूल करितात. हल्लीं ४५९८५ लोकसंख्ये मागें अगर २८१ चौरस मैला मागें एकेक रजिस्ट्रेशन कचेरी असें प्रमाण दृष्टीस पडतें.

कायद्यानें जे दस्तऐवज नोंदणें भाग आहे असे दस्तऐवज सन १८९१—९२ त १२१२९ नोंदले गेले आणि ज्यांची नोंदणी विकल्पें चालते असे ६६०२ होते. एकूण १८८६८ दस्तऐवज १३७ मृत्युपत्रासकट भरले. गेल्या दहा वर्षांत पहिल्या प्रकारच्या दस्तऐवजांची संख्या दीडपटीहून अधीक वाढली आहे. दुसऱ्या प्रकारच्या संख्येंत फार मोठा फरक दिसत नाहीं. मध्यंतरीं १८८९—९० सालीं नोंदणीच्या कामाला मोठी भरती आली होती आणि त्या नंतर थोडी ओहटी लागलीशी दिसते तरी एकंदरीनें या खात्याची स्थिती संतोषकारक आहे. खरेदीखातें, गहाणखतें वगैरे शंभर पुढील किंमतीची १६८७१ झालीं. हा आकडा वाढतां आहे त्यावरून असें स्पष्ट होतें कीं जमीन जुमल्याच्या देवघेवी दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर आहेत. दर वर्षांचे हें चढतें प्रमाण प्रजेच्या सुखसंपत्तीचें द्योतक आहे अगर त्याच्या उलट स्थितीचें आहे हें निश्चयानें कळवितां येणार नाहीं. हल्लीं जमिनी संबंधानें होणाऱ्या व मागें झालेल्या दस्तैवजांची नोंदणी तपासून त्यावरून प्रत्येक सर्वे नंबराची वेळोवेळ झालेली अदलाबदल हकीकतवार कळावी ह्मणून सूचीपत्रक तयार करण्याचें काम चाललें आहे. हें पत्रक तयार झाल्यावर त्यावरून एखाद्या जमिनीची किंमत कसकशी वाढत गेली व हल्लीं तिची विक्री अगर गहाण खरेदी किती रकमेला होत आली हें कळेल आणि सारा वाढविणें झाल्यास तो किती बसवावा हेंही सरकारी अंमलदारास समजेल. या सूचीपत्रकांत प्रत्येक सर्वेनंबराची माहिती मिळेल अशी पृथक् पृथक् व्यवस्था हरएक सर्वेनंबरा संबंधानें केली आहे. हें सूचीपत्रक जसें सारा ठरविण्यास उपयोगी पडेल त्याहून मोठा उपयोग आमच्या मतें असा कीं, जमीन जुमल्याच्या नोंदणी वरून ती इस्टेट वऱ्हाडच्या रयतेच्या हातून सावकार वगैरे लोकांच्या हातांत जात आहे कीं काय व जात असल्यास ती कितपत जात आहे हें कळेल. या माहिती वरून हल्लीं लोकांचा ग्रह वऱ्हाडची प्रजा बुडत चालल्या विषयीं आहे तो कितपत यथार्थ आहे याचें दिग्दर्शन दरसालच्या रिपोर्टांत करण्यास सवड त मिळेल पण या प्रकारची व्यवस्था झाल्यास आमच्या या ह्मणण्याचा उपयोग होण्या सारखा आहे.

जे दस्तैवज नोंदले गेले त्यांवरून ८०, ९९, ७८६ रुपयांच्या किंमतीच्या स्थावर व जंगम जिन्नगीची देवघेव झाली. ही देवघेव गुदस्त साला पेक्षां शेकडा ३.८ प्रमाणानें वाढली आहे. रेजिस्ट्रेशन खात्याच्या बहुविध कामामध्यें सिव्हील प्रोसिजर प्रमाणें ७०१ खरेदी दाखले, जमीन सुधाऱ्याच्या कायद्या अन्वयें ७ दाखले, बेवारशी दस्तऐवज १०० इतक्यांची कायदेशीर विल्हेवाट लावण्यांत आली. २२३ दस्तऐवज नोंदणी अंमलदारा कडून नामंजूर करण्यांत आले.

नोंदणीचें काम फार सत्वर व नीट होतें ही गोष्ट आनंदाची होय. १८८६८ दस्तऐवजापैकीं, पहिलेंच दिवशीं २६७०३ नोंदले गेले. एक दिवसाची उशीर लागला असे ९३९ दस्तऐवज निघाले. एका आठवड्या हून जास्त वेळ लागला असें ९४२ होते.

दरमहाचा रजिस्ट्रेशन खात्याचा खर्च ३२०० रुपये सरासरीनें आहे ह्मणजे नोंदणीच्या फीच्या उत्पन्नाच्या मानानें खर्च शेकडा ५०.४ पडतो १८९१—९२ त उत्पन्न रु० ७०,९४९—११ आणे असून खर्च रुपये ३८१२६—१५—११ पै. होता. प्रजेच्या सोयीकडे लक्ष दिल्यामुळें सरकारला तोशीस लागली असा प्रकार उमरखेड येथील नोंदणीच्या कचेरी संबंधानें आहे. उत्पन्नापेक्षां ११५ रुपये खर्च जास्त पडला तरी देखील उमरखेडच्या आसपांसच्या लोकांना ३० अगर ५० मैल पर्यंत पुसदच्या कचेरीला जावें लागूं नये ह्मणून उमरखेडची कचेरी कायम ठेवण्याचा विचार आहे. इन्स्पेक्टर जनरल कर्नल लेन व त्यांच्या हाता खालील इनस्पेक्टर यांनीं तपासणीचें काम चोख केलें. फक्त उमरावतीच्या डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रारच्या दिरंगाई संबधानें तक्रार आहे. त्यांच्या सुस्ती बद्दल डेपुटी कमिशनर मार्फत विचारण्यांत आलें आहे. शिकंदराबाद येथील नोंदणी खात्याचा हिशोब अमानी मुलुखाबरोबरच ठेवावा लागतो त्यावरून त्याचा नक्की फायदा रुपये १४८८—६ आणे—१ पै. आहे.

---

रा. रा. रामकृष्ण त्रिविक्रम आठल्ये या नांवाचे एक गृहस्थ ब्रह्म देशांत आहेत. त्यांस प्रसिद्ध पुरुष होण्याची युक्ति चांगली सांपडली असें दिसतें. ब्रह्मदेशांत महाराष्ट्रीय लोकांनीं वसाहती कराव्या हा त्यांच्या अवळ पवळ उपदेशांचा मथितार्थ होता. ब्रह्मदेशांत जमीनी पीकाऊ, मुबलक व अल्प किंमतींत मिळतात; व्यापारधंदा फार फायदेशीर असून थोड्या भांडवलावर चालतो; आणि सरकारी चाकरी पगाराच्या मानानें बरी असून ती मिळण्यास फारसे श्रम लागत नाहींत इत्यादि मतलबाच्या गोष्टी वरील गृहस्थांनीं निराधार माहितीनें, कोत्या विचारानें, व गैर समजुतीनें जाहीर केल्या ब्रह्मदेशांच्या अशा जाहीर खबरी वाचल्या नंतर कुबेरनगरी प्रमाणें भासणाऱ्या ब्रह्मदेशा विषयीं सर्वत्रांस स्वप्नें पडूं लागलीं. मनोराज्य करण्यास लोकांनीं आरंभ केला इतकेंच नव्हे तर कांहीं मंडळ्या निघून त्यांनीं आपला मनुष्य तिकडील माहितीचें प्रत्यंतर घेण्या साठीं रवाना केला.

गेल्या 'केसरी'च्या अंकांत आमचे मित्र राजश्री लिमये, भट, व रहाळकर यांनीं आपल्या सहीच्या लेखानिशीं सदरहु सुवर्णभूमीची हकीकत सत्या पासून फार दूर असल्या विषयीं कळविलें आहे. प्रत्येक देशांतच काय पण प्रत्येक प्रांतांत व्यापार धंदा, शेतीभाती, नोकरी चाकरी वगैरेच्या सोया कमज्यास्त मानानें भिन्न भिन्न असतात त्या प्रमाणें ब्रह्मदेशांची गोष्ट असेल ह्मणून ज्यानें उठावें त्यानें कसेंही करून ब्रह्मदेशाचा मार्ग धरावा आणि मग त्याचा चरितार्थ तिकडे चालेलच असें कांहीं निश्चयपूर्वक सांगता येत नाहीं. ज्याच्या पाशीं चार पैसे आहेत. ज्याया जो उद्योगी आहे, व ज्याला चार धंदे माहीत आहेत असा मनुष्य किंवा अशा माणसांच्या मंडळ्या पृथ्वीवर कोठें ही गेल्या तरी तो मनुष्य अगर त्या मंडळ्या निदान खाऊन पिऊन सुखी असल्याच पाहिजेत. त्याच प्रमाणें ब्रह्मदेशांत वसाहत करण्याचें ज्यांना धैर्य धनबळ व उद्योगसामर्थ्य असेल त्यांस ब्रह्मदेश. कदाचित अधीक फायदेशीर होईल यांत संशय नाहीं. परंतु रा. आठल्ये यांच्या लेखा वरून ब्रह्मदेशा संबंधी लोकांच्या मनानें जी धांव घेतली होती ती चुकीची हानिकारक, व धोक्याची होती असें अनुभवाच्या कथा ऐकल्या वरून ह्मणणें भाग आहे. सारांश, मशारनिल्हे आठल्ये भरंवशा लायक माणूस नाहीत आणि लोकांनीं पूर्ण विचारानें ब्रह्म देशाची सफर करावी असें असें आह्मी सूचवितों.

---

चितूर शहरच्या हायस्कूलचा बक्षीस समारंभ झाला त्या समयीं तिकडील शाळाखात्याचें इनस्पेक्टर डाक्टर ब्राडशा यांनीं कांहीं महत्वाच्या गोष्टी कळविल्या त्या सर्वांच्या आदरास पात्र असून विचार करण्या सारख्या आहेत. खाजगी शाळा नव्या नव्या निघतात त्या त्यांस पसंत नाहींत. ते ह्मणतात कीं, युनिव्हरसिटीचे ग्र्याजुएट लोक बहुत करून खाजगी शाळा काढण्याच्या उद्योगांत पुढारी असतात. बहुतकरून त्यांच्या जवळ फंड वगैरे कांहीं नसतो आणि त्यांना दुसरा पोट पूरता चार पैसे कमाविण्याचा धंदा नसतो ह्मणून ते या खाजगी शाळांच्या फंदांत पडतात उपपदधारी विद्वान लोक बरचे गरीब असे फार असतात, त्यांच्या कुटुंबांच्या चरितार्थाचा बोजा त्यांच्या माथीं दिवसें दिवस अधीक पडत असतो, आणि कालेजचें शिक्षण अटोपलें ह्मणजे त्यांना पोटापाण्याची सोय अगोदर पाहिली पाहिजे. तेव्हां अशा गरजूं लोकांस खुले मार्ग काय ते तीन असतात. सरकारची चाकरी पतकरावी, वकिली पतकरावी अगर पंतोजीपणा चालवावा अशा तीन प्रकारच्या तोडी त्यांच्या संसारांतील कोड्यास सुलभ व सोप्या असतात. सरकारी नोकरी उत्तरोत्तर दुर्मिळ होत असून ती मिळविण्याची साधनें त्यांच्या इच्छे बाहेरचीं व अटोक्या पलिकडचीं व विद्वत्तेस न शोभविणारीं अशीं फार असतात.

वकिलीची परीक्षा निराळी दिल्या नंतर तो धंदा आरंभींच चांगला जुळून येत नाहीं. मांडवळ फार नको असतें तरी वकिलाची साख बसून चार कुळें येतील अशी व्यवस्था होण्यास विलंब लागतो. परंतु हल्लीं वकिलींत पैसा बरा मिळतो म्हणून त्या धंद्याला मान असून पुष्कळ विद्यार्थी वकिलीच्या नादीं असतात. वकिलीत जो कोणी पसार नसतो व ज्याला वकिली निदान साधत नाहीं ते शाळा मास्तर होण्यास एका पायावर तयार असतात आणि शिक्षकाची जागा लवकर मिळून संसाराचा बोजा हलका वाटतो.

वर डाक्टर ब्राह्मण यांनीं जें म्हटलें आहे तें आम्हांस पूर्ण संमत आहे. त्यांच्या म्हणण्या प्रमाणें बहुतेक खाजगी शाळांची उपपत्ति असेल असें आम्हास ही वाटतें. हा प्रकार खरा आहे तरी हल्लीं कांहीं कांहीं खाजगी शाळा फार चांगल्या चालल्या असून त्यांच्या स्पर्धेनें ईर्षेनें व उत्कृष्ठ विद्यादानानें शिक्षणाचा प्रसार मोठा होऊन लोकांस शिक्षण ही सवंग मिळूं लागलें आहे. हा फायदा विसरण्या सारखा नाहीं तरी ह्या नव्या नव्या खाजगी शाळा निवतात त्यांच्या पाशीं पुरेसा फंड जमा नसेल तर त्या होईल तितकें करून अविरस्थायी प्रकारानें चालू देऊं नयेत हें ठीक होय.

खाजगी शाळा पासून दुसरा एक तोटा असा दिसून येतो कीं खाजगी शाळा बरीशी चालूं लागली ह्मणजे सरकारची शाळा सरकार बंद करितात. आणि त्या प्रीत्यर्थ लागणारा पैसा इतर धंदे शिक्षणाकडे खर्चीं घालतात असें कधीं प्रत्ययास येत नाहीं. तेव्हां अखेरीस सरकाराची पैशी भरते, खाजगी शाळांतल्या उदाहरणावरून शिक्षकांच्या दुर्दशेचे पगार हलके होतात आणि आपल्याच पैकी जे कोणी सरकारी शाळेंतल्या नोकरीवर असले असते त्यांच्या पोटावर पाणी पडतें.

गेल्या सोमवार पासून पुण्याच्या औद्योगिक परिषदास प्रारंभ होऊन सर्व समारंभ निर्विघ्नपणें शेवटास गेला चालूं साली. त्याच्यानें गुदस्त साला पेक्षां अधिक झाली इतकेच नाहीं तर त्या संस्थेला चिरस्थाईपणा येऊन तिचीं कामें उपयुक्तेला धरून होत जातील अशी आह्मांस उमेद येत आहे. या परिषदाची समग्र माहिती विस्तारपूर्वक देणें विशेष फायदेशीर वाटल्या वरून आह्मी तें काम पुढील एखाद्या खेपे पर्यंत लांबणीवर टाकतों.

## The Berar Samachar

**MONDAY SEPTEMBER 12 1892**

We express our heart-felt thanks to the Resident Mr. Plowden for his right and liberal measure to afford a lending hand to the Ryot in his hours of need and distress. When people complain of the hard dealings which the money-lending Shylock adopts and when Sir W. Wedderburn invites Government to found Agricultural banks Mr. Plowden goes half way to relieve the peasantry from the revolting and rampant usury that prevails in the village circles and to institute some fund on which the solvent agriculturist can draw at a law rate of interest. The charm of his work is that when he takes up a thing to do he does it with despatch and in a thorough-going manner. From his last Revenue report we learnt that he first satisfied himself that there is a very limited scope under the Land Improvement Act XIX of 1883 which affords a loan at a moderate interest when a land-holder requires to borrow money on some special works as wells, reclamation and others of a similar nature. His experience and study of the subject led him to conclude with Sir Donnis Fitz-Patrick that there were natural causes enough that made impractical and inconvenient the easy and rapid application of the above Act. The villagers are fully aware that advances can be had under some specified circumstances but as a rule no such circumstances present themselves in the majority of cases to facilitate the making advances to a large amount. Mr. Plowden did not rest inactive. He clearly observed that the peasants are almost deeply & hopelessly in debt. A villager is a bond-slave to his money-leander. It was evidently manifest that he could hardly arrange to help those who could not help themselves. There is still a middling class of peasants who live from hand to mouth and are hard pressed in the season of field-work before they can reap the harvest. Their little earmings can not cope with their wants of a future day and they borrow money at a rate of not less than 24 percent interest. Such a heavy interest deprives them of the fruit of their labour & bring him & his family to a state of living on a half-meal or something like it. It is for such people, we think, that the Resident's new measure is meant to grant a loan to free him from the grasp of his usurping creditors.

The Residency Orders of the 1st idem contains the rules which theResideut has framed under the Land Im-provement Loans Act of 1884. Before we call below some of the important sections as will give an idea of the pro-posed legislation we hope that Colonel Mackenzie who is the pride of Berar wil take proper care to give this new measure as wide a scope of usefulness as possible:—

11. Loans under these rules may be granted to any person, being an owner or occupier of arable land, for any of the following purporses:—

(a) Purchase of seed grain or of plough ing cattle.

(b) Rebuilding houses destroyed by fire or flood.

(c) Relief of distress caused by aricultural losses arising out of special causes.

(d) Any other purpose not supecified in the Land Improvement Loans Act (XIX of 1883) connected with agricultural objects.

V. Loans shall be granted on the following conditions of payment.:—

(a) A loan for the purchase of seed shall be repaid within one year.

(b) A loan for the purchase of cattle or for any other purpose within the meaning of the said Act and these rules shall be repaid within three years. In special cases a furthure extension, not exceeding ten years, may be allowed by the Resident.

VIII. The yearly rate of interest on loans shall ordinarly be one anna in the rupee, or 6¼ per cent, and shall be chargeable from the date on which the loan is made; but the Resident may, at his discreeion and for special reasons, reduce this rate of interest or charge none or remit any part of the interest due.

If an instalment of principal an in tereset is not paid when it falls due, the Deputy Commissioner may if he thinks fit charge interest on it at any rate not exceeding 6¼ percent. per annum from the date of its falling due to the date of payment.

The following are some of the important statements in the Excise report of 1891-92:—

*Abkári Sales.*—The district sales of the monopoly of vend of country spirits for the year 1892 93 were held as usual before the expiry of the prdeceding year, *i. e.*, during the year of report. The total sums bid aggregated Rs. 13, 86, 375, or Rs. 3,280 in excess of the total for 1891-92.

Of the three districts in East Berar in which a large reduction in the number of the shops has been effected, two—Amraoti and Wun—show a considerable falling off in the prices paid for the monopoly. But in Amraoti the price realized is still far in excess] of the avarage for the five next preceding years. In Ellichpur, notwithstanding a decrease of 37 shops, the contract sold for Rs. 11,455 more than that for 189-92. The keen competition said to prevail at the auctions, the high prices bid, and the the ease with which the amounts due are realized, indicate that the margin of profict is still very large.

The net total increase amounts to Rs. 87,610-11-0. compared with Rs, 1,22,452 in the preceding year. The revenue has increased under two heads only *viz*, "country spirits;" and 'foreign spirits' the increase under the former is Rs. 94,595. Thereis a decrease under each of the remaining heads.

The incidence of the total demand of the year under review for all kinds of excise revenue per head of the population, according to the census of 1891, is annas 9—6 against annas 9—1 in the year previous, and the percentage of the total income contributed respectively by country spirits. opium and drugs and tari is 79.6, 17-8 and 2.6 in 1891—92, against 78.5, 18.7 and 2.8 in 1890—91.

## वऱ्हाड

हवामान—पावसानें एक सारखी झोड चालविली आहे. ४० इंचावर पाऊस होऊन गेला. जमीन जुमल्यांचा भिजव अशा पर्जन्यापुढें कितपत लागेल तो खरा! पिकें सर्व मुद्दाल्या प्रमाणेंच आहेत. रोगराईचें मान कमी आहे.

बाळापूरचे शेट पोपटलाल अपिलांत गेल्या शनिवारीं निर्दोषी ह्मणून सुटले. त्यांच्या तर्फे वऱ्हाडांतील वकिला खेरीज बारिस्टर जार्डिन व रा० महादेव चिमणाजी आपटे या उभयतांस मुंबईहून आणविलें होतें. मोठा मनुष्य संकटातुन पार पडला ह्मणून बऱ्याच लोकांस आनंद होईल.

शेतकामासाठीं व कांहीं आवश्यक कार्यासाठीं सरकारी खजिन्यांतुन ६। टक्के व्याजानें शेतकरी लोकांस कर्जाऊ पैसा ज्याच्या त्याच्या ऐपती प्रमाणें देण्या विषयीं नवीन नियम अलिशान रेसिडेन्ट साहेबांनीं केले आहेत त्यांची सविस्तर हकिकत पुढील अंकीं देऊं.

वऱ्हाडच्या वकिलीचे नवीन नियम अंमलांत जशाचे तसेच आल्या वरून गेल्या रेसिडेन्सी आरडरमध्यें सर्वांच्या माहिती साठीं ते पुन्हां छापण्यांत आले आहेत.

उमरावती शहर मुनिसिपालिटीचे दोन सभासद रा. रा. सखाराम चिमणाजी गोळे व गोपाळ रामचंद्र नागपूरकर यांनीं राजिनामे दिल्या वरून त्यांच्या स्थळीं रा. रा. केवलचंद गंभीरचंद व रामचंद्र रेणको होळे यांस निवडण्यांत आले.

आकोट मुनसिपाल कमिटींत सरकार तर्फे तिचे सभासद हास्पिटल असिस्टंट मि. अमीर खान यांस नेमलें.

मि. एल. आर. मार्टीन या नांवाच्या गृहस्थांस शंभर रुपये दरमहावर गेल्या जुलैचे २४ वे तारखे पासून इलिचपूर जिल्ह्यांत नवीन एक्स्ट्रा असिस्टंट फारेस्ट कानसरव्हेटर नेमलें.

तारीख १२ नोव्हेंबर सन १८९१ पासून नऊ महिन्यांची फर्लो रजा रा. रा. केशवराव जयकृष्ण एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस देण्यांत आली होती ती आणखी तीन महिन्यांनीं वाढविण्यांत आली.

वऱ्हाडांतील तीन पोलीस सुपरिन्टेंडेंट मि० आर. गोडीवे उमरावती, एच. एल. काटग्रेव्ह वाशिम, व एन. आर. केवरलीज आकोला यांची अनुक्रमें वाशिम, आकोला व व उमरावती या जिल्ह्यांत बदली झाली.

येथील रेल्वे स्टेशना वरील पोस्ट आफिसांतून गेल्या सोमवारीं साडे चारशे रुपयांची चोरी झाली. चौकशी चालूं आहे.

येथील मुनसिपालिटीनें सट्टा कर गेल्या एप्रिलच्या पहिले तारखे पासून बसविल्या वरून आगष्ट अखेर पांच महिन्यांच्या मुदतींत झालेल्या सट्ट्यांची एकूणात बेरीज घेतां असें कळतें कीं दर खंडीस अर्धा आणा या प्रमाणें गेल्या पांच महिन्या बद्दल ४०९० रुपये अदमासें कराचा वसूल व्हावा. सरकीच्या सट्ट्यांवर कर घेण्यास व्यापारी मंडळी कबूल नाहींत कां कीं सरकीचे सट्टे स्वस्त किंमतीचे असतात आणि त्यावर दर खंडी मागें अर्धा आणा कर भारी आहे असें त्यांचें म्हणणें पडतें.

मि. एल. गाडविन आस्टीन डेप्युटी कमिशनर आकोला हे गेल्या शुक्रवारीं विलायतेस रजेवर गेले. त्यांच्या रजेंत मि. सिंपसन यांस तूर्त चार्ज देऊन मि० मारिस साहेब यांस डेपुटी कमिशनर नेमलें आहे.

रा. रा. शंकर तुकाराम चौधरी कारकून इंग्लिश आफिस डेपुटी कमिशनर आकोला यांची ६० रुपये पगारा वरून ८० रुपये पगारावर उमरावतीच्या इंग्लिशमध्यें बदली झाल्याचे कळविण्यास आनंद वाटतो.

रा. रा. सखाराम अण्णा नायडू तहशिलदार हे रजेवरून परत आल्या नंतर त्यांची आकोटच्या तहशिलदारीवर नेमणूक झाली. गृहस्थ सत्वस्थ, उदारशील, कर्तव्यदक्ष आहेत तेव्हां आकोला जिल्ह्यांत हे एक चांगले अंमलदार आले ही गोष्ट उत्तम होय.

अकोल्याचे कानसरव्हन्सी इनस्पेक्टर राजश्री सिताराम बापू यांच्याकडे रा. रा. केशव रावजी चांदसर्णकर ह्मणून एक पगडबंद गृहस्थ आले आहेत. पागोटीं पुणे चालीचीं चांगलीं बांधतात आणि दर माफक आहेत.

## वर्तमानसार.

जर्मनींत हामबर्ग येथें कालरा इतका चालू आहे कीं, रोग्यांस उपचार करण्यास डाक्टर व डाक्टरणीही दुर्मिळ झाल्या, आणि इस्पितळांतल्या जागा प्रेतांनीं व मेलेल्यांच्या कपड्यांच्या बोचक्यांनींच भरून गेल्या. एका पडवींत ४०० प्रेतें पुरावयाचींच राहिलीं आहेत ! !

निझामसरकारानें आपल्या राज्यांत लागणारे लोक तयार करण्याकरतां एक इंजनेरी कालेज स्थापन केलें आहे. तर मग या पुढें गोऱ्या इंजनेरांची त्यांस गरज लागणार नाहीं काय?

विलायतेंत लिवरपूल हें ठिकाण मुसलमान लोकांच्या संबंधानें अलीकडे बरेंच प्रसिद्धीस येत आहे. तेथील कित्येक लोक सहकुटुंब मुसलमानी धर्म स्वीकारीत असून तेथें एक मशीदही झाली आहे व त्यामुळें पृथ्वीतल्या इतर ठिकाणचे मोठमोठे मुसलमानलोक तेथें जाऊं लागले आहेत. मुंबईचे, निझाम हैदराबादचे व हिंदुस्थानांतल्या इतर ठिकाणचे ही पुष्कळ लोक तेथें जात आहेत. त्या ठिकाणच्या प्रकारावरून युरोपांत मुसलमानी धर्माचा प्रसार बराच होण्याचा संभव दिसतो.

निझामसरकारानें नुकताच एक असा सक्तीचा ठराव केला आहे कीं, आपल्या हद्दींतल्या सर्व काजी व इमाम लोकांनीं नेमलेल्या धर्मसंबंधीं विषयांत आरबी भाषेच्या परिक्षेंत पास झालेंच पाहिजे. हल्लीं त्या कामावर असलेल्या बाबतींत कामदाराकरतां कांहीं सवलतीही केल्या आहेत. स्वराज्याचा हा मासला आहे आणि स्वराज्यावाचून धर्मश्रद्धा कायम राहाणार नाहीं व धर्मश्रद्धेवाचून मनुष्याच्या हातून मोठालीं कामें होणार नाहींत. आज आमची जी अनेक प्रकारांनीं नासाडी होत आहे ती धर्मश्रद्धा नसल्यानेंच आहे, पण त्यास कांहीं इलाज नाहीं.

इंग्लंडांत पटकीचा वाखा सुरू झाल्यामुळें युरोपांतले जे लोक बाह्यदेशीं जावयाचे ते इंग्लंडच्या वाटेनें जाण्याचें बंद झालें आहे.

युरोपांत पटकी जारीनें चालु आहे. हंबर्ग येथें रोज दोनशें माणसें मरत आहेत.

पारीस शहरांत पटकीचा वाखा सुरू झाला आहे.

पार्लमेन्ट मेंम्बर मि. कर्झन हे जपान पेकीन, कोचीन, सायाम, बर्मा, वगैरे ठिकाणीं प्रवास करणार आहेत.

बरेली मोरादाबाद रेलवे करण्याकरतां ७३ लाख रुपये खर्चण्याची स्टेट सेक्रेटरीची मंजुरी झाली.

बळारी, कर्नुल व अनंतपूर हे मद्रासइलाख्यातले जिल्हे दुष्काळानें ग्रासले होते व त्यांत हल्लीं पाऊस इतका पडत आहे कीं, त्यांतील शेती वाहून जाण्याची भीती आहे.

हिंदुस्थान सरकारानें टेलिग्राफ खात्यांतही प्राव्हिन्शियल सर्विस सुरू करण्याचा ठराव प्रसिद्ध केला आहे. यावरून नेटिवांस अगदीं वेगळें करण्याचा सरकारचा इरादा दिसतो.

कलकत्याच्या एका बड्या स्कोले कंपनीचें दिवाळें वाजलें.

कलकत्ता शहरांत विजेचे दिवे लावण्याचा उद्योग चालूं आहे.

रशियन लोक पामीर वलांडून अलीकडे आले व गपचूप अमसारकडे चाल करीत आहेत. पामीर नदी वगैरे वरून आफगाणहद्दीपसून दोन कोसांवर पांजा नांवाचा जो एक किल्ला आहे तेथपर्यंत आले. त्याच्या बरोबर लोक बरेच असून लवकरच बारागिल व किलीक या खिंडीपर्यंतही ते लवकरच येतील असें दिसतें. पांजा किल्ला हा अमिराच्या मालकीचा असून तेथें अमिराची दोन चारशे लोकांची छावणी आहे व तेथें अमिराचा एक डेपुटी गव्हरनरही असतो आणि रशियाच्या या गडबडीमुळें त्या ठिकाणास भीती उत्पन्न झाली आहे. ठा० अ०

योग्य औदार्य— आपले आडव्होकेट जनरल मि. ल्याथाम यांनीं युनिव्हर्सिटी लायब्ररीस मौल्यवान पुस्तकें आणि १००० रोख देण्याचा आपला विचार जाहीर केला आहे. हें औदार्य अत्यंत प्रशंसनीय होय.

मि. पा. एच. डउले यांची गाडी— सदर कल्पक गृहस्थानें एक विलक्षण प्रकारची गाडी तयार केली आहे त्या योगानें रेल्वे लाईन कोठें बिघडली आहे हें कळून येतें. बिघडलेल्या रेलवेची हकीकत कागदावर आपोआप टिपली जाते. तसेंच ज्या ठिकाणी दुरुस्तीची जरूर आहे या ठिकाणीं गाडीतून आपोआप निळ्या रंगाचा शिडकाव होतो त्यामुळें दुरुस्ती तावडतोब करण्यास सहज होतें. न्या० सिं०

डेक्कन एज्युकेशन सोसायटीनें फर्ग्युसन कालेजाकरितां रीतीप्रमाणें ग्र्यांट मागितली असतां सरकारानें ती देण्याचें नाकारलें.

असें ह्मणतात कीं, नामदार व्हईसराय साहेब हे अलिकडे अगदीं सकाळ पासुन दुपारचे तीन वाजेपर्यंत सर हेन्रीड्यूरंड यांच्याजवळ अफगाणिस्थानांतील गडबडी संबंधानें खलबतें करीत असतात.

प्रसिद्ध व्यापारी राली ब्रदर्स यांणीं, राजपुताना रेल्वे कंपनीवर, आपला माल वेळेवर पाठविला नाहीं, ह्मणून ३ लाख रुपयांची फिर्यादी केला आहे! क० त०

रशियन लोक अक्सस नदीच्या कांठीं आपली छावणी बनवीत आहेत.

पामीरची सत्ता आपल्या हातांत घेतली हें पाहून चीनानें आपला वकील रशियन दरबारांत पाठविला आहे.

रशियांत वाख्याच्या उपद्रवानें दीड लाख मनुष्य मेलीं असें सांगतात. अबब!

हल्लीं देशांत इतका पर्जन्य झाला आहे कीं, तो इतक्यात न उघडल्यास पिकांची नासाडी इतकी होईल कीं, तो मुळींच न पडता तरी इतकी झाली नसती! पु. वै.

अफगाण व रशियन या उभयवजूकडील लोक मरतात पण जुंपलेली लढाई बंद होऊं शकत नाहीं. हा परिणाम कोठवर पोचणार नकळे. रशियनलोक रोशन व शिगनन पर्यंत येऊन पोचले. अफगाण आणि चीन यांच्या सरहद्दीवर रशियन लोक वसाहत करण्याच्या तजवीजीस लागले. हजारालोकांचा दंगा चालू आहे. दुराणीलोक अमिराच्या विरुद्ध असून रशियाच्या मसलतीनें चालतात अशी बोलवा आहे. अफगाण राज्य सोडून फरारी झालेल्या लोकांस रशियन सरकार ट्रान्सकास्पियन येथें जपून ठेवण्याची तजवीज करीत आहे.

अफगाणच्या अमिरास टोसा देऊन रशियन पामीर पाहाडावर चढून आले. अमीर अगदीं घाबरून गेल्या सारखे करीत असून लवकर मदत द्या अशीं इंग्लिशांची अर्जवें करीत सुटला आहे. इंग्लंडांत नवीन राजमंडळ स्थापन झाल्यामुळें अमीराची दाद लागावी तशी लागली नाहीं, तेंच रशियनचें पाऊल पुढें पडण्यास कारण झालें.

रशियन कर्नल यानोफ यांजकडून अमिरास सक्तीचें पत्र आलें आहे कीं, आतां तोंड मागें करण्यांत हांशील नाहीं. शिपायाच्या बचावानें तरवारीस पाहून मागें सरूं नये. आह्मी २००० रशियन पामीरच्या तोंडावर उभे आहो असें समजू नये. आमच्या मागें २ लाख शिपाई खडा आहे. यावरून किल्ला पंजा येथून ४० मैलाच्या अंतरावर रशियन तोफखाना येऊन भिडला. एकवार आक्सस नदीचा किनारा रशियन लोकांनीं वेढला कीं अफगाणची चांदी झाली असें समजलें पाहिजे. अफगाणिस्थानानें हें च नाकें मुख्यत्वें सांभाळिलें पाहिजे डेली टेलिग्राफ कळवितात कीं, रशियाकडील मसलती लोक अफगाण सरहद्दी मधून पळून आलेले खेडूत लोकांचा मोठ्या काळजीनें परामृष घेत आहेत.

इंग्लंडचीं पत्रें इंग्रज सरकारच्या कानीं कपाळीं ओरड करीत आहेत कीं रशियनाचा पुढें काय हेतू आहे त्याचा खुलासा करून त्याप्रमाणें बंदोबस्त करावी नाहींतर पुढें नाक धुरया काढतांना पुरेसें होणार आहे.

रशिया पामिर अंगास वळला आहे कदाचित चिनास धक्का बसेल. म. मि

## जाहिरात

—— ० ——

अहो स्वदेश बांधवहो, परदेशी औषधी नुसत्या रंगबाज व कमिशन जास्त पाहून कां फसतां? इकडे थोडे लक्ष द्या.

आमचे दवाखान्यांत सर्व रोगांवर औषधी विक्रीस व दरिद्री लोकांस फुकट तयार आहेत; परंतु त्यांत ज्या हटकून गुण खात्रीनें देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जी दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्यावर पत्र पाठवावें. ह्मणजे आम्ही व्हाल्युपेबलनीं पोस्टमार्गें लवकर पाठवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरुस्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमिशन देऊं. व त्यांनीं विक्री करून दाम पाठवावें.

१ गजकर्णावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ८८ आणे.

२ मूळव्याध कितीही दिवसांची दुर्धर असेल त्यावर मोडावर लावण्याचे व पोटांत घेण्याचें दोन औषधी मिळून किं. १॥ रु.

३ धातुधिक ज्वर ह्मणजे चवथारे हिंव ताप त्याच प्रमाणें तिजारे, व दररोज येणारे कितीही दिवसांचे असो, त्याजवर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. किं. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्याच्या डबीस १८९ या औषधानें कडक तापही जातो.

४ परमा तिढिक व स्वप्नावस्था, व कोठ्यांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहूणपुडा किं. १ पुड्यास ८१४ आणे.

५ बाळंत रोग बाळाचे डबे व सटवी बाधा व मदर सर्व तऱ्हेचा किं. १ डबीस १॥ रु.

६ वीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास किं. २॥=

७ नारुवर २ दिवसांत गुण. लावणें व खाणे याच्या डबीस किं. ।

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट शुळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस किं. ।॥

जुलाब उत्तम राजस तकलीफ अगदीं नसून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल किं. १। रु.

१० मेदोरोग व घुरें व उन्माद यावर अगदीं जल्द गुण १ बाटलीस किं. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्त्राव व ऋतुस्नात होण्यास व गर्भधारणास बंदेज ह्यांवर हें एकच औषध फार चांगलें आहे. १ डबीस किं. १॥

१२ पिनस व मस्तकशूळ व अर्धशिशा याजवर दर डबीस किं. १८=

१३ हागवण व अतिसार १ डबीस किं. १।=

१४ वृषण एकारल्यास व वृद्धीस १ डबीस किं. १ रु.

१५ कावरले कुत्रें व कोल्हे व तेल्या उंदीर डसल्यास १ डबीस किं. १। रु.

१६ मेहानें अगर उष्णतेनें पाय उलून रक्त जाणें व संधि दुखणें ह्यावर १ डबीस किं. १॥ रु.

१७ महामारीवर अगदीं जलद गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ५० गोळ्याच्या डबीस किं. १८–

१८ गर्मी उर्फ उपदंश संबंधी विकार क्षतें यांजवर १ डबीस किं. १॥ रु.

१९ फसकी उर्फ मज्जागतवात व शूळ याजवर लवकर १५ मिनिटांत गुण १ डबीस किं. ।॥ हें १५ मनुष्यांस पुरेल.

२० कऊळ, नळगुद, पंडु, सूज व मुखरोग ६५ व सन्निपात १३ यांवर १ डबीस किं. १॥ रु. ही ३ मुलें व २ पुरुषांस पुरेल.

२१ सुवर्णमालिनीवसंत खात्रीचा १ तोळ्यास किं. ७ रु.

२२ योगराज गुगुळ १ तोळ्यास ४॥ रुपये.

२३ नामर्द ह्मणजे नपुंसक कितीही दिवसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त खात्रीनें होईल. १ बाटलीस किं. ३ रु. गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोळ्यांतील फुल वडस रातांधळें लाली खुपरी चुळ चीपडे गळती याजवर १ डबीस किं. १८६

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेश मागवून विक्री करील त्यांनीं विक्री करून पैसे मागाहून पाठवावे.

(पता व सही) शिवचरनगीर रामगीर
कुरणखेडकर अकोला गंगावरचे
माडीवर चौकांत दवाखाना.
वऱ्हाड.

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाड समाचाराची किंमत

वर्षाची आगाऊ रु० ५ डांक हाशील ०।३

साहामाही " ३ " ०८

सालअखेर " ७ " १०८

किरकोळ अंकास ......................०४

नोटिशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १

पुढें दर ओळीस ०।०६

दुसरे खेपेस ........०१

SUBSCRIPTION

Rs.

Aunum in advance 5 Postage 13 as

Annum in arrears 7 ,,1Rs 8 as

Six monthly...........3 " 8 as

Single copy.....................3as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisemen

Below 10 lines...2Rs

per line over10...4 as

Repetition per line3as

## THE BERAR SAMACHAR

VOL XXVI — AKOLA MONDAY 19 SEPTEMBER 1892 — NO 37

वर्ष २६ — आकोला सोमवार तारीख १९ माहे सप्टेंबर सन १८९२ इ० — अंक ३७



डा० वामन गोपाळ यांचा

सार्सपरिला

हा सार्सपरिला अनेक रोगावर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे उपदंशजन्य विकार (गरमी) व तिजपासून होणारा पक्षवातादी भयंकर रोग संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हातपायांच्या तळव्यांवर व सर्व शरीरावर काळे डाग पडणें संधी दुखणें, कळा लागणे, सूज येणें सर्व संधिगत वायुवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग जसे सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातपायांची आग, होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दुषित झालें असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखें दुसरे औषधच नाहीं दर बाटलीस किंमत १। रुपया पोस्टेज ४ आणे, उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक, धातु व रक्तवर्धक मिश्र फासफरसाच्या,

गोळ्या

या पासून अतिशय विषयोपभोग नित्य धातुश्राव यानें झालेली क्षीणता; जाऊन कडकी, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुसकत्व इत्यादि विकार तात्काळ नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चैतन्याचा व बुद्धि व मरणशक्तीचा राजा जो मज्जा (मेंदु) व मज्जा तंतु याच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचें पुनरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायूंची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत किंमत २४ गोळ्यांचे एका बाटलीस १४ आणे बंगी व पोष्ट मिळून एका पासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा

कल्प.

हा कल्प प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें, सफेद करड्ये व पिंगट रंगाचे केस काळे भोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रु० पोष्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधा सोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता—नव्याठाकूर द्वारासमोर.


मलकापूर ता. ९।९।९२ इसवी.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

सा. नमस्कार विनंती विशेष खालील मजकुरास येत्या अंकीं स्थळ मिळेल अशी आशा आहे.

हवामान— चालू महिन्याच्या आरंभा पासून पर्जन्यवृष्टी सुरू आहे पर्जन्या वांचून दिवसच जात नाहीं; हवेंत बराच गारठा आला आहे. आतां मेघराज थोडे दिवस कृपा करतील तर बरें होईल, नाहींतर पर्जन्याची दुर्दशा विचारावयासच नको.

ग्रामण्याची चळवळ:—हल्लीं येथें श्रीमठाधिपती श्री शंकराचार्यांकडून आलेले प्रतिनिधी यांचे ठाणें बरेंच दिवसां पासून बसल्यामुळें ग्रामण्य प्रकरण बरेंच माजलें आहे. ग्रामस्थ भिक्षुकांच्या ३।४ सभा झाल्या व अखेरीस हें प्रकरण निकालास लागेलसें वाटत होतें परंतु कांहींकांच्या दुराग्रहामुळें तें तसेंच लोंबत राहिलें. प्रतिनिधी यांची "न्यायप्रीयता निःपक्षपातीपणा" व "अक्रोधत्व" या गुणा विषयीं मोठी ख्याति दिसून येते. ह्या ग्रामा मध्यें कांहीं जुनी भाविक मंडळी जो पर्यंत शिल्लक आहेत तो पर्यंत असल्या लोकांची चंगळ चालावयाचीच; नाहींतर पुण्यग्रामांतील क्रिडाभुवनासारखाच प्रसंग येथें आला असता. सर्व ग्रामस्थ मंडळीस येवढीच सुचना आहे कीं, आपले घरांतील संटे बाहेर आणून त्यांचा व्यर्थ उहापोह करून घेण्यांत कांहीं मतलब नाहीं; त्यांतही योग्यायोग्य स्थळ पाहून त्या ठिकाणीं तरी त्याची चर्चा व्हावयाची होती. कां! "उपरकी तो खुपबनी लेकिन् अंदरकी जाने राम"! देशस्थिति रिति वर्तमानानुसार बोवांची बिदागी बरी झाली.

महत्वाची सूचना:— येथील इंग्रजी मराठी शाळेतील मुलां करितां कसरतीची जागा हल्लीं ज्या ठिकाणीं आहे, त्या जागेच्या(वरच्या) दक्षिणे कडील भागांत लहान मुलें "आप्यापाप्या" व "खो खो" खेळतांना दृष्टोत्पत्तीस आलें आहे परंतु ह्या जागेला आधार नसल्यामुळें एखादे वेळेस मुलगा खेळण्याच्या नादांत किल्यावरून खालीं पडण्याचा संभव आहे, या करितां वेळींच व शाळा खात्याचे अधिकारी योग्य, लक्ष पुरवतील अशी आशा आहे. पत्र विस्तार फार झाला सबब पुरें करतो कळावें लोभ असावा ही विनंती.

आपला एक "ज्ञ"

---

रा० रा० वऱ्हाडसमाचार पत्रकर्ते महाराज, पाठविलेल्या मजकुरास आपल्या सुंदर पत्रीं जागा द्याल अशी आशा आहे.

केळीवेळी बाल सभेचा वाढदिवस.

या सभेला तारीख ९ आक्टोबर सन १८९२ इ० रोजीं दिवसा बारा वाजतां सुरुवात होईल. या सभेंत केळीवेळी पासून पांच कोसावरच्या वऱ्हाडांतील कोणत्याही शाळेंत असलेले विद्यार्थी खालील विषयांवर पाव तास संभाषण करतील त्यांस खालीं लिहिलेलें बक्षीस मिळेल.

१ विषय— विद्येस उत्तेजन कसें द्यावें या विषयीं.

२ विषय— लायब्ररी पासून कोणते फायदे आहेत या विषयीं.

३ विषय – जगावर उपकार कां करावे. या विषयीं.

नेमलेल्या विषया पैकीं वाटेल त्या विषयावर संभाषण करावें पन्नासाच्यावर गुण मिळालेल्या उमेदवारांचे नंबर लावून अनुक्रमें १-२-३ नंबरास अनुक्रमें ७-५-३ रुपये बक्षीस मिळेल. मात्र उमेदवार विद्यार्थी असून वऱ्हाडी पाहिजेत उमेदवारांनीं आपलें नांव, बापाचें नांव, जात, व शाळेचें नांव तारीख १ आक्टोबर सन १८९२चे आंत पोहोंचेल अशा बेतानें पाठवावें. त्या बरोबर आपल्या मास्तरचा दाखलाही पाठवावा. उमेदवारांची राहण्याची व खाण्यापिण्याची सोय फुकट केली जाईल. मात्र उमेदवारांनीं सदरहु दिवशीं केळीवेळीला दहा वाजतां पोंहचू अशा बेतानें निघावें. कळावे तारीख १२.९.९२ इ०

सूर्यभान जानजी हेडमास्तर

म० शाळा केळीवेळी.

---

## बरार रूरल लॉ.

## नियम.

(३६ वे अंका वरून पुढें चालू)

(फ) रकम (क) व (ड) या खालीं येणाऱ्या नवीन कामाच्या बाबतींतील योजना प्रथमतः डेपुटी कमिशनर मार्फत जिल्हा बोर्डाच्या हुकुमाकरितां पाठविली पाहिजे व त्या समागमें एक्झिक्यूटिव्ह इंजिनिअर यांणीं तयार केलेला कच्चा नकाशा व खर्चाची साधारण सुचना पाठविली पाहिजे. कमिशनर साहेब किंवा रेसिडेन्ट साहेबांचें सिव्हिल खातें यापैकीं ज्यांची मंजुरी पाहिजे असेल ती मिळाल्यावर त्याबद्दलची बजेटांत योजना करावी. व तें बांधण्याचें काम पब्लिक वर्क्स खात्याकडून केलें जाईल. त्या बद्दलचे तपशिलवार नकाशे व एस्टिमेटस सुपरिंटेंडिंग इंजिनियर यांचे हुकुमावरून डेपुटी कमिशनर व जिल्हा बोर्डाचे चेअरमन यांच्यापाशीं पत्रव्यवहार ठेऊन तयार केले जातील. कामाचा नमुना व एकंदर खर्च मंजूर केल्याचें दर्शविण्या करितां त्या नकाशावर व एस्टिमेटावर डेपुटी कमिशनर व जिल्हा बोर्डाचे चेअरमन यांनीं सही करावी व ते डेपुटी कमिशनर यांनीं कमिशनरकडे मखलशी करून परत करण्याकरितां पाठवावें नंतर डेपुटी कमिशनर यांनीं ते फंडाच्या टिपणी पत्रकासहीत सुपरिंटेंडिंग इंजिनिअर यांजकडे पाठवावें व त्यांनीं जो जरुरियात तपासणी करण्याची ती करून जिल्ह्याचे एक्झिक्युटिव्ह इंजिनिअरास काम चालू करण्यास हुकूम द्यावा. त्यापुढें त्या कामाची व्यवस्था पब्लिक वर्क्स खात्याची व्यवस्था साधारण नियमा प्रमाणें केली जाईल.

(ग) २०० रुपयावर खर्च न लागणारीं सर्व नवीन कामें ज्यास त्या कामाच्या धंद्याची माहिती जरुरी नाहीं, व २०० रुपयावर खर्च न लागणाऱ्या रिपेरी तहसिलदारानें गांवच्या अधिकाऱ्या मार्फत व तालुक बोर्डाच्या सल्यानें करवाव्या.

(ह) २०० रुपयावर व ५०० रुपयांहून अधिक नाहीं इतका खर्च लागणारी सर्व नवीन कामें व २०० रुपयावर खर्च लागणारीं अशीं सर्व कामें जीं बांधण्यास त्या धंद्याच्या माहितीची जरुरी आहे; व २०० रुपयावर खर्च लागणाऱ्या सर्व रिपेरी जिल्हा बोर्डाच्या ताब्यातील लोकल फंड पब्लिक वर्क्स इस्टाब्लिशमेंटानें कराव्या.

(आय) ५०० रुपयावर व १००० रुपयाहून जास्त खर्च न लागणारीं सर्व नवीं कामें डेपुटी कमिशनर जिल्हा बोर्डाच्या सल्यानें ज्याचे मार्फतीनें करविण्याचे वेळोवेळीं ठरवितील त्याचे मार्फत करवावीं. तीं कामें पब्लीक वर्क्स खात्यानें करावीं असें जेव्हां वाटेल तेव्हा तसा कामें जिल्ह्याचे पब्लिक वर्क्स कामगाराकडे देण्याकरितां परवानगी मिळण्यासतव सुपरिंटेंडिंग एन्जीनियर यांजकडे अर्ज करावा.

(२)हत्यारें व सामाना बदलची इस्टिमेट व जनावरांच्या खर्चाबद्दल मंजुरी देण्याचा अधिकार.

हत्यारें व सामाना बद्दलची इस्टीमेटस व जनावराबद्दलचा खर्च पुढें सांगितल्या प्रमाणें मंजूर करावा.

हत्यारें व सामानाचा पुरवठा व रिपेरी— जिल्हा बोर्ड एकंदर रकम १०० रुपया पेक्षां अधिक नाहीं इतकी; डेपुटी कमिशनर एकंदर रकम १००० रुपयापेक्षां अधिक नाहीं इतकी, कमिशनर प्रत्येक जिल्हा बोर्डा करितां एकंदर रकम ५,००० रुपयापेक्षां अधिक नाहीं इतकी.

जनावरें— डेपुटी कमिशनर ५० रुपयापेक्षां अधिक नाहीं इतकी एकंदर रकम; कमिशनर प्रत्येक जिल्हा बोर्डाकरितां २०० रुपयापेक्षां अधीक नाहीं इतकी एकंदर रकम.

(३)नवीन कामें व रिपेरी मंजूर करण्याबद्दल जि० बोर्डाचे अधिकार.

५०० रुपयापेक्षां जास्त खर्च न लागणारे एखादें नवीन काम किंवा दुरुस्ती ज्याबद्दल बजेटांत योजना केलेली असेल त्यांजकडे जास्त मंजुरी घेतल्या शिवाय बोर्डानें खर्च करावा, किंवा खर्च करण्यास तालुक बोर्डास अधिकार द्यावा, परंतु नि-

यम ६ (१) यांत सांगितल्या प्रमाणें नेहमीं तनवीन झालेली असली पाहिजे.

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य १४ शके १८१४

वऱ्हाडांतील शेतकऱ्यांस कर्जाऊ पैसा देण्या विषयीं प्रांतिक सरकारानें निराळी व्यवस्था केली आहे हें कळविण्यास मोठा संतोष वाटतो. सन १८८३ चा १९ वा आक्ट ह्मणजे शेती सुधारण्याच्या सोयीं साठीं कर्जाऊ रकम देण्याचा कायदा वऱ्हाड प्रांतांत लागूं आहे परंतु त्या कायद्याची व्यवस्था फारशी मोठी नसल्यामुळें त्या कायद्या पासून प्रजेचा फायदा ह्मणण्या सारखा झाला नाहीं. सरकाराला वाटत होतें त्या प्रमाणें रयतेनें सरकारापाशीं पैसा साठीं मागण्या केल्या नाहींत. हें पाहून मि. फ्लौडन साहेबांनीं कमिशनर असतांनाच निरनिराळ्या बारीक रितीनें चौकशी केली तेव्हां त्यांस कळून आलें का १८८३ च्या कायद्या अन्वयें रयतेला कर्जाऊ पैसा मिळण्यास सवलती फार थोड्या आहेत आणि शिवाय त्या कायद्यांत वर्णिलेल्या सुधारणा करण्याकडे लोकांची प्रवृत्ति विशेष नाहीं व पीकण्याची सुबत्ता असल्या कारणानें त्या सुधारणांची जरूरी ही राहात नाहीं. माजी रेसिडेंट सर डेनिस फिट्झ पाट्रीक यांचा हा अभिप्राय असाच होता कीं वऱ्हाड प्रांताला १८८३ च्या कायद्याची आवश्यकता नसण्यास येथील शेतीभातीच्या सोयीं व जमिनिचा उत्कृष्ट कस या गोष्टी कारण असाव्यात. विहिरी बांधणें, नवीन जमिनी लागवडींत आणणें, विहिर अगर शेत यांची दुरुस्ती करणें, पाटस्थळाना प्रमाणें निपरुपयोगी झालेल्या शेतांतील दगडगोटे वगैरे काढून टाकणें हीं व अशा सारखीं दुसरीं कामें या प्रीत्यर्थ कर्जाऊ पैसा देण्याची १८८३ च्या कायद्यानें परवानगी आहे. परंतु वरील शेतकीच्या सुधारणा करण्याची जरूरी क्वचित प्रसंगीं पडते आणि तशा विस्ताराच्या व खटाटोपाच्या सुधारणा करण्या साठीं सरकारापाशीं पैसा कर्जाऊ मागण्याचें लोकांस बहुत करून आवडत नाहीं असें दिसतें. त्या नंतर हिंदुस्थान सरकारा कडून विचारण्यांत आलें कीं १८८३ चा आक्ट निरुपयोगी वाटत असल्यास १८८४ चा १९ वा आक्ट या प्रांतास कितपत लागूं पडेल तें पाहून त्या प्रमाणें त्याची अंमलबारी करण्याची योजना होण्यास कांहीं व्यत्यय आहे कीं काय? १८८४च्या १२वे कायद्या अन्वयें शेतकऱ्याला अडचणीच्या प्रसंगीं पैसा देता येतो बी, गुरेंढोरें वगैरे घेण्यास सरकार कर्ज देतें; आणि हररक शेतकी कामास या नव्या कायद्यानें सोयस्कर अशा सवलती करून दिल्या आहेत. गुदस्त साला्च्या आरंभीं वरील प्रश्न निघाला होता आणि त्याची योग्य शहानिशा मि. फ्लौडन साहेबांनीं करून गेल्या वर्षाच्या सप्टेंबरांत १८८४ चा १२ वा कायदा वऱ्हाडास लागूं करून घेतला.

फ्लौडन साहेबांची काम करण्याची शैली वर्णनीय आहे. जात्या ते शोधक, अनुभवी, व विचारशील आहेत. त्यांनीं मनांत एखादी गोष्ट आणली म्हणजे तिचा योग्य पिच्छा पुरविल्या शिवाय ते राहणार नाहींत. प्रजेच्या कल्याणा विषयीं त्यांची विशेष दक्षता ठेवतात आणि वऱ्हाडांतील त्यांची कारकीर्द फार स्तुत्य व भूषणार्ह आहे. त्यांची उच्चस्थानावर बढती झाली तरी ते आपले मनोरथ विसरले नाहींत. अर्थातच आलिशान रेसिडेंट मि. फ्लौडन साहेबांचा पक्का विचार ठरला असावा कीं वऱ्हाडच्या रयतेची सावकारांच्या त्रासा पासून सोडवणूक यथाशक्ति केली पाहिजे. व्याजाचा दर शेंकडा २४ रुपये आहे तो मनस्वी आहे ही गोष्ट ते जाणूनच होते. तेव्हां १८८४ च्या कायद्याची व्यवस्थशीरपणें अंमलबारी व्हावी म्हणजे प्रजेची सोडवणूक होईल असें लक्षांत आणून त्यांनीं नवीन नियम तयार करविले आणि व्हाइसराय साहेबांच्या संमतीनें ते गेल्या रेसिडेन्सी आरडर्स मध्यें सर्वजणांच्या माहिती करितां प्रसिद्ध केले आहेत. आम्ही रेसिडेंट फ्लौडन साहेबांचे वरील स्तुत्य उद्योगा बद्दल फार ऋणी आहे आहे आणि त्यांनीं इच्छिलेल्या गोष्टी घडून याव्यात व तेणें करून प्रजेस सुख व्हावें असें मना पासून इच्छितों.

कर्नल मेकंझी साहेब वऱ्हाडचे कमिशनर आहेत आणि या प्रांताचा त्यांना अनेक कारणा मुळें अभिमान आहे. जन्मभूमीच्या नात्यानें ते वऱ्हाडाला फार चाहतात आणि त्यांची वैभवोन्नति याच प्रांतांत झाली म्हणून ते उघडच येथील लोकांचे कट्टे हितकर्ते आहेत. तेव्हां त्यांच्या आमदानींत वरील रयतेच्या कल्याणाचे नियम लवकरच रोजच्या उपयोगांत येतील असें आम्ही इच्छितों. या नियमां प्रमाणें सर्व व्यवस्था त्यांच्या अधिकारांतली आहे तेव्हां ही गोष्ट त्यांच्या हातून सहजीं घडेल.

शेतकऱ्यां साठीं पेढ्या निघाल्या पाहिजेत असें सर्व लोकांस वाटतें. इंग्रज सरकारास या पेढ्या स्थापणें सुसाध्य अगर कष्टसाध्य आहे हा प्रश्न अगदीं स्वतंत्र आहे आणि त्या विषयींचा वारवार उहापोह होत असतो. कर्जानें रयत लोक नाडान होऊन गेले आहेत. त्यांची नीति कायम आहे पण बहुतजण कर्जाच्या पायीं सफै ठार बुडाले आहेत. सावकाराचे बंदे गुलामाहून गुलाम शेतकरी बनले आहेत. त्यांस स्वतंत्रता ह्मणून काय ती ठाऊक नाहीं. जी शेतीभाती ते स्वतांच्या मालकीची समजतात तिला ते केव्हां आंचवतील याचा नेम नसतो. काबाडकष्ट करून शेत पिकवावें तरी शेतकऱ्यांस वर्षभर पुरेसें जाडेंभरडें अन्नवस्त्र मिळत नाहीं. शेताची मिळकत जंगी झाली तरी सावकारांचीं तोंडे मिटवितां मिटवितां त्यास मारामार पडते. तेव्हां हताश, निर्धन व गरजू अशा लोकांचा वाली कोण असणार? आम्ही वर दर्शविलेली स्थिति खरोखरच आहे असें वाटण्यास दुसरा एक संभवनीय परिणाम दिसून पडतो कीं शेतीवाडी मूळच्या शेतकऱ्यांच्या हातांतून जाऊन ती बहुतेक रोजगारदार व व्यापारठापार करणाऱ्या श्रीमंत मंडळीच्या ताब्यांत जात चालली आहे. ही शोचनीय स्थिति प्राप्त होण्यास शेतकरी लोकांचे अंगभूत गूण कारण आहेत परंतु त्यां पासून जें कार्य घडत आहे तें देशाच्या हितास अपायकारक आहे हें कोणी ही कबूल करील. शेतकरी कुणबी, अक्षरशत्रु, खर्चिक, व अव्यवस्थित असतात असें फार वेळां घडतें. तेव्हां त्या वर्तनाच्या परिणामीं दुसऱ्याच्या शहाणपणाला, बेताबेताच्या खर्चाला व टापटीप वागण्याला शेतकरी लोक हार गेले आणि कार्यवशात् ते परस्वाधीन, कर्जदार, व भिकारी बनले तर त्यांत नवल नाहीं. आभाळ फाटलें तर ठिगळ लावून जसें जोडतां येणार नाहीं तसें अशा विपन्नावस्थेस पोंचलेल्या शेतकऱ्यांस मदत करणें ही गोष्ट घडेल असें दिसत नाहीं.

परंतु जे शेतकरी लोक अगदीं तंगींत असतात म्हणजे ज्यांचा उदरनिर्वाह कसा तरी पराकाष्ठेनें भागतो अशा लोकांस स्वल्प व्याजानें कर्जाऊ पैसा मिळाला तर सावकाराच्या तडाख्यांतून त्यांचा बचाव होऊन त्याच्या गरजा थोडक्यांत भागल्या जातील. शेताच्या उत्पन्नावर सारा, सावकारांचें कर्ज व चरितार्थ या तिन्ही बाबींचा जे आजकाल वर्षा अखेर कसाबसा उलगडा करितात त्यांस मुख्य मदत म्हणजे स्वल्प व्याजावर कर्ज मिळालें पाहिजे. थोड्या व्याजानें हातउसना त्यांस पैसा मिळाला म्हणजे त्यांची सावकारांच्या हातून नागवणूक न होता शेतीच्या उत्पन्नाचा त्यास लाभ मिळण्यास एक चांगला उपाय होईल. पुणें प्रांतीं शेतकऱ्या साठीं आग्रिकलचरल रिलिफ आक्ट लागूं केला परंतु शेतकरी पेढ्या स्थापल्या वाचून तो कायदा फायदेशीर नाहीं इतकेंच नाहीं तर कांहीं प्रसंगीं अहितावह वाटला आहे. शेतकऱ्यां साठीं पेढी अवश्य पाहिजे. ती सरकार केव्हां काढील तेव्हां निघो. परंतु सध्यां १८८४ च्या १२ वे आक्टा अन्वयें जी थोडीबहुत सोय निघाली आहे तिचा लोकांनीं योग्य वेळीं उपयोग करून घेण्यास विसरूं नये.

कर्जाची फेड चुकली तर मात्र सरकारी पेढींत अहित असतें. सरकारच सावकार असलें म्हणजे दिवाणी कोडताची फार खर्चाची न्यायपद्धती सरकारला लागत नाहीं आणि तो बोजा ऋणकोवर पडत नाहीं हें खरें. पण कर्जाचा वसूल सत्ताधारी सरकार तात्रडतोब करूं शकतें. सरकारापुढें लपंडाव चालत नाहीं. सावकार एक वेळ क्षमा करील परंतु सरकारापाशीं चूक घडली म्हणजे बिनतोड बाजू येऊन पडते. सरकाराच्या व्यवस्थेला बैलगाडीच्या प्रवासाची उपमा दिली आणि सरकारच्या व्याजबट्ट्याच्या व्यवहाराला आगगाडीच्या प्रवासाची उपमा दिली म्हणजे उभय प्रकारच्या प्रवासा मधील फरका प्रमाणें उभय व्यवहारा मधील फरक कळून येईल. वेळ चुकली अगर मार्गें पुढें घसरलो तर बैलगाडीची मोठी भिती नसते परंतु आगगाडी जवळ मरणाचें वारंट तयार असतें. उलटपक्षीं आगगाडीचा सत्वर वेग, प्रवाससौख्य, व नानाविध फायदे सवलत्रावधि पटीनें गणना न होण्या सारखे आहेत. तद्वत सरकारनें कर्जाऊ पैसा देण्या विषयीं कबूल केलें आहे त्याचा कायदा कायदेशीर रितीनें नेमक्या वेळेवर कर्ज पोंचतें करण्याच्या इरादानें, आणि ज्या कार्यासाठीं घेतलें असेल त्याजकडेस खर्चण्याच्या निश्चयानें, करून घेतला आणि सरकारशीं नेकीनें व इमानें इतबारें सचोटीची वतर्णूक ठेविली तरच सध्यां आलिशान रेसिडेंट साहेबांनीं केलेल्या नवीन नियमांचा यथायोग्य, चिरस्थायी व लाभप्रद असा उपयोग घडेल. एवढ्याच साठीं आम्ही शेतकऱ्यांस बजावून सांगतों कीं त्यांनीं आपला आदाव्यय व हिम्मत हीं पाहून सरकारला सावकार करून घेण्यासाठीं पुढें पाउल टाकावें आणि त्यांत जर चूक झाली तर मात्र पुढील गोष्ट मोठी संकटाची आहे.

रजिस्ट्रेशन खातें वऱ्हाडांत सुरूं झाल्या दिवसापासून त्या खात्याची उत्तरोत्तर मोठी भरभराट आहे. सरकारची तिजोरी भरण्याचे जे मार्ग आहेत त्यापैकीं हा एक सोपा, सोयीचा व बिनभांडवली आहे. दस्तऐवज कोणकोणते नोंदले पाहिजेत, कोणकोणते विकल्पें नोंदावे, व नोंदले गेले नाहींत असे दस्तऐवज सरकारी कोडतांतून कायदेशीर मानले जाण्यास किती दंड दिला पाहिजे वगैरे सर्व गोष्टी रजिस्ट्रेशन कायद्यानें व्यवस्थेशीरपणें ठाम व मुकर करून सोडल्या आहेत व त्या कायद्याची अंमलबारी योग्य प्रकारें होते अगर नाहीं हें चौकसपणें तपासण्याचें काम रजिस्ट्रेशन कोडताला करण्याचें प्रयोजन नाहीं. रजिस्ट्रेशन कचेरी, त्यांचीं ठराविक पांच पुस्तकें व त्यावरील रजिस्ट्रार ही सामुग्री असली ह्मणजे दस्तऐवज नोंदण्यास आणणाऱ्या लोकांची मार्गप्रतिक्षा करण्यास दुकानदारा प्रमाणें सरकारचा अंमलदार तयार असतो. गिऱ्हाईक आलें तर दस्तऐवज चौकशीपूर्वक नोंदावा ह्मणजे कार्यभाग उरकला. तेव्हां सरकारला नोंदणी कचेरी बद्दल विशेष तकलीफ घ्यावी लागत नाहीं. जेथें दुकानदारी नीटपणें फायदेशीर होईल तेथेंच रजिस्ट्रेशन कचेरी उघडावी असा त्यांचा क्रम आहे. रजिस्ट्रेशन कायद्या पासून लोकांच्या जितक्या सोयी होऊं शकतील त्या देण्यासाठींच ही बनियेशाई सरकारनें आरंभली आहे आणि त्यांत लोकांचा फायदा होऊन सरकारची सावकारी बिनभांडवली चालते. भांडवल लागतें तें मुद्दलांत कांहीं नाहींच झटलें तरी चालेल. पगारदार रजिस्ट्रार, कचेरीचीं नमुना बुकें वगैरे भांडवल किरकोळ खर्चांचें असून गिऱ्हाईकांची चंचण पाहून त्या प्रमाणें हा खर्च वाढवितां येतो. अव्वल पासून सन १८९२ च्या मार्च अखेर रजिस्ट्रेशन खात्याची गेल्या बावीस वर्षांची शिलक रुपये ३,७८,५७१-८ आ० —१० पै आहे आणि रजिस्ट्रेशन खात्याचें दरसाल वीस हजार रुपयांचें उत्पन्न खर्चवेंच भागून सरासरीनें या पुढें होत जाईल असा अंदाज धरण्यास हरकत नाहीं.

विश्वयेतेत खोधनाच्या मुद्यावर एक चमत्कारिक व मौजेचा खटला कोडतांत आला होता. स्त्रीधन ह्मणजे ज्या धनावर बायकोचाच पूर्ण अंमल असून त्यावर नवऱ्याची मालकी नाहीं असें धन समजावयाचें. एक नवराबायकोचें जोडपें मोठ्या आनंदानें नांदत असे. एक प्रसंगीं तीं उभयतां राती-

सुखांत निमग्न असतां त्यांच्यामध्यें करार ठरला कीं त्या विलासमुखी रमणीनें चुंबन दिलें ह्मणजे प्रत्येक मुक्या मागें नवऱ्या नें तिला एकेक 'डालर' नामक नाणें द्याव याचें. हा करार दोघांनीं अक्षरशः अंमलांत आणिला आणि या रितीनें त्या बायकोनें आपल्या नवळच्या अमोलिक, गोड गोड व साखरेच्या मुक्यांनीं स्वतां मोठी मिनगी पैदा केली. अधरपानाच्या तृप्तीनें नवऱ्याची थैली पुष्कळ रिकामी पडली. पुढें कार्यवशात नवऱ्याचें दिवाळें निघालें आणि सावकारांनीं या चुम्बनाच्या पैशावर टांच आणिली तेव्हां स्त्रीधन ह्मणून तक्रार काढण्यांत आली. कोडतानें त्या प्रकरणाचा निकाल केला कीं एखादा करार कायदेशीर होण्यास त्याला मोबदल्याची कबुलायत लागते. ती चुम्बनाच्या मोबदल्यानें पुरी होत नाहीं तेव्हां हें स्त्रीधन नव्हे त्या अर्थी सावकारांच्या ऋणफेडीकडे त्याचा विनियोग केला जावा. स्त्रीधनाची व्याख्या चुम्बनाच्या मिळकतीला कोडतानें लागूं केली असती तर दुनियेंतले सर्व भाग्यशाली नवरे दिवाळखोर व नादार ठरून सावकारी ठार बुडाली असती! अधरपानाचा घुटका तसाच विलक्षण आहे!

# The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 19 1892

The other day a Municipality in the Bombay Presidency was closed. The matter has now lost its novelty and we are prepared to hear similar collapses if they occur at all. Some argue that success or failure of a Municipal institution is a certain index of the ability or otherwise of the Natives to take part in the administration of the kingdom. We join issue with them. Though the Local-Self Government is not a foreign plant to the land of this nation still the old Village Panchayats were too crude to admit of the modern extension; and the new system of local-self Government that is grafted upon the old one is capable of a vast development. It is perhaps a school for the Indian politicians to learn their A, B, C, so as to entitle themselves to the greater franchises and liberties that are accessible to the people of other nations. So we are of opinion that failures in the municipal institutions will sharpen our energies and strengthen our nerves to make a resolve to succeed better under the present emergencies and will in one way or another be a stepping stone to a future career of decisive battle under all sorts of probable contingencies. Do we not hear of similar failures of representative governments in the Western nations? Plainly yes. Have such drawbacks demolished the like institutions of any country? Certainly not. The difficulties are a severe instructor and it is not an ill omen for the local bodies to see them face to face. We should not therefore leave off work with despair.

There are eight municipal committees in the province & all of them are more or less making an onward march of progress & reform. These bodies were till now free from the control of the local Government in connection with their powers over their own treasuries. Those powers are, by a recent legislation, restrained, & are subjected to the sanction of the Deputy Commissioner of the District, the Commissioner & the Resident of the province. A municipl committee cannot undertake original works or repairs that will cost more than Rs. 500 without the sanction of some fixed authority. We were in the beginning sorry for it; and but on a second and perhaps a better thought we saw no such reason to grumble against the Resident. It is true that whether we like it or no, we must obey the law that is dealt out to the municipal bodies. But there is one good point in it. The more we are thus contrained with rules and regulations the less will be the ground for chances to come in the way of our success. It makes doubly sure that the Government will be at fault if there happen a waste ot the municipal fund. The Government will not at least come forward to condemn the local municipalities. Meanwhile it is open for us to gain a firm footing in the management of our own concerns & leave few grounds for disapparoval ot our proposals & budgets. The right of sanction is like the right of a veto & we shall take care to give no occasion for the exercise of vetoing our proposals. We say this because it is after all our Government that we are to satisfy & its good certificate is the highest pass-port that we hope to achieve. We are therefore obliged to Mr. Plowden because he has placed us on a safer ground in so far as the waste of money was at stake.

---

Ram Mohan Roy was the first native who understood the importance of the Western education. Metaphysics or sciences of the like nature he condemned as being far from useful & practical. He disapproved of the old schools of Vedic literature & had often expressed himself to that effect with eloquent and forcible arguments. When there is now a days a tall talking about the revival of old learning in Bengal we would do well if we quote below a good word of advice from the above gentleman whose memory we bless with a number of happy assoications He remarked:—

"We find that the Government are establishing a Sanscrit school under Hindu Pandits to impart such knowledge as is already current in India. This seminary, similar in character to those that existed in Europe before the time of Lord Bacon, can only be expected to load the minds of youths with grammatical niceties and metaphysical distinctions of little or no practical use to the possessors or to society. The pupils will then acquire what was known two thousand years ago, with the addition of vain and empty subtleties produced by speculative men, such as are already commonly taught in all parts of India. Sanscrit language is so difficult that almost a life—time is necessary for its acquisition, and is well known to have been for ages a lamentable check on the diffusion of knowledge: and the learning concealed under this almost impervious veil is far from sufficient to reward the labors of a life."

---

The Bombay Gazette agrees with Sir David Gostling the President of the Western Industrial Conference in his remarks upon the caste-system. It is good to remember well in mind how technical education is possible in the old professional castes of the native. We may quote the following few lines as a broad plain principle of future action:

"With caste on the religious side, he rightly disclaimed any intention to interfere. From his point of view each separate caste is a trades union for that particular trade. In its essence, it is a union of members of the same trade, banded together for mutual assistance. In this socialistic aspect he considered that caste deserves encouragement. The evil is that one caste looks down upon another with a feeling of contempt, and he urged the educated and progressive of Hindu society to discourage this feeling, which is inconsistent with any real national life. He recommended the strengthening of caste as a labour-union of people following the same trade, and urged that the technical education of the different castes is a necessity, if any real industrial progress is to be effected. The object to be kept in view is the establishment of a Trade School in every village, and in each ward of a town throughout the country. If all the castes of a village or town combine for the purpose, the board of the District in which the village is situated should provide the funds to pay a capable teaching staff The castes in the towns might first come under technical instruction, and when teachers became more numerous, the villages would be provided in their turn,"

We do not hold these views about our caste-system. We are diffident whether the castes as so many trade-centers will admit of extension. The present castes represent rather the truth that unity of profession and calling will bring men together to live as a body compact. In our society a man is born a gold-smith, blacksmith or tailor. His caste allows him a particular status with which he starts in life. The modern influences are contrary to such a preordained status. We are changing fast and our old trade centers have no real polity. The wants of the day are quite different. Irrespective of castes men are longing after technical education and it is for the Goverment to afford it by all means possible. In our province there are few technical schools. The Missionary school at Akola is rather not acceptable to the people and the educational department has not found out funds to institute any. We hope however something will follow in no distant future.

---

The 'Humanitarian' magazine edited by a lady of high education at New York has an appropriate remark about the 'aristocracy of blood' that our forefathers manitained from a matter of principle. Mrs. Woodhill Martin observes:—

"Philosophers in archaic times realized that the same hereditary laws which govern the breeding of healthy and superior animals applied as well to the human race. They commented upon these laws, and when in power, legislated upon them. With the Hindoos we find these laws made a moral obligation of of religion. An ideal standard was made in the name of religion, to which the choice or selection of the individual was made to conform. A Brahmin was forbidden to marry any one who was unhealthy, or whose parents were afflicted with defiling maladies, and references were made in the Vedas to beauty of form and moral qualities, "blessed is he whose choice is approv-ed by all the good." Poets of antiquity sang and glorified in verse the ancestors of heroes. * * * What poor soil is to the vegetable kindom, poor food is to the animal kingdom. "A man is what he eats and what his mother has had to eat during his gestation" states part of the truth. A pedigree register would state effect —the individual is devitalized, poverty of blood— cause, parents were over—worked or physically exhausted, or the individual has been overworked, or has been working in a vitiated atmosphere or at trades prejudicial to health. or has had insufficient or innutritious food. The moral would inevitably be drawn that energy for good cannot be developed in the child when it is not pre-existent in the parents. *Ex nihilo nihi fit*"

---

## वऱ्हाड

हवामान— या आठवड्यांत एक दोन मोठे पाऊस पडले तरी दुःखांत सुख एवढेंच कीं बाकीच्या वेळीं चांगली उघाडी होती. गेल्या पावसामुळें खरीपाचें पीक रुपयांतले आठ दाहाच आणे पर्यंत उत्पन्न होईल असें म्हणतात. रोगराई म्हणण्या सारखी विशेष नाहीं.

कर्नल मेकंझी कमिशनर, वऱ्हाडा. यांची स्वारी गेल्या सोमवार पासून पंधरा दिवसांच्या फिरतीवर रजेवर सिमल्यास गेली आहे.

वाशिमच्या इंग्रजी आफिसांतील लोकल फंडकडील ७५ पगारावर रा. रा. तुकाराम रामचंद्र पाठक यांस बदलीवर नेमलें ही संतोषाची गोष्ट आहे यांचे हक्क मागेंच विचारांत घेतले पाहिजे होते परंतु वरिष्ठांची मर्जी आतां प्रसन्न झाली.

राजश्री तुकारामपंत यांच्या ६० रुपये पगारावर रा. रा. गंगाधर हरी साने यांस नेमलें.

मि. मारिस साहेब रजेवरून परत येऊन त्यांनीं गेल्या सोमवारीं येथील डेपुटी कमिशनरचे कामाचा चार्ज घेतला.

पुढील सोमवारीं रजिस्ट्रेशन खात्यांतील मोहरील लोकांची परिक्षा होईल. आणि त्या चे दुसरे दिवशीं पोलीस कानस्टेबलांची परिक्षा होणार आहे.

दाक्षिण सिकंदराबाद छावणी व हैदराबाद रेसिडेन्सी यांच्या हद्दी मधील फौजदारी खटले अलिशान रेसिडेंटांच्या व त्यांच्या हाताखालील कोडता मधून न्यायाच्या सोयी करितां काढून वऱ्हाडचे जुडिशिअल कमिशनरांच्या व त्यांच्या ताब्यांतील कोडतांच्या समोर चालविण्या साठीं वाढण्यांत येतील आणी ही अंमलबारी होण्या पूर्वीं त्यांची प्रासिद्धी सरकारी ग्याझेटांतून हिंदुस्थान सरकार करतील.

वाशिमकर — पत्रें पोचलीं. पुढील अंकीं छापण्यांत येतील.

क्याप्टन डालम या नांवाचे कोणी नवे असिस्टंट कमिशनर अकोल्यास वाढल्याचें कळलें.

येथील इंग्रजी आफिसांतील ६० रुपयाच्या जागेच्या वर्गाविर्गात खालील गृहस्थ पुढें सरसावले:- क्रीं, नारायण वामन, दामोदर मार्तंड व प्रल्हाद नारायण यांचे अनुक्रमें ६०, ५०, ४० व ३० असे पगार झाले.

येथील बुटाजी देशमुख छापखान्यांत चालू असलेल्या वर्षोत्सव व्याख्यान मालेंतले ६ वें व्याख्यान मुनशी अझिजुद्दीन एक्स्ट्रा असि० कमिशनर यांचें काल सायंकाळीं झालें. 'इराण आफगाणिस्थान आणि सामान्यतः मध्य एशिया या भागाची भूगोलरचना, तिकडील रहिवाशी लोक व उत्पन्न होणाऱ्या वस्तु या संबंधाची माहिती' हा विषय होता. व्याख्यान इंग्रजींत झालें.

## वर्तमानसार.

टेक्निकलइन्स्टिटयुट

ही संस्था सरकारनें स्थापन करून सुमारें ४ वर्षें झालीं परंतु त्यांतील विद्यार्थ्यांस जसा मार्ग लागावा तसा लागला नाहीं हो मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. "नांव मोठें व लक्षण खोटें" या ह्मणोला आणि आमच्या सरकारच्या कृतीला तिळ इतकें सुद्धां अंतर दिसत नाहीं. जर सरकारानें धंदे शिक्षणाची ह्मणून ही शाळा स्थापन केली तर ह्यांतून परीक्षा देऊन निघालेला मोहरा प्रत्येक कारखान्यांत चमकला पाहिजे पण ती स्थिती मुळींच दृष्टीस पडत नसून आमचे इकडील मुजुरदारास जें शहाणपण आहे तें त्यांच्यांत दिसत नाहीं. पोषक चांगला करतील, साहेब लोकांगरोबर फाटका बूट चढवून लुवडे लुवडे बोलून कांहीं मजकूर समजावतील, परंतु जातीच्या उमेदीनें आगबोटीवरील यंत्रें, आगगाडीवरील इंजिनें, चालवितील अथवा भुगर्भ शास्त्राच्या शोधानें निरनिराळया प्रकारच्या खाणी कढून त्याजवर आपला उदर निर्वाह करून देशहिताचे कारखाने उभारतील असें एकही उदाहरण प्रत्ययास येत नाहीं तर असल्या इनस्टिट्युटमध्यें शिकून पास झाल्याचा उपयोग तरी काय? उलटी हीं पोरें चारगट मात्र होतात; नाहीं उन्हामध्यें काम करवत, नाहीं चहाशिवाय पाऊल टाकवत, नाहीं पेनसली शिवाय हिशेब करवत, नाहीं बाजारचा सद्दा माहीत, नाहीं लौकिकाची चाड, नाहीं धर्माचें वळण, नाहीं वडिलांचें प्रेम, नाहीं जातीच्या शिहिण्यावाचण्यांत बाणा. ढब इंग्रजी, तऱ्हा हिंदवानी. वडारीलोक गाढवाला घोड्याचा पोषाक देऊन जसें नटिवतात तशा आमच्या ह्या पोरांची गत झाली असून लोक ठणठणा करीत आहेत तरी सरकार खरे हिताचे आणि उदरनिर्वाहाचे साधनास लागणारी विद्या देत नसून भलत्याच फंदाला लावतें हें काय मुद्दाम कां सहज याचा विचार ज्यांचा त्यांनीं करावा हें बरें.' 'महाराष्ट्र मित्र' कर्त्यांनीं हा चटकदार लेख असा असंबद्ध, खोटानाटा, व कमसमजुतीचा लिहिला नसता तर मोठी मेहरबानी झाली असती!

नागपुरास असलेले राजकुमारस्कूल रायपुरास नेमणार म्हणतात.

"कोर्नेलिया सोराबजी" आक्सफोर्ड येथील कायदे विद्यालयांत बारिस्टरची परीक्षा पास झाल्या. त्या बाई मुंबई हायकोर्टांत बारिस्टरचें काम करण्यास लवकर येणार. या बाई बायकांचीं कामें मुख्यत्वें करून घेणार, स्त्री बारिस्टरचा हा पहिलीच देखावा आहे.

मा० मि०

सन १९०० सालीं जें पारीस येथें प्रदर्शन भरणार आहे त्यांत चंद्र पृथ्वीपासून फक्त ४ च मैल अंतरावर असल्यासारखा दिसण्याची तजवीज उत्तम दुर्बिणी लावून करण्यांत यावयाची आहे.

लंडन एथील एका व्यांकेचें दिवाळें निघालें. आतां जिकडे तिकडे दिवाळींच निघतात हें व्यापाराचें चांगलें चिन्ह नव्हे.

इजिप्तच्या संबंधानें फ्रान्स व रशिया यांचा एक विचारानें चालण्याचा निश्चय झाल्याचें समजतें.

सु० प०

मुंबईइलाख्यांत दोन माणसांस एक गाय, चार मनुष्यांस एक मेंढरूं, ऐसी मानवांस एक घोडे आणि चवदा माणसांस एक नांगर ह्या प्रमाणें वाटणीस येतात. आह्मास दुसऱ्याच्या तोंडाकडे पहावें लागतें ह्मणुन ही शोचनीय स्थीती. दुसरें काय?

निजाम हैदराबादचा अन्न घेण्याचा बीभत्छ खटला १८ अक्टोबरपर्यंत तहकूब राहिला आहे.

मि. दादाभाई नौरोजी पार्लमेन्ट मेम्बर झाल्या बद्दल निझाम हैद्राबादेस सभा होऊन आनंद प्रदर्शित करण्यांत आला.

चिनाहिल प्रांतांत वेगळाल्या ठिकाणी लश्करी लोकांकरतां घरें व बराकी ताबडतोब बांधण्याचें ठरलें आहे.

पिनागचे बातमीवरून समजतें कीं खिडीचे संरक्षण करणारा इंग्रजकामदार वाकर याच्याशीं तेथील लोकांचा एक सामना झाला व त्यांत इंग्रजाचे तर्फेच शिपायी मेले.

मध्यएशीयांत रशियाच्या ज्या खटपटी चालल्या आहेत त्यांवरून हिंदुस्थानचा व्यापार मध्यएशिया व चीन यांच्याशी आहे, तो बंद करण्याचा रशियाचा इरादा आहे असें दिसतें. बुखाऱ्याचा अमीर व रशिया हे एक होऊन मध्यएशियाच्या व्यापाराची नाकीं बंद करीत आहेत; आणि पामीर आपल्या हातांत घेऊन चीनच्या व्यापाराची नाकीं बंद करण्याचा रशियाचा विचार आहे, असें जर्मनींतील बातमी वरून समजतें.

बंगालचा सातवा तोफखाना, दुसरा व तिसरा रिसाला, दुसरा, पांचवी व बाविसावी पलटण इतक्या फौजेस लढाईवर जाण्यास तयार असा असा सरकारचा हुकूम झाला आहे ही फौज देरा इस्मायलखान याच्या पलीकडे जावयाची असून तिला लढाईला जाण्याच्या वेळीं जसे कपडे दिले जातात तसे कपडे व खाण्यापिण्याचा सर्व खर्च असें सरकारांतून देण्याचें ठरलें असेंही समजतें. ही तयारी कशाकरितां हें मात्र समजत नाहीं.

कलकत्याच्या एका व्यापारी कंपनीनें दिवाळें काढलें व दुसऱ्या कांहींची बोलवा आहे.

निजाम सरकारचे होम सेक्रेटरी मेहेदी अली यांनीं मित्र नांवाच्या एका बंगाली गृहस्थावर अन्न घेतल्याची एक फिर्याद केली असून त्याची चवकशी हल्लीं चालूं आहे. फिर्यादीच्या लग्नाच्या संबंधाचें एक लहानसें बुक छापून त्याच्या १०० प्रती वाटल्या व त्या मुळें माझी व माझ्या बायकोची अब्रु घेतली असें फिर्यादीचें ह्मणणें आहे. त्या बुकांत काय लिहिलेलें आहे हें आज पर्यंत फारच थोड्या लोकांस समजलें असेल, पण फिर्यादीच्या तीन दिवसांच्या उलट तपासणीची जी हकीकत आतां जगजाहीर झाली आहे ती लक्षपूर्वक वाचूं लागलें ह्मणजे हें प्रकरण नुसतें वाईट नसून नासकें, कुसकें व सडकें असें आहे असें दिसतें आणि त्याकरतां फिर्यादीनें फिर्याद केली नसती तर फार चांगलें झालें असतें असें मनांत येतें. फिर्यादी व फिर्यादीची बायको आणि दुसरे लोक यांच्या आचरणाबद्दल तर फिर्यादीस प्रश्न झालेच पण, त्यांत तरुण सालरजंग, त्याचें शयनगृह. वगैरे संबंधाचे जे प्रश्न करण्यांत आले आणि त्यांतच एका गव्हरनरजनरलचा जो संबंध आणला आहे त्या सर्वांबद्दल विचार करूं लागलें ह्मणजे, जी हल्लीं स्थिती दिसते ती मनांत येऊन फार दुःख होतें. सालरजंग हें नांव ऐकून जी पूज्यबुद्धी होते तिला हें एका जातीचें विरजण आहे. तें खरें नसेलच, पण तें खरें नसलें तरी अशा तऱ्हेचे प्रश्न होणें हें आमच्या आजच्या स्थितीस वाईट आहेच.

समरकंद पासून ताशकंद पर्यंत सरकारी खर्चानें रेलवे करण्याचें रशियन सरकारानें ठरविलें आहे. तसेंच मध्यएशियांत मुरगांव नदीवर रशियन झाराची जी खासगी मिळकत आहे त्यांत एक कालवा करण्याचें कामही लवकरच सुरू होणार असें सांगतात. हें दुसरें वाक्य वाचून चमत्कार वाटतो मध्यएशियांत मुरगांव नदीवर रशियन झाराची खासगी मिळकत कोठून आली! मुंबई जशी इंग्रजांस आंदण मिळाली तसें झारास तिकडे कांहीं मिळालें आहे कीं काय!

अफगाणिस्थानच्या ईशान्येकडील हद्दीची तपासणी करण्याकरतां अमिरानें काशघर नांवाच्या आपल्या एको कामदारास पेशावर काश्मीर या वाटेनें रवाना केलें व तो श्रीनगर येथें आला तेव्हां तो रशियाचा गुप्त हेर आहे असें समजून काश्मीर सरकारानें त्यास कैद करण्याचा हुकूम केला, पण हिंदुस्थान सरकारानें त्यास जाऊं दिलें.

अमिराच्या फौजेनें हजारी लोकांवर जय मिळवून त्यांचा एक टापू कबजांत घेतला.

हिंदुस्थान सरकारचें एक वकील मंडळ आह्मास भेटण्याकरतां येणार आहे त्यास कोणी हल्ला हरकत करूं नये असा काबूलच्या अमिरानें जलालाबाद प्रांतांत एक जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे. भेटीची तारीख वगैरे कायम होणें आहे.

ठा० अ०

---

## जाहिरात

—— 0 ——

अहो स्वदेश बांधवहो, परदेशी औषधी जुलत्या रंगभाज व कमिशन जास्त पाहून कां फसतां? इकडे थोडें लक्ष द्या.

आमचे दवाखान्यांत सर्व रोगांवर औषधी विक्रीस व दरिद्री लोकांस फुकट तयार आहेत; परंतु त्यांत ज्या हटकून गुण खात्रीनें देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जी दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्यावर पत्र पाठवावें. ह्मणजे आम्ही व्हाल्युपेबलनीं पोस्टमार्गें लवकर पाठवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरुस्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमिशन देऊं. व त्यांनीं विक्री करून दाम पाठवावें.

१ गजकर्णावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ८ आणे.

२ मूळव्याध कितीही दिवसांची दुर्धर असेल त्यावर मोडावर लावण्याचें व पोटांत घेण्याचें दोन औषधी मिळून किं. १॥ रु.

३ चातुर्थिक ज्वर ह्मणजे चवथारें हिंव ताप त्याच प्रमाणें तिजारे, व दररोज येणारे कितीही दिवसांचे असो, त्याजवर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. किं. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्याच्या डबीस १०५ या औषधानें कडक तापही जातो.

४ परमा तिडिक व स्वप्नावस्था, व कोठ्यांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहूणपुडा किं. १ पुड्यास ०१४ आणे.

५ बाळंत रोग बाळाचे डबे व सटवी बाधा व प्रदर सर्व तऱ्हेचा किं. १ डबीस १॥ रु.

६ वीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास किं. २॥=

७ नारुवर ९ दिवसांत गुण. लावणें व खाणे याच्या डबीस किं. ।=

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट गुळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस किं. ॥।

जुलाब उत्तम राजस तकलीफ अगदीं नसून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल किं. ।। रु.

१० मेदोरोग व भुरें व उन्माद यावर अगदीं जल्द गुण १ बाटलीस किं. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्राव व ऋतुस्नात होण्यास व गर्भधारणास बंदेज ह्यांवर हें एकच औषध फार चांगलें आहे. १ डबीस किं- १॥

१२ पिनस व मस्तकशूळ व अर्धशिशी याजवर दर डबीस किं. ।०=

१३ हागवण व अतिसार १ डबीस किं. १।=

१४ वृषण एकारल्यास व वृद्धीस १ डबीस किं. १ रु.

१५ कावरले कुत्रें व कोल्हे व तेल्या उंदीर डसल्यास १ डबीस किं. १। रु.

१६ मेहानें अगर उष्णतेनें पाय उलून रक्त जाणें व संधि दुखणें ह्यावर १ डबीस किं. १॥ रु.

१७ महामारीवर अगदीं जलद गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ५० गोळ्याच्या डबीस किं. १०–

१८ गर्मी उर्फ उपदंश संबंधी विकार क्षतें यांजवर १ डबीस किं. १॥ रु.

१९ फसकी उर्फ मज्जागतवात व शूळ याजवर लवकर १५ मिनिटांत गुण १ डबीस किं. ·॥· हें १५ मनुष्यांस पुरेल.

२० कऊळ, नळगुद, पंडु, सूज व मुत्ररोग ६५ व सन्निपात १३ यांवर १ डबीस किं. १॥ रु. ही ३ मुलें व २ पुरुषांस पुरेल.

२१ सुवर्णमालिनीवसंत खात्रीचा १ तोळ्यास किं. ७ रु.

२२ योगराज गुगुळ १ तोळ्यास ४॥ रुपये.

२३ नामर्द ह्मणजे नपुंसक कितीही दिवसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त खात्रीनें होईल. १ बाटलीस किं. ३ रु. गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोळ्यांतील फूल वगैरे रातांधळें लाली खुपरी चुळ चीपडे गळती याजवर १ डबीस किं. १०६

ह्या शिवाय पोष्टेज निराळा पडेल.

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेशा मागवून विक्री करील त्यांनीं विक्री करून पैसे मागाहून पाठवावे.

(पत्ता व सही) शिवचरनगीर रामगीर
कुरणखेडकर अकोला गंगावरचे
माडीवर चौकांत दवाखाना.
वऱ्हाड.

---

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाचा आगाऊ रु० ५ डाक हाशील ०१२
साहामाही ,, ३ ,, ०८
सालअखेर ,, ७ ,, १०८
किरकोळ अंकास ..............................०४

नोटिशीबद्दल.
१० ओळींच आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ..........०१

Annum in advance 5 Postage 13 as
Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly...........3 ,, 8 as
Single copy..................................4as

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXVI AKOLA MONDAY 26 SEPTEMBER 1892 NO 38

वर्ष २६ आकोला सोमवार तारीख २६ माहे सप्तेंबर सन १८९२ इ० अंक ३८

डा० वामन गोपाळ यांचा
सार्सपरिला

हा सार्सपरिला अनेक रोगावर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे. उपदंशजन्य विकार (गरमी) व तिजपासून होणारा पक्षघातादी भयंकर रोग संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हातपायांच्या तळव्यांवर व सर्व शरीरावर काळे डाग पडणें संधी दुखणें, कळा लागणे, सूज येणें सर्व संधिगत वायूवर तसेंच कोणत्याही प्रकारचें त्वचेचे रोग जसें सर्व शरिरास कंड सुटणें, खरूज गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातपायांची आग, होणें, तसेंच रसायनें वगैरे कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दुषित झालें असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखें दुसरें औषधच नाहीं दर बाटलीस किंमत १। रुपया. पोस्टेज ४ आणे, उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक, धातु व रक्तवर्धक मिश्र फा फ रसाच्या,
गोळ्या

या पासून अतिशय विषयोपभोग नित्य धातुश्राव यानें झालेली क्षीणता जाऊन कडकी, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तात्काळ नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चैतन्याचा व बुद्धि व मरणशक्तीचा राजा जो मज्जा (मेंदु) व मज्जतंतु याच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचें पुनरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुंची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत किंमत २४ गोळ्यांचे एका बाटलीस १४ आणे बंगी व पोष्ट मिळून एका पासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा
कल्प.

हा कल्प प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें, सफेद करड्ये व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रु० पोष्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधा सोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्हि. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता—नव्याठाकूर द्वारासमोर.

### नोटीस

रा. पांडुसा वल्लद रामाकिसनसा, रामकीसनसा वल्लद सदोबा रंगारी खोसती सरागते राहणार कारंजा तालुके मुर्तीजापुर जिल्हे उमरावती. मी खाली सही करणारा कळवितोंकी आपण जादुखोर मनुष्य आहा हें गांवांत पुष्कळ लोकांस माहीत आहे आणि रा. रा. गोविंद रामजी सोनार डोंगरे यानें तुह्मावर फौजदारी फिर्याद दिली होती त्यात माझी साक्ष होती. तुह्मी मजला सांगितलेंकीं तुह्मी साक्ष देऊ नका. नाहीं तर सोनाराचे घरचे जसें माणसें मानगींत आहेत त्या प्रमाणें तुमची तजवीज करू अशी धमकी दिली. आखेरपरियंत मी ऐकीले नाहीं त्या मिती पासून मी फारच फार मानगींत आहे. ताप येणें पोट दुखणें ढाळ होणें, अनंत ताप होतात आता माझा मरण समय आला आहे तरी तुह्मास दया येत नाहीं. आता मी हात जोडून कळवितोंकीं मजला आपण आठ दिवसाचे आत नीट करून दिलेंतर बरें आहे नाहींतर वर सांगितलेली जोखम तुह्मावर आहे हें विनंती. आपण तोंडी बोलता कीं गांवात या वेळेस माहामारीचा उपद्रव असतां तर बरेंच होतें त्यांत तुह्मास दाखविलें असतें. करू काय! बरें चिंता नाहीं अशी धमकी देता. माझे कांहीं प्राणास झाल्यास तुह्मी मालक आहा तारीख १९ माहे सपटंबर सन १८९२ इसवी.

सही

सही बाळाजी वा गोविंदा याचे हातची निशाणी असे द. खु.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकुर पत्रकर्त्यांच्या मतांस मिळूनच असतील असें समजूं नये.

वाशीम तारीख १८।९।९२

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस

कृतानेक सा० न० वि० वि० पर्जन्यानें कहर केला आहे. आजपर्यंत सुमारें ९० पन्नास इंच वृष्टी झाली. अजून पावसाळा राहीला आहे. तेव्हां पुढें आणखी किती इंच पडाणार याचा नेम लागत नाहीं. शेतें अगदीं जमीनदोस्त झालीं. शेतांतून पाण्याचे लोट चालले आहेत. जिकडे पहावें तिकडे पिकलेलीं शेतें दिसतात. वरचा पाला झडून गेला. कपाशीचे दांडे उभे, त्याच प्रमाणें जवारी. मुग, उडीद तूर यांची स्थिती! रुपयापैकीं दोन आणे ही आज मितीस, उत्पन्नाची आशा राहिली नाहीं, शेतकरी लोक रात्रंदिवस हळहळतात, पिकें बुडालीं असा सर्वत्र ध्वनी ऐकूं येतो. आषाढ पौर्णिमेपासून आजपर्यंत दोन महिन्यांत एक दिवस ही उघाडी नाहीं. शेतांतील गवत निंदण्यास अवकाश नसल्यामुळें शेतें खालीं व गवत वर असा प्रकार होऊन, अतोनात नुकसानी शेतकरी लोकांना सोसण्याचा प्रसंग येऊन बेतला आहे. या स्थितिला "दुष्काळ ओला" असें ह्मणण्यास अगदीं हरकत नाहीं. देशाची भरभराट व लोकांच्या उपजिवीकेचें साधन सर्व काय ती शेती. तिची अति वृष्टीनें अशी दशा झाली तर पुढें आपलें होणार कसें या विवंचनेंत लोक पडले आहेत. एक सारखा दोन महिन्यांपासून पाऊस पडत असल्यामुळें लोकांची स्थिती अगदीं दीनवाणी झाली आहे. जीव अगदीं त्रासून गेला आहे. इकडे घरें बहुतेक धाब्याचीं. ज्यावर माती आहे अशीं सर्व गांवांत फार झाली तर शेपन्नास निघतील. सदोदीत वृष्टी चालली ह्मणजे धाबी किती टिकाव धरणार! ता० १०।११ माहे सपटंबर सन १८९२ इसवी हे दिवस मोठ्या संकटाचे व विपत्तीचे लोकांना वाटले! केवळ आप व वायु हीं भुतें लोकांचा ग्रास करण्याकरितां खवळलीं काय असें क्षणोक्षणीं वाटत असे. एक सारखी सपाट्याची वृष्टी चालल्यानें घराच्या बाहेर तोंड काढण्यास छाती होईना. घरांत रहावें तर धाबीं पाण्यानें भरून गेलीं. भराभर धाब्यांच्या भिंती पडूं लागल्या धान्य कपडे लत्ते व इतर घरांतील सामान यांची माती होऊन; शेकडों लोकांचें नुकसान झालें. आज मितीला गांवांत जिकडे पहावें तिकडे भिंती पडून मोठे मोठे रस्ते ही मातीनें भरून गेले आहेत. घरांत जागा आंत ओली. यामुळें आजार घरोघर आपलें बिऱ्हाड ठेऊं पाहात आहे. एक सारखी वृष्टी होत असल्यामुळें बाजार भरत नाहींत. बाहेरून धान्य येत नाहीं. जे लोक हातावर पोट भरणारे आहेत ह्मणजे मोल मजुरी करावी, दोन आणे मिळवावे, तेव्हढ्या पुरतें धान्य आणावें व निर्वाह करावा त्यांची या पावसामुळें काय स्थिती असेल याची कल्पना आपणच करावी. शेतीची व लोकांची अशा प्रकारची दैना चालली आहे. एकंदरींत सालमजकुरीं सुबत्ता होण्याची आशा नाहींशीं झाली. पुढें येणारें साल मागल्यास बरें ह्मणवितें अशी स्थिती दिवसानुदिवस होत चालली आहे. अशी स्थिती लोकांच्यानें किती दिवस कटवेल कोण जाणें. आजपासून जरा उघाडी दिसते आहे. ह्या प्रसंगीं मि० भागवत आकोल्याचें एक प्रसिद्ध वकील हे एका मुकद्दम्यांत येथें आले होते त्यांनीं येथील पावसाच्या वेळची सर्व स्थिति अनुभवला असेलच. दुःखामध्यें सुख इतकेंच कीं गांवांच्या नजिक मोठी नदी नसल्यामुळें नदी पासून होणाऱ्या नुकसानीचा अनुभव या गांवास मिळाला नाहीं. हें तरी नशीबच म्हणावयाचें! तरी देवपेठेंत श्री बालाजीचे मंदीराचे मागें कांहीं गरीब लोकांचीं झोंपडीं आहेत त्यांत एका जवळच्या ओढ्याला पुर येऊन त्यानें पाणी शिरलें व गरीब लोकांना आर्द्रा निराश्रित करून टाकिलें. अशी वृष्टी इकडे बहुत दिवसांत झाली नाहीं असें लोकांचें म्हणणें आहे. ईश्वर करो व कांहीं दिवस उघाडी मिळो! असें झालें तरच लोकांचा बचाव होणार आहे.

येथें इंग्रेजी हॉफीसांत पन्नासांची लोकल फंडा कडील जागा होती ती पाउणशेंची झाली. त्या जागेवर मि. तुकाराम रामचंद्र पाठक यांस नेमिलें व त्याच्या जागेवर साठ रुपयांवर मिस्तर गंगाधर हरी नामजोशी यांस नेमिलें. मिस्तर तुकाराम पंत यांस मागेंच वामनराव साने मरण पावले तेव्हा ८० ची जागा मिळावयाची परंतु कित्येक खटपटी मंडळीच्या खटपटीनें ती संधी हुकली होती त्या मुळें मिस्तर तुकारामपंत याचे पुष्कळ नुकसान झालें तर ह्या प्रसंगीं त्यांचे नुकसानीचा व त्यांचे हक्काचा विचार मे० डेप्युटी कमिशनर साहेब बाहादूर व त्याच प्रमाणें त्यांच हाफीसचे दयाळु हेडक्लार्क मिस्तर टामसन यांनीं केला या त्यांच्या न्यायी बुद्धी बद्दल त्याची स्तुती करावी तितकी थोडी. व पुढें ही जेव्हां जेव्हां बढतीची संधी येईल तेव्हां तेव्हां ते मनापासून मोठ्या मनानें व दयाळु अंतःकरणानें लोकांच्या हक्काचा विचार करतील तर लोकस्तुतीस अधिकाधीक पात्र होतील.

येथील नेटीव जनरल लायब्ररीची सभा ता० १८ रोजीं आहे. तींत एक मसुदा तयार केला आहे तो पास करावयाचा आहे. तो असा कीं उत्पन्नावर वर्गणी ठेविली आहे. मला वाटतें लायब्ररी संस्थाची वर्गण्या अशा प्रकारें कोठें वसूल होतील असें मला कळलें नाहीं.

(रा. अण्णासाहेब माहाजनी यांना मुंबई युनीव्हरसिटींत परिक्षक नेमिलें हें वाचून सर्व वऱ्हाड प्रांतियांना आनंद झाला. व योग्य मनुष्याचा युनिव्हरसिटीनें सत्कार केला या बद्दल युनिव्हरसिटींतील चालकांची तारीफ केली पाहिजे. इकडे अण्णासाहेबांची जरी कितीं विश्रुत आहे तरी तिकडील युनिव्हरसिटीच्या संबंधें पाहिलें असतां रा पूर्वीं कधींच त्यांनां परीक्षक नेमिलें पाहिजे होतें व युनिव्हरसिटी मध्यें फेलो केलें पाहिजे होतें. अशीं विद्वान रत्नें मिळणें फार कठीण आहे. हे अण्णा साहेब डेकन कालेज्यांत असतां सर्व परीक्षा एक सारख्या पास झाले! नापास असा डाग नाहीं. त्या वेळचे कालेज्यांतील प्रोफेसर लोक यांच्यावर मोठी प्रिती करीत केरु नाना छत्रे यांना हे अतीशय आवडत असत. बिये झाल्यावर हे फेलो होते. त्या वेळीं छात्र समुदायाची प्रिती यांच्यावर फार असे. तेथून इकडे आकोला हायस्कुलांत मिस्तर मराठे हे आपली फ. अ. ची जागा सोडून गेल्यावर यांना फ. अ. १७५ पावणे दोनशावर आणिलें. त्या वेळीं अकोला हायस्कुलाचे हेडमास्तर मिस्तर स्कोरजी साहेब होते. हे वऱ्हाडांत फ. अ. होऊन आल्यावर

अभ्यासाचा व्यासंग पुढें चालू ठेऊन आपल्या बुद्धीमत्तेच्या जोरावर एम. ए. चीं परीक्षा पास झाले. (पुढें चालेल)

### नोटीस.

बळीराम वल्लद मनाजी कुणबी राहणार कसूरे तालुके बाळापूर यांस खाली सही करणार इजकडून देण्यांत येतें कीं तुमच्याशी माझा विवाह होण्यास तेरा १३ वर्षे झाली असून मला वयात येऊन दोन वर्षे झाली आहेत तुम्हांस बरेच दिवसा पासून माह्या रोगाची व्यथा असल्यानें तुमच्याशी सृष्टिव्यवहार होणें बंद आहे त्याजप्रमाणें मी आपले चुलत्याच्या येथें सुमारे साहा वर्षां पासून असून तुम्ही माझे खाण्यापिण्याची वगैरे काहींच तजविज ठेविली नाहीं या साठीं कळीवेल जातेकीं हो नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आत इतके दिवसाचे अन्न वस्त्राचे पैसे देऊन मला सोड चिठ्ठी द्यावी तसें न केल्यास होच फारकती समजून मला जे करणें तें करीन कळावे. तारीख २२।९।९२ इसवी.

सही

निशाणी पुंजाई मर्द बळीराम हल्लीवस्ती कापशी इच्याहातची असें.

वऱ्हाडसमाचार

मिती अश्विन शुद्ध ६ शके १८१४

## सरकारी पेढी

( वऱ्हाडच्या शेतकऱ्यांसाठीं )

वऱ्हाडांतील शेतकरी लोकांच्या सोयीसाठीं नवीन कायदा म्हणजे सन १८८४ चा १२ वा आक्ट लागू करण्यांत गेल्या वर्षी आला. त्याच्या अंमलबारीच्या सुलभते करितां अलिशान रेसिडेंट साहेबांनीं नवीन नियम केले आहेत त्यांचें प्रत्येकानें नीट मनन करण्यास चुकूं नये हें सांगून आम्ही त्या नियमांचें मराठींत समग्र भाषांतर दाखल करितों. सन १८८३ चा १९ वा आक्ट व १८८४ चा १२ वा आक्ट यांत कोणत्या गोष्टी आहेत त्या प्रत्येकानें पूर्णपणें समजून घेतल्या पाहिजेत. त्या कायद्यांची माहिती निराळी देण्याच्या विचारांत आम्ही आहों. परंतु सध्यां नुसते नवे नियमच मराठींत छापीत आहों. आम्हास खातरी आहे कीं सरकार मार्फत वरील कायद्यांचीं व या नियमांचीं मराठींत भाषांतरें हरएक तालुक्याच्या कचेरींत लोकांच्या माहिती साठीं व विक्री साठीं ठेवण्यांत येतील व त्यांच्या विषयीं लोकामध्यें सविस्तर प्रसिद्धी होईल अशी व्यवस्था करण्यांत लवकरच येईल. वर निर्दिष्ट केलेल्या नियमांचा मराठींत तर्जुमा येणें प्रमाणें:--

रेसिडेन्सी आरडर्स

आगष्ट ३१ सन १८९२

नंबर २६६

हिंदुस्थान सरकारनें १८९१ सप्तेंबरच्या २३ वे तारखेच्या फारीन रिपोर्टमेंट मध्यें नंबर ३९१३ ( आय ) चीं जाहिरात दिली कीं ( १८८४ चा १२ वा आक्ट ) ह्मणजे शेतकऱ्यांचा ऋणदान- कायदा ( आग्रीकलचरिस्टचा लोन्स आक्ट ) मुलुखअमानी हैदराबादला लागूं केला आहे. त्या कायद्याच्या कलम ४ अन्वयें जे अधिकार पोंचतात त्या अधिकारासवलो खालीं आणि गव्हरनल—इन कौन्सिल यांच्या मंजुरातीनें अलिशान रेसिडेंट साहेब, हैदराबाद यांनीं नियम केले आहेत ते येणें प्रमाणें:—

१ प्रत्येक जमाबंदीच्या वर्षी वरील आक्टा प्रमाणें कर्ज देण्यासाठीं जी रक्कम रेसिडेंट ठरवतील ती रक्कम कमिशनर आपल्या विचाराप्रमाणें निरनिराळ्या जिल्ह्यांपत वाटून देतील आणि त्या बरहुकूम सूचना प्रत्येक डेप्युटी कमिशनरास वर्षाचे आरंभीं करण्यांत येईल. एखाद्या जिल्ह्यासाठीं मुक्रर केलेल्या रकमेपैकीं कोणताही भाग दुसऱ्या जिल्ह्यास देण्याचा अधिकार कमिशनरास आहे परंतु सर्व प्रांताकरितां ठरवून दिलेली वटरक्कम जास्त वाढता कामा नये.

२ ज्या कोणाकडे मालकीची अगर वहितीची लागवड जमीन असेल अशा हरएक इसमाला या नियमान्वयें कर्जाऊ पैसा देता येतो पण हे कर्ज खालील कार्यांपैकीं कोणत्याहीं कार्यानिमित्त दिलें जाईल:—

( अ ) बीं अगर नांगरठी साठीं लागणारीं जनावरें विकत घेणें.

( ब ) आगीनें अगर पूरानें नाशापत पोंचलेलीं घरें दारें पुन्हां बांधणें.

( क ) कांहीं विशिष्ट कारणांनीं शेतीची नासधूस होऊन प्राप्त झालेली पीडा दूर करणें.

( ड ) सन १८८३ च्या १९ आक्ट ह्मणजे जमीन सुधारण्यासाठीं ऋणदान-कायदा ( लांड इमप्रुव्हमेंट लोन्स आक्ट ) यांत समावेश न झालेली शेतीविषयक गोष्ट करणें.

३. अर्जदारानें कर्ज मिळण्यासाठीं लेखी अर्ज न करितां तोंडीच अर्ज केला तर असे, प्रत्येक अर्ज लागलींच ज्या आफिसराकडे तो केला असेल तो आफिसर लिहून काढील. तहशीलदाराच्या दर्जाच्या अगर त्याहून अधिक दर्जाच्या कोणत्याही मुलकी कामदाराकडे अर्ज करण्यांत याव.

४. अर्जांत मागितलेलें कर्ज ५०० रुपयाहून जास्त नसेल तर तें कर्ज डेपुटी कमिशनरास देतां येईल; पांचशेहून जास्ती रकमेसाठीं कमिशनराची मंजुरात लागेल. आणि ५००० हून जास्ती रकमेसाठीं रेसिडेंटाची मंजूरी लागेल.

ज्या आफिसराकडे अर्ज केला असेल ते अर्जदाराची चालचलणूक, पैशा बदल ( सिक्युरिटी ) तारण देण्याची त्याची ऐपत, कर्ज देणें यथायोग्य आहे अशा विषयीं चौकशी करतील. त्या आफिसराला स्वतांच मागितलेलें कर्ज देता येत असेल तर ते चौकशी पूर्ण झाल्यावर त्यास योग्य वाटेल त्या प्रमाणें त्या अर्जावर हुकूम करितील. कर्ज त्यांना देतां येत नसेल तर ते ज्या आफिसरांच्या अधिकारांतले तें आहे त्यांच्याकडे तो अर्ज आपल्या चौकशीच्या निकालासह पेश करतील.

कर्ज देणाऱ्या आफिसरानें स्वदस्तुरचा लेख लिहून आणि आपली मंजुरात देण्याचीं संपूर्ण कारणें दाखऊन जो पर्यंत निराळा मुद्दाम हुकूम दिला नाहीं तो पावेतों ज्या कोणा कुळाकडे जमिनीचा सारा, सन १८८३चा १९वा लांड इमप्रुव्हमेंट लोन्स आक्टा खाली अगर या नियमा बरहुकूम दिलेलें एखादें कर्ज तुंबलें असेल त्या कुळाला कर्ज मिळणार नाहीं.

५. कर्जाची फेड खालील अटीवर करण्याची कबूली असेल तर तें कर्ज दिलें जाईल:–

[अ] बीं विकत घेण्या साठीं घेतलेलें कर्ज एक वर्षाच्या आंत फडलें पाहिजे.

(ब) गुरें विकत घेण्या साठीं अगर वर सांगितलेला कायदा आणि हे नियम यांत वर्णिलेल्या एखाद्या कार्या निमित्त काढलेलें कर्ज तीन वर्षांच्या मुदतींत परत केलें पाहिजे. काहीं विशेष प्रकरणांत ही मुदत दाहा वर्षे पावेतों वाढविणें झाल्यास रेसिडेंटसाहेबांस वाढवितां येईल.

६. हुकूमांत निर्दिष्ट केलेली मुदत भरण्या पूर्वी कोणत्याही वेळेस कर्जाची सर्व रक्कम अगर तिचा कांहीं भाग परत देण्याची इच्छा ऋणकोची असल्यास त्याला त्या प्रमाणें करितां येईल.

७. कर्ज देणारा आफिसर ज्या किस्ती व्याजा सुद्धां ठरऊन देतील त्या किस्त वारीनें कर्जाची फेड केली पाहिजे.

परंतु योग्य कारणा वरून डेपुटी कमिशनरचे हुकुमा अन्वयें किस्तीचे हप्ते घेण्याचे तहकूब करण्यांत येईल आणि अशा तहकुबीचीं कारणें हुकूम देणारे आफिसर लिहून ठेवतील. ही तहकुबी डेपुटी कमिशनर कमिशनर साहेबांस कळवितील आणि कमिशनर त्या प्रकरणीं योग्य वाटेल तसा हुकूम फर्मावतील.

८. कर्जाऊ पैशावर व्याजाचा सालिना दर सामान्यें करून एका रुपया मागें एक आणा अथवा शेंकडा ६I. टक्या प्रमाणें ठेविला आहे, आणि त्या दरा प्रमाणें आकारणी कर्ज दिलेल्या तारखे पासून करण्यांत येईल; परंतु रेसिडेंट साहेबांस योग्य वाटल्यास आणि विशेष कारणें दिसल्यास हा व्याजाचा दर कमी करिता येईल अथवा जें व्याज देणें निघेल तें न आकारणें अथवा त्या पैकीं कांहीं व्याजाची सूट देणें हे ही त्यांस ठरविता येईल.

मुद्दल आणि व्याज मिळून ठरलेली हप्तेबंदी वेळेवर दिली नाहींतर हप्तेबंदीच्या मुक्रर तारखेपासून त्याची फेड होई पावेतों दरसाल दरशेंकडा ६I. रुपयाहून अधीक नाहीं अशा कोणत्याही व्याजाच्या दराप्रमाणें व्याज हप्त्याच्या रकमेवर आकारणें योग्य वाटल्यास डेपुटी कमिशनर त्या प्रमाणें आकारणी करतील.

हप्ते फेडीच्या तारखा व जमिनीचा सारा भरण्याच्या ठरीव तारखा या दोन्ही एकच असाव्या परंतु अर्जदारानें कर्ज देणाऱ्या आफिसराची खातरी होईल अशीं कारणें दाखविलीं तर हप्तेफेडीच्या निराळ्या तारखा नेमण्यांत येतील.

१०. या नियमा अन्वयें दिलेल्या कर्जाचा एखादा भाग पुन्हा परत मिळण्याचा संभव नाहीं असें कळेल तेव्हां त्याजविषयीं कमिशनरकडे मुद्दाम रपोट केला पाहिजे.

११. कर्जाची रक्कम कुळाला सर्व एकदम द्यावयाची अगर दोन किंवा अधिक वेळां मिळून द्यावयाची याचा निकाल डेपुटी कमिशनराच्या विचारावर आहे.

१२. ( अ ) कर्ज निमत्त जो कूळ रक्कम देणें निघेल तिच्या तारणापुरतें किंमतीचें स्थावर जिन्नगींत अर्जदाराचें निराळें उत्पन्न असेल तर अर्जदारानें सरकारपाशीं तें उत्पन्न अगर त्याचा पुरेसा भाग ह्मणजे ज्या योगें कूळ रकमेच्या परतफेडीचें तारण मिळेल एवढेंच उत्पन्न गहाण ठेवावें आणि कुळापासून या पेक्षां जास्त उत्पन्न गहाण घेण्याचें प्रयोजन नाहीं.

( ब ) जेव्हां अर्जदारापाशीं स्थावर जिनगींतलें असें निराळें उत्पन्न नसतें तेव्हां त्यानें त्या कूळ रकमेच्या फेडीच्या साठीं एक किंवा अधिक इसम जामीनदार आणिले पाहिजेत.

( क ) परसनल सिक्युरिटी ह्मणजे स्वतांच्या खातरजमे शिवाय जंगम जिनगी फक्त तारण ह्मणून स्वीकारली जाणार नाहीं.

१३. ( अ ) कर्ज देण्याचें ठरलें तर या नियमा बरोबर नमुना ब जोडला आहे त्या बरहुकूम दिलेल्या कर्ज देण्याच्या हुकूमावर आपलें दस्कत करावें.

( ब ) कर्जाच्या फेडीच्या तारणार्थ अर्जदाराचें उत्पन्न नियम १२ पोटकलम ( ब ) प्रमाणें गहाण होत असेल तर ब नमुन्यांतील ( ड ) पोट कलम कर्ज देण्याच्या हुकूमांत घातल्यानें व हुकूमावर निदान दोन साक्षी घातल्यानें आणि या हुकूमाची प्रत १८८६ च्या ७ वे आक्टांतील ३ रें कलमा अन्वयें सुधारलेल्या १८७७ चा ३ रा इंडियन रजिस्ट्रेशन आक्टा मधील कलम ८९ प्रमाणें रजिस्टरींग आफिसराकडे धाडावी ह्मणजे तें गहाण बरोबर होईल.

( क ) जर तारणार्थ एक अगर अनेक जामीनदार असतील तर जेव्हां जामीनदार स्वतांची खातरजमा देईल तेव्हां क नमुन्या प्रमाणें व जेव्हां तो स्थावर जिनगी गहाण ठेवील तेव्हां ड नमुन्या प्रमाणें तारण लिहून घ्यावें. या तारणखतावर निदान दोघांच्या साक्षी पाहिजेत आणि १८७७ चा ३ रा इंडियन रजिस्ट्रेशन आक्टांतील वरील कलमा प्रमाणें त्याची एक प्रत रजिस्टरींग आफिसराकडे धाडली पाहिजे.

१४. कर्ज देण्याच्या हुकूमाची एक प्रत अर्जदारास मिळेल आणि ती प्रत तहशिलीच्या खजिन्यावर दाखविल्यावर कर्जाऊ घेतलेला पैसा देण्यांत येईल.

१५. कर्जाऊ दिलेल्या रकमांची माहिती, ऋणकोचें नांवगांव व स्थिति, तारणाचें स्वरूप, कर्जाची रक्कम, व्याज व मुद्दल मिळून परत वसूलाची रक्कम, माहिती पत्रकाच्या तारखेस निघालेलें शिल्लक येणें हीं सर्व नवीन घालून दिलेल्या नमुन्या अन्वयें डेपुटी कमिशनर दर साहामाहीस कमिशनर कडे कळवितील.

१६. माहितीचे सर्व तक्ते, रजिस्टरें, कर्जाचा जमाखर्च व कर्जा संबंधानें पाळण्याचे प्रोसिजर ही रेसिडेंटाच्या हुकूमा वरून व मंजुरातीने कमिशनर घालून देतील.

वर सांगितलेल्या (ब) नमुन्यांतील खालील अटी प्रत्येक अर्जदारानें व जामीनदारानें लक्ष्यांत ठेवण्या सारख्या आहेत म्हणून

त्या आम्ही खाली मराठींत देतों. डेपुटी कमिशनरांच्या सहीनें कळविले जाणाऱ्या अटी पैकी पोट कलमें (ब) व (क) येणें प्रमाणें:-

(ब) कर्ज ज्या कामा साठीं घेतलें त्या कामा साठीच उपयोगांत आणलें पाहिजे आणि जर त्या कर्जा पैकी कांहीं भाग गैरविल्हेस लागला असें डेपुटी कमिशनरांची खातरी होण्या जोगें सिद्ध होईल तर कर्जाची सर्व रकम व्याज व इतर खर्च असेल त्या सुद्धां जी देणें निघेल ती तत्काळ वसूल करण्या सारखी आहे असें समजलें जाईल.

(क) जर एखादा हप्ता योग्य वेळीं दिला नाहीं तर कर्जाची जी रकम देणें निघेल ती सर्व तत्काळ वसूल करण्या सारखी आहे असें समजलें जाईल.


## The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 26, 1892.


We have, at times out of number, adverted in these columns to the evils of vesting the revenue and magisterial functions in the same individuals. The question is of an old standing and reflects the spirit of lethargy and inaction on the part of Government. The blending of these two duties is the outcome of a narrow view. It must be a bad measure of economy to kill two birds with one stone where the chances are at odds against the either game. The first look-out of a Government are naturally its finances and whatever arrangement tends most to facilitate the collection of the revenue claims preference with it. So came into existence the significant names of Collectors, Deputy Collectors, Assistant-Collectors Mamledars, & so on. We have in Berar Deputy Commissioners, Assistant Commissioners, Extra Assistant Commissioners & Tahasildars on a similar type. The main duty of these officers lies in the revenue-sphere. But emergencies arose when magistracy became an important item in the administration. When there was misrule & no proper Government in old times it suited best to the then circumstances that revenue-collectors should be magistrates within their local times. The union of the duties afforded ease & grace to the work of a revenue officer. Spare time was utilized in administering law & no flinching from the revenue work was permissible. A military order prevailed & the ryots had but few rights to maintain against the oppression & anarchy of a foreign rule. And it was on account as above that the coexistence of the two duties was never felt as a standing evil.

But times are changed. The revenue work is vast expanding in its magnitude. People have been allowed all the freedom and rights of a loyal subject of sovereign. The proper maintenance of them in tact requires a vigorous & strong sentinel in our law-courts.

Moreover looking to the rapid strides which this country, vast as it is, has made during the past few years in point of mental development a plodding magistrate finds it too difficult to administer justice to the masses engaged in the most nice subtelties of law not so much to seek justice as to defend their rights and privileges. We indeed laugh within our spleens when we see learned counsels the glory of the Bar pouring out the mellow effulgence of their law before a mechnical magistrte hardly able to riddle the puzzles and psephisms brought before him to be proved and disproved. This is indeed unnatural. The rest of course is in order.

The position of Berar a few years ago was so miserable that not only these were no educated men here but most importations had to be made from the sweepings of the more advanced and the most inteligent province in our vicinity. But times are altered now. The present able and vigorous Director of Public Instructions can boast of having produced in his administration graduate commodities of the genuine Berar growth. He can also boast by taking a retrospect of his work how be can now bring brilliant and shining men of lucid, unassuming, and non-meddling yet amiable and exemplary characters on moderate salaries with hardly any prospects. The selections are the best as every one knows.

Why should the Revenue Department not follow the noble instance of the Educational Head? is long a perplexing question with us. Woe to the administration that madly and impiously rejects the services of men whose talents are sure to diffuse lustre and glory round the work they would be called upon to do. Bombay and other Presidencies have availed themselves of the diffusion of higher education & even the non-regulated C. P. have laid open all their Revenue and Civil employments restrictively to graduates and persons who have received high, mental and intellectual training, Berar is Conservative. Its places are open only by seniority of service and qualification of Depattmental tests to any sort of men. This is both at once detrimental to the service and prejudicial to the interests of justice. But the evil we record is a side reflection on the present system of selecting men fo responsible revnue duties the more so because these are not seperated from magestrial ones.

The Civilians are the best trained and cultured officers' Their main work is either Judicial or majesterial. The Revenue work is solely managed by their Subordinates responsible to them and serving under them. If the Revenue work were in such a state of actual things actually separated from the majesterial there would be all the advantages of a division of labour and none of its disadvantages.

We have thus pointed out the necessity of separating the revenue from the magistracy. However we hope that the following general hints may be found useful if the authorities are disposed to heed them. "(1)To avoid all nominees whose general education is not high;(2)to prefer those whose legal attinments are superior;(3)to veto the appointment of all those who have been previously found unfit for excersing magisterial powers;(4)to prefer young men of good physique to those who are on the eve of retirement and physically unable to bear the strain of exacting work;(5)to increase the member of importation from the Registration department; (6) to select more men from the rank of graduates in arts and graduates in law who are practising as pleaders."

## वऱ्हाड

हवामान—गेल्या सोमवारीं व मंगळवारीं पाऊस फार जोरानें पडला परंतु पुढें सर्व आठवडाभर चांगली उघाडी आहे. एकूण पाऊस ४४. ९४ इंच झाला. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं.

खालील चार गृहस्थ वऱ्हाडच्या वकिलीच्या परीक्षेंत पसार झाले असल्या विषयीं प्रमोदसिंधु कर्ते व वैदर्भ कर्ते यांस खबर कळते:—

नारायण काशिनाथ दाते बी. ए. हायस्कूल - उमरावती.

बाबाजी महादेव दिक्षित.

परशुराम जनार्दन पाटकर—उमरावती.

बाळकृष्ण रामचंद्र ओक.

रा. रा. त्र्यम्बक गणेश परांजपे तहशिलदार वर्ग ४ व आफि० क्लार्क आफ कोर्ट जुडिशीअल कमिशनर यांस रिकाम्या असलेल्या जागेवर वर्ग ३ चे तहशिल्दार नेमलें असें तारीख १९ सप्तेंबरचा हुकूम सांगतों परंतु त्या हुकुमाची बजावणी निराळ्या दुसऱ्याच व्यवस्थेवर अवलंबून आहे आणि ही व्यवस्था कर्नल मेकेंझी आज रजेवरून परत आल्या नंतर कारितील असें ह्मणतात.

उमरावती जिल्हा बोर्डाचे सभासद शेख रहिमान हे मेल्या कारणानें त्यांच्या जागीं रा. रा. बिसाजी रघुनाथ जोशी पेनशनदार मास्तर यांस निवडण्यांत आलें.

वऱ्हाड प्रांताच्या सरकारी खजिन्यांत गेल्या आगष्टच्या अखेर तारखेस करन्सी नोटा, रुपये व खुर्दा मिळून रुपये ३०,३६,०८३ एवढी रक्कम जमा होती.

गेल्या जून महिन्यांत ८५५३ माणसें जन्मलीं व ३७०५ मरण पावलीं. या महिन्यांत सार्वजनिक आरोग्य फार चांगलें होतें. एका महिन्यांत ४८४८ नें लोकसंख्या वाढली.

'पुसदकर-मित्र'— व्यभिचारिणी विधवेच्या शुद्धी साठीं निघालेला शास्त्रार्थ व तु रचा वाद ब्राह्मण मंडळींकडे न्यावा. मजकुराची खातरी, प्रसिद्ध करण्याचा चांगला हेतु व जबाबदारी ही तुह्मी विचारांत घेतली नाहींत ह्मणून दिलगीरी वाटते.

पोंच— फौजदारी न्यायखात्याचा रिपोर्ट १८९१ ; वाशिमकर 'मित्र'; व पातुर्डा —'क्ष'

खामगांव म्युनसिपालिटीनें अफिशान रेसिडेंट साहेबांच्या मंजुराती वरून खालील नियम केला आहे:—

म्युनसिपालिटीच्या हद्दींत एखादी इमारत नवी उभारावयाचा अगर जुनीच पुन्हा उभारावयाचा ज्या इसमाचा इरादा असेल त्यानें लेखी नोटिशीनें आपला हेतु कमिटीस कळविला पाहिजे.

स्पष्टीकरण— 'एखादी इमारत उभारणें' या शद्बांत नव्या पायावर केलेलीं सर्व जादा बांधकामें व दुसरे फेरफार, मुळच्या पायावर वाढवलेली इमारत, जी इमारत आरंभीं मनुष्याच्या राहण्या साठीं नव्हती ती माणसाच्या राहण्यासाठीं तयार करणें, अगर जे पूर्वीं एकच राहतें घर होतें त्याचीं अनेक घरें करणें या प्रत्येक गोष्टीचा समावेश होतो.

नोटीस.

सावित्री मर्द खुशाल सुतार हालीं वस्ती मौजे ज्यानोरी तालुके बाळापूर यांस खाली सही करणार यांज कडून कळविण्यांत येते कीं तू माझेवर ता. २७ माहे अगष्ट सन १८९२ इसवी रोजी नोटीस दिली ती नोटास आज बारा दिवस झाले पावली. नोटीस दिली ती अशी कीं अजमासे बारावर्षे १२ झाली माझे तुझे लग्न होऊन व तूं ह्मणतेस कीं मी चारवर्षे झालीं शाहाणी जाहलीं आहे ही गोष्ट मी कबूल करितो आणि तूं ह्मणतेस कीं कधींही मूळ आलें नाहीं मी तर तुजला लग्न झाल्या पासून दरसाल नेण्या करिता मूळ येत आहो परंतु तूं मजबरोबर आली नाहींस आज सुमारें चारवर्षे झाली शाहाणी झाहलीं आहेस. शाहाणी जाहाल्या नंतर मी स्वताहा आणण्या करिता चार पांचवेळा आलों होतो परंतु तूं मजबरोबर आली नाहींस सबब मी आपलें गावो येऊन माझे येथील पाटील येणें प्रमाणें बालु बा नारायण पाटील व नामदेव वल्द बापूजी पाटील व सिताराम वल्द विक्रमजी पाटील या समागमें घेऊन आणि पंढरी पाटील मोखेकर या सुद्धां तुझे बापाचे घरी नेणें करिता आलो होतो त्यावेळी तुझे बापानें व तूं असे सांगितलें कीं मला दागीनें करून आणाल तर मी येईन नंतर मी घरी येऊन दागीनें घेऊन आलो ते येणे प्रमाणें गुंडवाळ्या चांदीच्या वजन तोळे ४० व कोपर वाळ्या चांदीच्या वजन तोळें ३० नथ सोन्याची वजन तोळा एक भरीव हातातील कडी चांदीची तोळे बारा १२ जोडवी चांदीची वजन तोळे १० दाहा व लुगडी रुपये सात व चोळी एक रुपया येणें प्रमाणें सामान मी व पंढरी पाटील मोखेकर घेऊन आलो ते दागिनें तूं आपल्या अंगावर घालून मजसी असा करार केलाकीं मी दोनच्यार दिवसानी येते ह्मणून मी आपले गांवी गेलो याजला येक महिना जाहाला नंतर आणखी आलो तरी तुझे बापानें सांगितलें कीं माझे गावात हवेचा ऊपद्रव असल्या मुळें सध्या धाडीत नाहीं पंधरा दिवसाचा करार केला होता तरी आज पर्यंत आली नाहींस व मजला तू लटकीच थाप मारलीस व नोटीस दिलीस तर आता ही नोटीस पावल्या पासून आठ ८ दिवसाचे आत माझे दागान्या सह घरी आलीस तर फार उत्तम आहे नाहींतर दागीन्या बद्दल रुपये १२४ व लग्ना बद्दल रुपये ३०० व चारवर्षे तूं शाहाणी जाहाली आणि माझा संसार बुडाला याची नुकसानी बद्दल कोर्टात फिर्याद करून नोटीसिचे खर्चा सह भरून घतले जाईल. व तुझा पुढें कोणतेही प्रकारची तकरार ऐकली जाणार नाहीं म्हणून दिल्ही नोटीस तारीख २३ माहे सपटेंबर सन १८९२ इसवी.

(सही)

सहीची निशाणी बासळा खुशाल व० बाबुजी सुनार राहणार वडगांव ता० अकोट याचपा हातची असे.

## वर्तमानसार.

सरकारनें पुण्याच्या फर्ग्युसन कालेजला आजपर्यंत मिळत असलेली ग्रांट बंद केली.

श्री. गायकवाड सरकारांनीं मे. नेलर साहेबांस आपले कायदे करण्याकरितां नेमिलें असें कळतें.

चिकागो येथील जग प्रदर्शनांत एक प्रचंड मासा जिवंत आणून प्रदर्शनार्थ ठेविला आहे असें समजतें.

रशिया व फ्रान्स यांच्या दरम्यान एकमेकांस एकमेकांनीं मदत करावी अशाबद्दल तह होऊन त्यावर परस्परांच्या सह्या झाल्या असें कालची विलायतची तार सांगते. जर्मनी, आस्त्रिया व इटाली या तिघांचा जो तह झाला त्यांस जबाब ह्मणून हा वरील तह आहे. आतां काय काय होतें पाहाणें आहे.

अमिराच्या फौजेनें बंडखोर हजारा लोकांच्या ताब्यांतला एक किल्ला लढाई करून घेतला.

कंदाहारच्या फौजेंत पटकी सुरू झाली आहे.

पामीर प्रकरणाकडे सरकारचें लक्ष्य विशेष लागलें आहे, पण त्याबद्दलची माहिती आज प्रसिद्ध करतां येत नाहीं असें लार्ड रोजबरीचे सेक्रेटरी सांगतात.

तेहेरान येथील तुरुंगांतल्या कैद्यांस सोडविण्याकरतां लोकांनीं दंगा केला आणि तुरुंग खुला करून कैद्यांस बंदमुक्त केलें व जेलरांस ठार मारलें.

गायकवाड रेलवेचा जो भाग पावसाच्या अती वृष्टीनें खराब झाला होता तो आतां चांगला झाला.

मुंबईइलाख्यांत गेल्या वर्षांत लश्करी कामांकडे २,३०,००० रुपये खर्च झाले.

सरदार डिलरजंग उर्फ अबदुल हक्क हे आपला मुंबईचा व्यवसाय आटपून हैदराबादेस निघून गेले.

मियनं मीर येथें १४ नोवेंबर पासून १० दिसेंबरच्या दरम्यान फौजेस शिक्षण देण्याचा समारंभ होणार असून त्या करतां तेथें बरीच मोठी फौज जमणार आहे.

मणिपूर व चिनहिल या संस्थानांची सरहद्द कायम करण्याचा विचार चालला आहे.

अलहाबाद हायकोर्टांत काम फार शिल्लक असल्यामुळें एक वर्षपर्यंत एक जास्त जज्ज नेमण्याचें ठरलें.

विलायती चोरहो नेटिवांपेक्षा अधिक कसबी आहेत. हिंदुस्थानसरकाराकरितां विलायतेहून पोष्टाच्या टिकिटांची आगबोटींत चोरी झाल्याचें मागें एकदा बाहेर आलें असून आतां त्याचा जास्त खुलासा बाहेर आला आहे. हल्लीं पकडलेली ३०,००० रुपयांची चोरी आहे. दोन आणे दराचीं ६६,००० रुपये किंमतीचीं पोष्टाचीं टिकिटें भरलेली एक सीलबंद पेटी स्टेट सेक्रेटीकडून मुंबईस येत असतां वाटेंत आगबोटींत ही चोरी झाली असें ह्मणणें आहे. ह्मणजे पेटीचें सील तसेंच कायम ठेवून त्याचे कोपरे युक्तीनें उचकून त्या तिकिटांच्या कागदांच्या घड्या हळूच काढून घेतल्या. तपासांत असणाऱ्या कामदारांस ही गुणगुण लागल्यावरून त्यांणीं चुपी तऱ्हेनें नजर ठेऊन ही चोरी पकडली आहे आणि चोरटे गोरे साहेब आहेत.

भिक मागणाऱ्या लोकांनीं विलायतेंत येऊं नये असें करण्याची खटपट चालू आहे.

विलायतच्या गव्हांच्या पिकास आगष्ट महिन्यांतल्या पावसानें बराच धोका बसला व त्यामुळें पाच टक्के पीक कमी येईल असा अदमास आहे.

पारीस शहरांत पटकीचा वाखा वाढत आहे व त्यामुळें बाहेरचे लोकांस आंत येण्याची बंदी केली आहे.

गिलजित येथें जाणाऱ्या सामन सुमानाची रवानगी होत आहे वाटेंत श्रीनगर व बाजी यांच्या दरम्यान बरफाच्या वृष्टीमुळें हें सामान रवानगीचें काम थोडें लांबणार आहे.

रशियन लोक पामीर सोडून गेले ते मुरगाव येथें एकत्र जमून तेथें आपलें ठाणें कायम करण्याचा त्यांचा विचार आहे असें सांगतात.

हजारालोक अमिराच्या विरुद्ध तटबंदी करीत आहेत.

हीरात व चहर यांच्या दरम्यानचेच पुष्कळ उजबेगलोक दंगाल्यास प्रवर्तक झाल्यामुळें हीरातचा गव्हरनर दोन पलटणी बरोबर घेऊन मेमना येथें गेला आहे. फिरुन लोकही दंग्यास तयार झाले आहेत. दौलतराव व सरजिगल यांच्या दरम्यान अमिराच्या फौजेचा पराभव झाल्याची बातमी खरी आहे असें सांगतात.

काबूलच्या तुरुंगांतल्या पांच हजार कैद्यांनीं दंगा करून तुरुंग फोडला आणि बाहेर पडून स्वतंत्र संस्थानांत पळून गेले अशी गप्प आहे. ठा० अ०

पलमेलग्याझेट

लिहितात कीं, दादाभाई काळा नसून गोऱ्या रंगाचाचा आहे पण तो बोलतांना लार्ड सालिसबरीच्या कारकीर्दींतील काळीं कारस्थानें गोऱ्यांतून कशीं बाहेर पडतात हें दाखविणार असल्या कारणानें त्याला सालिसबरीनीं गोरा असून काळ्या रंगाचें विशेषण दिलें आहे.

बंगाल सरकारानें आपल्या हद्दींतील मुनसिपालिट्याच्या संबधानें एक नवें बिल बाहेर आणण्याचा घाट दाखविल्यावरून तिकडे मोठी चळवळ सुरू झाली आहे. त्याच बिलाच्या संबंधानें कलकत्यास ३९ मुनसिपाल कमेट्याच्या मुकत्यारांची एक सभा ही भरली होती. मुख्यस्थानीं महाराज बहादूर जगदींद्रराय होते. मुक्या प्रजेला स्थानिक स्वराज्याचा अधिकार मिळाल्यामुळें नुकती तीस वाचा फुटते न फुटते इतक्यांत आमच्या सरकारच्या नव्या बिलानें तिच्या तोंडांत बोळा कोंबून पुनः मुके करण्याचा घाट दाखविला हें फार वाईट झालें असें बाबु सुरेंद्रनाथ बानरजी यांनीं भरसभेंत स्पष्ट बोलून दाखविलें. हें नवीन बिल विद्याखात्याला धक्का देऊन न्यायखात्यास तोंडवशी पाडणार असें दिसतें.

काबूल अमिराविरुद्ध हजारी लोक उठून त्यांनीं मोठा नाश मांडला आहे. अमीर त्यांच्या हातापाया पडतो, खंडणी घ्या ह्मणतो, परंतु ते उलू लोक कांहींच करीत नाहींत.

त्याचप्रमाणें बलूची लोकांनीं आपला दे-खावा दाखविण्यास आरंभ केला आहे.

भिमानप्रगण्याचे आजबेग लोक अमिरास हुलकावणी दाखवीत आहेत.

मिसर सरहद्दीस लागून ठेवलेले ब्रिटिश लष्करांत मोठी चळवळ सुरू असल्याचें पारीस येथील "फीगारो" पत्रकार कळवितात.

आफ्रिकेच्या संबंधानें फ्रान्स व जर्मनी यांचें शत्रुत्व उघड होणार.

वायव्यसरहद्दीकडे अनेक प्रकारचे लष्कर व सामानसुमान रवाना करण्याची तयारी मोठ्या झपाट्यानें चालविली आहे.

स्वच्छतेचें पूर्ण माहेरघर ह्मणजे इंग्लंड पण तेथें यंदा महामारीच्या उपद्रवानें बहुत लोक नाश होत आहेत. या कारणाचा शोध लावता लावता असें अनुमान ठरलें कीं मांसहारी लोकांचा मैला व त्यांचे मुत्र, हा रोग उद्भवण्यास मुख्य कारण आहे. मा. मि.

जंमू येथील शाळेंतील विद्यार्थी व शिक्षक नेहमीच्या शिक्षण क्रमांत गुंतले असतां एकाएकीं शाळागृह कोसळून पडलें ढासळण्याचा आवाज कानीं पडतांच त्यांनीं बांबें मारली परंतु त्यांच्या पैकीं ३२ मुलेंग व १ शिक्षक दडपून गेले. त्यांना बाहेर काढतां मुले व शिक्षक मिळून वीस जणाचे मुडदे व बाकीचे अतिशय घायाळ झालेले असें निघाले.

बंगालचें प्रॉव्हिन्शिअल कॉनफरन्स दसऱ्याच्या सुटींत ता. १३ व १४ आक्टोबर रोजीं भरणार आहे. ह्या सभेंत ज्या विषयांसंबंधीं उहापोह होऊन ठराव व्हावयाचे आहेत ते फारच महत्वाचे आहेत. त्यांचीं नावें येणें प्रमाणें:—बाहेर गांवच्या म्युनिसिपालिट्यांचें बिल; गांवच्या एक्या; पोलिस बंगाल्यांतील वरिष्ट प्रतीचें शिक्षण; आरोग्यरक्षणाची व्यवस्था; दिवाणी व फौजदारी न्याय; हायकोर्टाची ओरिजनल साईड, बिगारी परदेशी नेणें व त्यावरील सरकारचा ठराव; समुद्रपर्यटनाचा प्रश्न; पब्लिक सरकारचा ठरावं; इंडिअन कौन्सिल्स एक्ट; पोटिशन बिल; आणि लॅन्ड एक्विझिशन बिल. एकंदरींत बंगाल्यांत निदान बरीच चळवळ तरी सुरू असल्याचें दिसतें. सु० प०

## जाहिरात

अहो स्वदेश बांधवहो, परदेशी औषधी नुस्त्या रंगबाज व कमिशन जास्त पाडून कां फसतां? इकडे थोडे लक्ष द्या.

आमचे दवाखान्यांत सर्व रोगांवर औषधी विक्रीस व दरिद्री लोकांस फुकट तयार आहेत; परंतु त्यांत ज्या हटकून गुण खात्रीनें देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जी दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्त्यावर पत्र पाठवावें. ह्मणजे आम्ही व्ह्याल्युपेबलनीं पोस्टमार्गें लवकर पाठवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरुस्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमिशन देऊं व त्यांनीं विक्री करून दाम पाठवावें.

१ गजकर्णावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ८ आणे.

२ मूळव्याध कितीही दिवसांची दुर्धर असेल त्यावर मोडावर लावण्याचे व पोटांत घेण्याचें दोन औषधी मिळून किं. १॥ रु.

३ धातुर्थिक ज्वर ह्मणजे चवथारें हिंव ताप त्याच प्रमाणें तिजारे, व दररोज येणारे कितीही दिवसांचे असो, त्याजवर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. किं. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्याच्या डबीस १०९ या औषधानें कडक तापही जातो.

४ परमा तिडिक व स्वप्नावस्था, व कोठ्यांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहूणपुडा किं. १ पुड्यास ०१४ आणे.

५ बाळंत रोग बाळाचे डबे व सटवी बाधा व प्रदर सर्व तऱ्हेचा किं. १ डबीस १॥ रु.

६ वीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास किं. २॥=

७ नारुवर २ दिवसांत गुण. लावणें व खाणे याच्या डबीस किं. ।=

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट शुळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस किं. ।।।

जुलाब उत्तम राजस तकलीफ अगदीं न सून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल किं. १। रु.

१० मेदोरोग व घुरें व उन्माद यावर अगदीं जल्द गुण १ बाटलीस किं. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्त्राव व ऋतुस्नात होण्यास व गर्भधारणास बंदेज ह्यांवर हें एकच औषध फार चांगलें आहे. १ डबीस किं १॥

१२ पिनस व मस्तकशूळ व अर्धशिशी याजवर दर डबीस किं. १०=

१३ हागवण व अतिसार १ डबीस किं. १।=

१४ वृषण एकारल्यास व वृद्धीस १ डबीस किं. १ रु.

१५ कावरले कुत्रें व कोल्हे व तेल्या उंदीर डसल्यास १ डबीस किं. १। रु.

१६ मेहानें अगर उष्णतेनें पाय उलून रक्त जाणें व संधि दुखणें ह्यावर १ डबीस किं. १॥ रु.

१७ महामारीवर अगदीं जल्द गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ५० गोळ्याच्या डबीस किं. १०—

१८ गर्मी उर्फ उपदंश संबंधी विकार क्षतें यांजवर १ डबीस किं. १॥ रु.

१९ फसली उर्फ मज्जागतवात व शूळ याजवर लवकर १५ मिनिटांत गुण १ डबीस किं. ॥ हें १५ मनुष्यांस पुरेल.

२० कऊळ, नळगुद, पंडु, सूज व मुखरोग ६५ व सन्निपात १३ यांवर १ डबीस किं. १॥ रु. ही ३ मुलें व २ पुरुषांस पुरेल.

२१ सुवर्णमालिनीवसंत खात्रीचा १ तोळ्यास किं. ७ रु.

२२ योगराज गुगुळ १ तोळ्यास ४॥ रुपये.

२३ नामर्द ह्मणजे नपुंसक कितीही दिवसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त खात्रीनें होईल. १ बाटलीस किं. ३ रु. गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोळ्यांतील फुल वडस रातांधळें लाली खुपरी चुळ चीपडे गळती याजवर १ डबीस किं. १०६

ह्या शिवाय पोटेज निराळा पडेल.

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेशा मागवून विक्री करील त्यांनीं विक्री करून पैसे मागाहून पाठवावे.

(पत्ता व सही) शिवचरनगीर रामगीर
वैद्य कुरणखेडकर अकोला गंगाधरचे
माडीवर चौकांत दवाखाना.
वऱ्हाड.

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.